# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक २३ जून २००९ (का.प.क्र.२६) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक २३/०६/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.११.४५ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.वसंतराव वैद्य,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलिंद यशवंत
११. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.सौ.विजयाताई बनकर
१४. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपत
२२. स.स.सौ.सुशिला भगवान रगडे
२३. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२४. स.स.श्रीमती पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.विमल तुकाराम बेंद्रे
२६. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२७. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२९. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
३१. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर

३२. स.स.श्री.खान जावेद हसन कासिम हसन
३३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३४. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३५. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
३६. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
३७. स.स.श्री.संजु रिडलॉन
३८. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३९. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४०. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
४१. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
४२. स.स.श्री.खान हाजी शेरखान अ.रहेमान
४३. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४४. स.स.सौ.राऊत छाया विलास
४५. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
४६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४९. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
५०. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५१. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५२. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५४. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५५. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५६. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
५७. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५८. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
५९. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
६०. स.स.श्री.खुडे विजय किसन
६१. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६२. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
६३. स.स.श्री.दामोधर माधवराव शिंदे
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६५. स.स.श्रीमती सरिता अशोक ससाणे
६६. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६७. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७२. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
७३. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७४. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप

७५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७६. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७७. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७८. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७९. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
८०. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन
८१. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
८२. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
८३. स.स.श्री.विनोद सोनवणे

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**<u>चर्चा :</u>**

डॉ. भागवत कराड :स्व.श्री.आसारामजी वरे हे जेष्ठ कामगार होते त्यांनी घाटी येथे अधिष्ठता म्हणून तसेच शासनाच्या मोठमोठया पदावर काम केले. त्यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :यास माझे अनुमोदन आहे.
श्री.गजानन बारवाल

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली साठी उभे रहावे.

याचवेळी सभागृहात स्व.आसारामजी वरे यांचे दुःखद निधनाबध्दल सभागृहात श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर : मा.आयुक्त पहिल्यांदाच या सभागृहात उपस्थित आहे सभागृहाच्या वतीने त्यांचे स्वागत करते.

श्री.संजय सिरसाट :स्पेक एजन्सीच्या गैरव्यवहारा संबधीत अनेक वेळा सर्वसाधारण सभा स्थायी समितीमध्ये चर्चा झाली मा.महापौर,मा.सभापती यांनी वेळोवेळी आदेशीत केले परंतु म्हणावी तशी कार्यवाही झाली नाही. म्हणून स.सदस्य श्री.देसरडा यांनी या विषयी जनहित यांचिका मा.उच्च न्यायालयात दाखल केली त्यावर योग्य तो निर्णय मिळाला जे महापालिकेचे नुकसान होणार होते त्यातून महापालिका बचावली आहे. त्यामुळे स.सदस्य श्री.देसरडा यांचे सभागृहाच्या वतीने आपण अभिनंदन करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स.सदस्य श्री.देसरडा यांना या सभागृहात आर्थिक नुकसानीबाबत न्याय मिळाला नाही म्हणून त्यांनी मा.उच्च न्यायालयाकडे जनहित याचिका दाखल केली व जो निर्णय न्यायालयाने दिला तो महापालिकेच्या हिताचा असल्याने स.सदस्य श्री.देसरडा यांचा सर्वांच्या वतीने अभिनंदचा ठराव मांडला त्यास अनुमोदन देतो.

डॉ.भागवत कराड :स.सदस्य श्री.देसरडा यांची अभ्यासूवृती व त्यांनी केलेले काम हे उल्लेखनीय आहे त्यांचे अभिनंदनास माझे अनुमोदन आहे.

श्री.संजय जोशी : स.स.श्री.देसरडा हे अभिनंदनास पात्रच आहे दुमत नाही परंतु यात दुर्देवी प्रशासनाचा दोष आहे. अनेक वेळा स्पेकच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली

मा.सभापती यांनी स्पेकला बिल देवू नसे असे आदेश केले असतांना ६० लक्ष बिल दिले जो निर्णय मा.न्यायालयाने दिला त्यामूळे प्रशासनाला न्यायालयात शरमेने खाली पहावे लागले.अत्यंत दुर्देव आहे.नेहमीच म्हटले जाते सदस्य हे ट्रस्टी असतात परंतू प्रशसन त्यांचे ऐकून घेत नाही. स्पेक प्रमाणे आणखी दोन तीन एजन्सी येतात त्या बाबतीत तरी प्रशासनाने जागृत राहावे.

श्री.संजय शिरसाट : त्यामुळे आमची मान खाली झाली आहे.

श्री.भगवान घडमोडे :स.सदस्य श्री.देसरडा हे अभिनंदनास पात्र आहेतच कौतुक करावे तेवढे थोडे आहे. मागील २/३ वर्षाचे सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभांचे इतिवृत्त पाहिले तर आपणास दिसून येईल की, या बाबतीत स.सदस्य पोटतिडकीने बोलतात स्पेकबाबतीत अनेक वेळा सभागृहात चर्चा झाली या एजन्सीचे काम चांगले नाही त्यांचेकडून काम काढून घ्यावे सदस्यांना सुध्दा दोन दोन नोटीस आल्या हे सुध्दा निदर्शनास आणून दिले गेले होते. तरीही प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही.उलट त्या एजन्सीला पेमेंन्ट दिले गेले. व महसूली उत्पन्नात खिळ घातली गेली या सभागृहाचे एक स.सदस्य ट्रस्टी असून त्यांना स्पेकच्या बाबतीत न्यायालयात प्रकरण दाखल करावे लागले. प्रशासन किती कर्तव्यदक्ष, पारदर्शक व चांगले काम करते हे मा.न्यायालयाला दाखवून दिले या संदर्भात याचिका दाखल झाल्यानंतर प्रशासन ॲफिडेव्हिट देते की संबधीत एजन्सीला दंड आकारण्यात येईल.वसूली केली जाईल फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल हीच कार्यवाही पुर्वीच केली असती तर प्रशासनाची इज्जत राहीली असती. यापूढे तरी प्रशासनाने स.सदस्य चर्चा करतात जो सभागृह निर्णय होतात त्यांचे गाभीर्य प्रशासनाने घ्यावे.

मा.महापौर :अनेक वेळा सभागृहात चर्चा होवून स्पेकच्या कामाबध्दल नाराजी व्यक्ती केलेली होती.नागरीकांना अतिशय त्रास होतो दोन-दोन नोटीसेस जात आहे.अशा तक्रारी होत होत्या परंतू प्रशासनाने त्या बाबतीत फार काही कार्यवाही केली नाही.जे बील स्पेक एजन्सीला देणार होते ते देण्यास स.सदस्यांनी विरोध केला होता जे न जुमानता प्रशासनाने स्पेकचे बिल अदा केले. आजही वार्ड कार्यालयात स्पेकच्या संदर्भात ठोस असे कोणतेही निर्णय झालेले नाही अनेक नागरीकाचे अर्ज नोटीसेस ढिग लागलेल्या आहेत.त्याचा निपटारा झाला नाही व नागरीकांना अजूनही दिलासा मिळाला नाही.त्यामूळे स्पेकने केलेले चांगले कामाचा शोध प्रशासनाने घ्यावा जो नागरीकांना त्रास होतो तो कमी करण्याचे प्रशासनाला आदेशीत केले होते तरी फार काम प्रशासनाने केले नाही.प्रशासनाने याकडे लक्ष देवून स्पेकच्या बाबतीत त्वरीत निर्णय घ्यावेत याच बरोबर स.सदस्य श्री.देसरडा यांनी जो लढा दिला त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.परंतु स.सदस्य अनेक किंवा सामान्य नागरीक यांना अशा कामासाठी मा.न्यायालयात जाण्याची वेळ येवू देवू नये अशा सूचना देण्यात येते. या विषयावर मा.आयुक्तांना निवेदन करायचे आहे त्यांनी करावे.

मा.आयुक्त : स्पेकच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने जो निकाल दिला आहे तो निश्चितपणे बंधनकारक आहे याचे दुमत नाही. मा.उच्च न्यायालयाचे आदेशाची प्रत पुर्णपणे वाचन केल्याशिवाय यावर आयुक्त म्हणून तपशिलवार निवेदन देवू शकत नाही मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये या संबधी जर

प्रशासनातील कुठल्याही अधिकाऱ्यांना दोषी ठरविले असेल किंवा ठपका जरी ठेवला असेल त्याची दखल घेवून निश्चित पणे चौकशी होईल.

मा.महापौर :आनंदाची बातमी आहे या महापालिकेच्या पाणीपुरवठा समांतर जलवाहिनीसाठी शासनाकडून निधी मिळालेला आहे त्या संदर्भात पत्र प्राप्त झालेले आहे यात असे म्हटले की, औरंगाबाद महानगरपालिकेचा पाणीपुरवठा योजनेचा रूपये ३५९.६५ कोटीचा प्रस्ताव ४ मे २००७ रोजी झालेल्या ४ थ्या राज्यस्तरीय मंजूर समितीमध्ये केंद्रशासनाकडून अतिरिक्त निधी प्राप्त करून घेण्याच्या अटीच्या आधीन राहून मंजूर करण्यात येवून केंद्रशासनाकडे अनुदान वितरणासाठी सादर करण्यात आलेला होता आता केंद्र शासनाने सदर प्रस्ताव मान्य केला असून महापालिकेला रू.१४३.८६ कोटीचा पहिला हप्ता वितरीत केला आहे.पहिला हप्ता मिळालेला आहे ज्या काही पाणीपुरवठयात सुधारणा करावयाच्या आहे त्या दिशेने एक पाऊल पुढे पडत आहे ही एक चांगली उपलब्धी आहे.

श्री.किशनचंद तणवाणी :या निधीची विनियोग कशा पध्दतीने करणार आहे. याचा प्रशासनाने खुलासा करावा व ज्यांचेमुळे हा निधी मिळाला असे या जिल्हयाचे मा.खासदार श्री.खैरे साहेब यांचा या सभागृहात अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कुण्या एकटयामूळे अनुदान मिळाले नाही शासनाचेही अभिनंदन करावे लागेल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :समांतर जलवाहिनीकरीता मा.खासदार श्री.खैरे हे अगोदर पासूनच पाठपूरावा करतात यासाठी माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमूख व मुख्यमंत्री मा.श्री.अशोकरावजी चव्हाण तसेच मा.श्री.शरद पवार यांना सर्वांनी सहकार्य केले त्याचे सह सर्वांचे अभिनंदन करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :२८ फेब्रुवारी रोजी मुंबईला या संदर्भात बैठक झाली होती त्यावेळी मा.खासदार श्री.खैरे तसेच मा.आमदार श्री.दर्डा तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते त्या सर्वांचे अभिनंदन करावे.

श्री.संजय जगताप :मा.आमदार श्री.राजेंद्र दर्डा साहेब यांचाही यात सिहांचा वाटा आहे त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.कैलास गायकवाड :मा.खासदार श्री.खैरे मा.आमदार श्री.तणवानी माजी महापौर डॉ.कराड तसेच मा.माजी सभापती श्री.कोकाटे व तीनही माजी महापौर यांचे ही अभिनंदन करणे गरजचे आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :समांतर जलवाहिनीच्या प्रस्तावाला मंजूरी दिली त्याबध्दल शासनाचे धन्यवाद एक दुस-याला श्रेय देण्या पेक्षा चांगले काम होत आहे याचा विचार करावा उशीर का झाला याचाही खुलासा व्हावा.

श्री.मुजीब खान :समातंर जलवाहिनीसाठी शासनाकडून निधी आला जेवढा यायला पाहिजे तेवढा आला नाही त्यातील काही रक्कम आली. सर्व येथेच अभिनंदन करीत आहे. ज्यांनी प्रयत्न केले व प्रशासनानेही त्यांचे वर विश्वास ठेवला ते या शहराचे खासदार श्री. चंद्रकांत खै्रे बाकी कुणीही प्रयत्न केले नाही. गेंस्टहॉउसला मा.खासदार श्री. खैरे यांनी सुरूवातीला स.सदस्यांना पत्र देवून या योजनेची माहिती दिली होती ज्यांवेळी मंजूरी आली दिल्लीहून पत्र आले त्यावेळी बैठक घेतली होती पहिल्यांदा घेतली व शासनाकउून मंजूरी आली तेंव्हाही बोलावले होते. त्यांना पहिल्यादा धन्यवाद देतो पहिल्या टप्प्यात काम कशा पध्दतीने होणार आहे तसेच शासनाकडून जे पत्र येते त्याची माहिती स.सदस्यांना होत नाही त्याची एक प्रत सर्व सदस्यांना

दयावयास पाहिजे. गेल्या पाच वर्षापासून अशा पत्राची प्रत दिली जात नाही. याची दखल प्रशासनाने घ्यावी.

श्री.गजानन बारवाल : आताच भावना व्यक्त केल्या की मा.खासदार श्री.खैरे यांनी याबाबतीत जास्तीत जास्त मेहनत घेतली. त्याच बरोबर केंद्र शासनाकडून मा.श्री.शरद पवार तसेच श्री.जयपाल रेड्डी साहेब तसेच या राज्याचे मुख्यमंत्री ते इतर ही अनेक मान्यवरांनी तसेच अजीत दादा पवार यांनी सहकार्य केले त्याबध्दल मी सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. यातून हा प्रश्न लवकरच मार्गी लावल्यास बरे होईल. पुढील तीन विषय पाणीचे आहे. शासनाचे प्रतिनिधी मा.आमदार श्री.तणवानी येथे उपस्थित आहे. या विषयातील प्रमाण बदलून घ्यावा लागेल तर काम करता येईल.कारण महापालिकेची आर्थिक परिस्थिती तशी नाही. आणखी जे लोकप्रतिनिधी आहे त्यांचे मदत घ्यावी लागेल मा.खासदार श्री.खैरे साहेब यांनी या योजनेसाठी अतिशय चांगली मेहनत घेतली त्यांना या सभागृहात आमंत्रित करून त्यांचा सत्कार करावा.

डॉ.भागवत कराड : नुसता ठरावच न घेता त्यांना या सभागृहात आंमत्रित करून त्यांचे स्वागत सभागृहाच्या वतीने करण्यात यावे तसा ठराव पारीत करावा.

मा.महापौर :आज आनंदाची बातमी मिळाली की महापालिकेला समातंर जलवाहिनीसाठी रू.१४३.८६ कोटीचा हप्ता मिळालेला आहे. सर्वाचे अभिनंदन मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे हे पहिल्यापासून या योजनेसाठी प्रयत्नशिल होते यासाठी त्याचे मोठे योगदान लाभले त्याचे मनपुर्वक आभार अभिनंदनही करते. तसेच केंद्रीय नगरविकासमंत्री श्री.जयपाल रेडडी साहेब,केंद्रीयमंत्री श्री.शरद पवार, नगरविकास विभागाचे सचीव तसेच राज्य शासन मा.मुख्यमंत्री यांनी स्वत: लक्ष घालून पत्र दिलेले होते. तसेच जल संपदामंत्री मा.अजितदादा पवार, भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी मा.श्री.गोपीनाथ मुंढे साहेब तसेच श्री.नितीन गडकरी यांनी माहिती घेवून या बाबतीत प्रश्न मांडलेले होते शहराचे आमदार व इतर लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी यासाठी प्रयत्न केले तसेच माजी महापौर श्री.किशनचंद तणवानी यांनी यासाठी प्रयत्न केले ते आज आमदार आहे तसेच या सभागृहाचे सदस्यांनी वारंवार या जलवाहिनीसाठी निधी मिळावा म्हणून मागणी केली. यात महापालिका प्रशासनाचे ही चांगले प्रयत्न होते या सर्वांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करते. अतिशय प्रयत्न व मोठा लढा देवून हा निधी मिळविलेला आहे यापूढे सर्व मिळून विकास कामे करण्याचे प्रयत्न करू व समातंतर जलवाहिनीचा करून शहराचा पाणी प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करू अशी अपेक्षा करते. आताच स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी मत व्यक्त केले की विशेष काही प्रस्ताव प्रशासनाचे असल्यास त्या संबधी शासनाकडून पत्र वगैरे आल्यास त्यांची प्रत स.सदस्यांना यापूर्वी दिली जात असेल ती पध्दत बंद केली होती ही पध्दत पुन्हा सुरू करण्याची गरज वाटते. शासनाकडून आलेले पत्र व त्यानुसार जी काही माहिती असेल ते स.सदस्यांना पोहचल्यास त्यांना अभ्यास करणे सोईचे होते.त्यासाठी अशा प्रकारची माहिती स.सदस्यांना पोहचविण्याची कार्यवाही व्हावी.

सौ.लता दलाल :समांतर जलवाहिनीसाठी निधीला मंजूरी आली. त्याबध्दल मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे यांचे मी मनपुर्वक अभिनंदन. समांतर जलवाहिनीस दीड ते दोन वर्ष लागतील सद्यस्थितीत शहरात अनेक भागात पाणी पुरवठा होत नाही काही ठिकाणी गढूळ पाणी येते तर काही ठिकाणी वेळेवर पाणी येत

नाही यापूर्वी माझे वार्डात दररोज पाणी येत होते आपल्या सर्वांच्या मागणीनुसार एक दिवसाआड सर्वच ठिकाणी पाणी येते माझे वार्डाचे भोईवाडा, उदयकॉलनी, खडकेश्वर हा एक भाग व नागेश्वरवाडी असे दोन भाग पडतात.दोन्ही भागात सकाळी पाणी पुरवठा होत होता खडकेश्वर येथे कमी दाबाने पाणी येते म्हणून सायंकाळची वेळ घ्यावी असे अधिका-यानीच सांगितले खडकेश्वर,भोईवाडा भागात सायं. वेळ आहे आज रोजी रात्री २-२ वाजता पाणी येते.ते कमी दाबाने, पाणी प्रश्न सुटला नाही तर आजची बैठक होवू देणार नाही मा.आयुक्त व प्रशासनातील संसबधीत अधिकारी यांना या संबधी पत्र दिले परंतू दखल घेतली जात नाही वेळीच दखल घेतली नाही तर प्रशासनास काम करणे कठीण होईल याची नोंद घ्यावी.

श्री.मुजीब खान :ठराविक सदस्यांनाच बोलण्याची संधी न देता सर्वांना संधी दयावी.

श्री.विनायक पांडे : ------ शहरात सर्वात कमी पाणी पुरवठा माझे वार्डात होतो.

श्री.सलीम खान : ------ उल्लेख करून नये औरंगाबाद असे बोलावे कायदयाने बोलू शकत नाही हे ऐतिहासिक शहर आहे औरंगाबाद या नावानेच बोलावे.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने बोलणे चालू असते परस्पर घोषणा देणे चालू असते.

डॉ.भागवत कराड :------ किंवा औरंगाबाद यापैकी काय बोलायचे हा त्या त्या सदस्यांचा प्रश्न आहे इतिवृत्तात औरंगाबाद या नावाने नोंद करावी.

श्री.सलीम खान : औरंगाबाद महानगरपालिका असून सभागृह महापालिकेचे आहे ------असा उल्लेख सभागृहात करणे कायदयाने बरोबर नाही.

याचवेळी मा.महापौर डायससमोर मोठमोठयाने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर : स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर जावून बोलावे.तसा खूलासा करता येणार नाही.

श्री.मुजीब खान :------ असे बोलता येत नाही महापालिकेला बंधन घातलेले आहे.

याचवेळी डायसमोर स.सदस्य मोठमोठयाने घोषणा देतात.

श्री.किशनचंद तनवाणी : या शहराचा पाणी पुरवठा कधी सुरळीत होईल, याचा खुलासा करावा.

मा.महापौर :सर्व सदस्यांना वारवार सुचना देण्यात येते की आपआपल्या जागेवर बसावे डायस समोर येवून बोलू नये. कृपया शांतता राखा.

श्री.अनिल जैस्वाल :ही हुकूमशाही नव्हते लोकशाही आहे आम्ही ------बोलणार.

मा.महापौर :एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे

श्री.मुजीब खान :या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण गेले होते. औरंगाबाद बोलावे ------ मा.न्यायालयाचे निर्देश आहे. औरंगाबादच बोलावे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : आपण न्याय देवू शकत नाही.

याचवेळी स.सदस्य हे मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर जावून बोलावे वारंवार सुचित करण्यात येते.

श्री.अनिल जैस्वाल :जे स.सदस्य माईक घेवून फिरतात त्यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे.

मा.महापौर : सर्व सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.पाणी प्रश्नाचे महत्वाच्या विषयावर चर्चा करायची आहे.

श्री.मुजीब खान : मा.सर्वोच्च न्यायालयाने जे आदेश केलेले आहे त्याची अमलबजावणी करणार की नाही. मा.न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे बोलण्याची सूचना सभागृहात आपण दयावी.

मा.महापौर	:सभागृहाचा वेळ वाया घालवण्याचा कुणाला अधिकार नाही. जागेवरून सदस्यांनी बोलावे.

श्री.संतोष खेंडके	: -------बोलायचे की औरंगाबाद हा ज्या त्या सदस्यांचा प्रश्न आहे. आम्हाला बोलायचे आम्ही बोलू.

श्री.मुजीब खान	: सभागृहात मनमानी चालत नसते. मा.न्यायालयाने जे निर्देश दिले त्याप्रमाणेच बोलावे लागेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ------ ज्यांना बोलायचे त्यांनी सभागृहाच्या बाहेर बोलावे.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने डायस समोर स.सदस्याचे बोलणे चालू असते.

श्री.संतोष जेजूरकर	: जे मोठमोठयाने बोलत असतील त्याचे सभासदत्व रद्य करावे.
श्री.संतोष खेंडके

श्री.प्रशांत देसरडा	: जे सदस्य गोंधळ धालत असतील त्यांचे सभासदत्व रद्य करावे.शहरातील जनतेला पिण्याचे पाण्याचा प्रश्न पडला येथे चर्चा काय नाव घ्यायचे यांचा गोधाळ चालू आहे शहरातील जनतेने पिण्याच्या पाण्यावर चर्चा करण्यासाठी आपणाला पाठविले आहे त्यावर चर्चा व्हावी हा विषय बाजूला ठेवा.

डॉ.भागवत कराड	: शहरात एक दिवसाआड पाणी येते.पाण्याचा प्रश्न निर्माण होतो येथे काय नाव घ्यायचे या बाबतीत गोंधळ होतो ------ कि औरंगाबाद ज्यांना त्यांना काय बोलायचे ते त्यांनी बोलावे प्रशासनाने इतिवृत्तात काय नमूद करायचे ते करावे.आम्ही ------ असेच नाव घेणार त्यासाठी गोंधळ घालण्याची गरज नाही. पाणी प्रश्नावर चर्चा करावी.

मा.महापौर	:सर्व सदस्यांनी शांतता राखावी आपआपल्या जागेवर बसावे पाणीप्रश्नावर बोलावे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : औरंगाबाद ऐवजी ------- बोलून या सभागृहाचा जे कुणी शांतता भंग करीत आहे त्यांना सभागृहाच्या बाहेर काढावे.पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे ती चालू ठेवावी.

श्री.तणवानी किशनचंद :प्रत्येक वेळी शिवसेना-भाजपाचे स.सदस्य ------ म्हणून उल्लेख करतात आज का विरोध करण्याची गरज यांना पडली.

श्री.सलीम खान	:जे शांतता भंग करीत असेल त्यांना सभागृहाच्या बाहेर काढावे.

श्री.किशनचंद तणवानी :आपण पिठासीन अधिकारी आहात. एखादा सदस्य जागेवर बसत नसेल आपल्या आदेशाचे पालन करीत नसेल तर आपल्याला अधिकार आहे त्यांचे निलंबन करावे जेणे करून पाणी प्रश्नावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेता येईल.

श्री.मुजीब खान	:निलंबीत केल्यानंतर कुणी बाहेर जाईल असे वाटू देवू नये आम्ही कमजोर नाही.

सभागृहात मोठमोठयाने बोलणे चालू असते.

मा.महापौर	:स.सदस्य श्री.मुजीब खान श्री.मो.जावेद मो.इसहाक तसेच श्री.सलीम खान यांचे सदस्यत्व आजच्या दिवसाकरीता रद्य करण्यात येत आहे. ही सभा तहकूब करण्यात येते

याचवेळी डायस समोर मोठमोठयाने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.

श्री.किशनचंद तणवानी :स.सदस्य डायस समोर गोंधळ घालत असतील तर त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

मा.महापौर	: ही सभा काही वेळासाठी तहकूब करण्यात येते (वेळ दु. १२.३७ वा. सभेला पुन्हा १२.५५ वा. सुरूवात)

श्री.संजय सिरसाट :काही सदस्यांचे सभासदत्व रद्द केले त्या निर्णयावर आपण कायम आहात काय? कारण ते सदस्य सभागृहात उपस्थित आहे कि दिलेले रूलींग मागे घेतले.

मा.महापौर : दिलेले रूलीग मागे घेतलेले नाही ज्यांचे सभासदत्व रद्द केले त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे.

श्री.मुजीब खान :जो निर्णय घ्यायचा तो आपण घेवू शकता सभागृहात आपला अधिकार आहे परंतु यापूर्वी दोन वेळेस असे झालेले होते मी अक्षेप घेतल्यानंतर असे नाव घेवून स.सदस्यांनी बोलू नये असे आदेशीत आपण केले होते गप्प बसविले आज का तसे झाले नाही. जर मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहे तर असे बोलू न देणे ही आपली जबाबदारी आहे.

मा.महापौर :हे सभागृह शांत ठेवण्याची माझ्या सोबत आपली सुध्दा जबाबदारी आहे वारंवार मी बोलले होते शांत व्हा, जागेवर जा.

श्री. मुजीब खान :सर्वांनाच सांगावे अगोदर त्यांना सागावे नंतर आम्हाला सर्वांनी शांतता ठेवायला पाहिजे.

मा.महापौर :सभासदत्व रद्द केलेले आहे आपण बाहेर जावे.

श्री.मुजीब खान :आम्ही बाहेर जाणार नाही.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने बोलणे चालू असते.

मा.महापौर :सभागृहाच्या बाहेर जाणार नसेल तर सक्तीने आदेश करावे लागतील कृपया आपण बाहेर जावे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक: बाहेर जाणार नाही.आमच्या वर अन्याय होत असेल तर योग्य नाही.

मा.महापौर :असे होत असेल तर आपण सभागृहाचा अपमान करीत आहात.

श्री.सलीम खान :आमची काय चूक झाली सभासदत्व रद्द केले त्याचा खुलासा करावा तरच आम्ही बाहेर जावू.

मा.महापौर :पुन्हा एकदा सुचना करते की आपण सभागृहाच्या बाहेर जावे.नसता सुरक्षा रक्षकांना सांगावे लागेल.सुरक्षारक्षक यांनी त्या संदस्याना बाहेर घेवून जावे.

याचवेळी मोठमोठयाने बोलणे चालू असते.

श्री.किशनचंद तणवानी :जर कुणी गोधंळ घालत असतील व अपमान करीत असतील तर त्यांचे सभासदत्व रद्द करावे.सर्वांना जागेवर बसवावे.

मा.महापौर :ज्या सदस्यांचे सभासदत्व रद्द केले त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे.ज्यांना मत मांडायचे आहे त्यानी आपआपल्या जागेवरून बोलावे.

श्री.संजय जगताप :स.सदस्यांचे निलंबन मागे घ्यावे.

श्री.संजय जगताप :ज्या सदस्यांचे सभासदत्व रद्द केले ते मागे घेण्यात यावे.

श्री.किशनचंद तणवाणी :सभासदत्व मागे घ्यायचे असेल तर त्यांनी जाहीर माफि मागावी.

श्री.संजय जगताप :स.सदस्य माफि मागणार नाही निलंबण मागे घ्यावे

श्री.गजानन बारवाल :स.सदस्य माफि मागत नसतील तर आपण दिलेला निर्णय योग्य आहे आतापर्यत स.सदस्य बाहेर का गेलेले नाही पोलीस आणि प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा.महापौर :सुरक्षा रक्षकांनी स.सदस्यांना बाहेर न्यावे.

याच वेळी पोलीस कर्मचारी सभागृहात प्रवेश करतात.

श्री.संजय जगताप :पोलीस कर्मचारी यांना सभागृहात येण्याची परवानगी आहे का त्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

मा.महापौर :सभागृहातील पोलीस कर्मचारी यांनी सभागृहाचे बाहेर जावे.

श्री.सलीम खान :आमची काय चूक झाली दाखवावी तेंव्हाच बाहेर जावू.

श्री.गजानन बारवाल :दिलेला निर्णय योग्य आहे स.सदस्यांना बाहेर जाण्याचे सांगावे.

श्री.सलीम खान :पोलीस कर्मचारी विना परवानगी सभागृहात कसे आले.

मा.महापौर :महत्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सभा घेत आहोत कोण काय शब्द वापरेल हा ज्यांचा त्याचा अधिकार आहे परंतू इतिवृत्तात नियमाने प्रशासन नमूद करेल.पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे त्यावर बोलावे.

श्री.संजय सिरसाट :या शहराला ------ असे नाव दिले होते.मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले हे जरी खरे असले तरी बदललेले नाही वारंवार या सभागृहात ------ म्हणून नाव उल्लेख होते परंतु मा. न्यायालयाचे आदेश असल्याने इतिवृत्तात तसे येत नाही. ------- नाव घेतल्यावर अनेकांना त्रास होतो संभाजी महाराज यांना आम्ही देवता व आदरणीय मानतो अनेक हिन्दू समाजामध्ये संभाजी महाराजांचे नाव घेतले जाते मुलांचे नाव ठेवले जाते.जे औरंगाबाद म्हणतात त्यांनी त्यांचे मुलाचे नाव औरंगजेब ठेवावे आमचा विरोध नाही . येथे ------ म्हणताच अल्ला हो अकबर अशा घोषणा देण्यात आल्या त्या निषेधार्थ घोषणा आहे.काही सदस्य आम्हाला अटक करून दाखवा किंवा बाहेर काढून तर दाखवा असे जिद्यीने जेंव्हा म्हणातात हे बरोबर नाही स.सदस्यांची वृत्ती कशी असायला पाहिजे याचे नियम दिलेले आहे. एखादया स.स. चे सभासदत्व रद्य केल्यानंतर त्यांनी बाहेर जायलाच पाहिजे.आयुक्त येथे साक्षीदार आहे आपण केलेल्या रूलींगचे पालन व्हावे आपण आदेशीत करून जर सभागृहाच्या बाहेर सदस्य जात नसतील अशा गैरवर्तन केलेल्या सदस्याचे कायमस्वरूपी सभासदत्व रद्य करण्याच्या बाबतीत शासनाकडे रिपोर्ट देण्याचे प्रशासनाला आदेशीत करावी.

श्री.मुजीब खान :खुलासा घ्यावा----------------------

श्री.सतीष कटकटे :ज्यांचे सभासदत्व रद्य केले त्यांना सभागृहात बोलण्याचा अधिकार आहेका?

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने बोलणे चालू असते.

मा.महापौर : प्रत्येक माणून आपल्याला वंदनीय आहे त्यांचे त्यात नाव घेतले असेल तर तो त्या सदस्यांचा स्वत:चा अधिकार आहे.त्यावर अक्षेप घेण्याचा कुणाला अधिकार नाही इतिवृत्तात काय नमूद करायचे ते प्रशासन करेल.

श्री.गजानन बारवाल :सभासदत्व रद्य केलेल्या स.सदस्यांना सभागृहाच्या बाहेर जाण्याचे सांगावे. आता त्यांचे काहीही ऐकूण घेवू नये.

श्री.भगवान घडमोडे :जे स.सदस्य गैरवर्तन करीत असेल त्याचा अहवाल शासनाला पाठवावा व सभागृह सुरळीत चालवावे.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्य जाहीर माफि मागत असेल तर बसू दयावे नसता बाहेर पाठवावे.

मा.महापौर :स.सदस्यांना जे शंब्द वापरायचे ते वापरावे परंतू प्रोसीडींग मध्ये औरंगाबाद असाच उल्लेख येईल.त्याची दखल प्रशासनाने घ्यावी.

श्री.संतोष खेंडके :स.सदस्य यांना बाहेर जाण्यास सांगावे.नसता आम्ही बाहेर जावू

मा.महापौर :स.सभासद सभागृहात गोंधळ घालतात मोठयाने बोलतात म्हणून त्यांचे सभासदत्व रद्य केले सभागृहाचा बराच वेळ वाया गेला त्यांनी सभागृहाची माफी मागवावी.

श्री.मुजीब खान :कोणते वाक्य शब्द मी चुकीचे किंवा स.सदस्यांना बोललो माफी कशासाठी मागवायची.जे बरोबर होते ते सांगण्याचा प्रयत्न केला.

श्री.संजय सिरसाट :एक तासापासून सभागृहात गोधंळ होत आहे अनेक सदस्य टेंबलवर उभे राहून बोलत होते असे असतांना व महापौराच्या रूलींगचा आदर करीत नसेल तर आम्ही सेनाभाजपा स.सदस्य सभात्याग करून बाहेर जात आहोत.

श्री.किशनचंद तणवाणी :जे रूलींग दिले त्याची कार्यवाही व्हावी.

श्री.मुजीब खान :सभागृहात मी महापौर, प्रशासन किंवा सभागृहाला वाईट बोललो नाही गोंधळ मीच करीत नाही.

श्री.तणवानी किशनचंद :ज्या सभासदांचे सभासदत्व रद्य केले त्यानंतर ते जे काही बोलले असतील ते सर्व इतिवृत्तातून वगळावे.

श्री.मुजीब खान :कोणता शब्द मी चुकीने बोललो सांगावा ते शब्द मी मागे घेतो.

मा.महापौर :जेंव्हा पासून ठराव झाला तेंव्हापासून इतिवृत्तात जो नियमाने शब्द औरंगाबाद आहे तो नमूद केला जातो.कुणाला काय बोलायचे तो त्यांचा प्रश्न आहे

श्री.रेणुकादास वैद्य :घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी व्हावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सभा काही वेळासाठी तहकूब करावी.

श्री.तणवानी किशनचंद :किती वेळा सभा तहकूब करणार आहे.

मा.महापौर :सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ १.२० वा. पुन्हा सभा दु.१.५० वा. सुरूवात )

मा.महापौर :आता महत्वाच्या विषयावर चर्चा होणार आहे ज्या नगरसेवकांचे सभासदत्व रद्य केले त्यांनी कृपया बाहेर जावे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक:सभा सुरू झाल्यापासून जो गोंधळ चालू आहे त्यामूळे जे विकास कामाच्या संदर्भात बोलायचे ते राहून गेले त्याबध्दल दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.तणवाणी किशनचंद :दिलगिरी कशासाठी व्यक्त केली सभासदत्व रद्य केल्यानंतर या स.सदस्यांना बोलण्याची आपण परवानगी दिलेली आहे का नसेल तर इतिवृत्तातून हे डिलीट करावे.

मा.महापौर : दिलगिरी कशासाठी व्यक्ती केली स्पष्ट करावे दोन वेळा सभा तहकूब केली सभासदत्व रद्य केल्यानंतर वारंवार सभागृहाच्या बाहेर जाण्याच्या सुचना केल्या सभागृहाचा मान राखायला पाहिजे होता.

श्री.मनमोहनसिंग आबेरॉय:दिलगिरी व्यक्त केल्यानंतर रद्य केलेले सभासदत्व मागे घेणार होते आता मागे घेतनाही याचा अर्थ राजकारण करीत आहात आपण एकापक्षाचे महापौर नाही दिलगिरी व्यक्त केलीतर कार्यवाही मागे घ्यावी अशी विनंती आहे.

मा.महापौर :सभागृहात शांतता रहावी म्हणून वारंवार सर्वाना वेळ दिला होता.

श्री.संजय सिरसाट :स.सदस्य श्री.मुजीब खान हे जेष्ठ सदस्य आहे त्यांचे काम चांगले आहे त्याच प्रमाणे मो.जावेद हे सुध्दा आहे.धुळे जळगाव येथे दंगल झाली एक स्वाभीमान मुस्लीम समाजावर असलेले प्रेम धर्माबध्दल असलेली जागृती आहे त्यांना त्यांचे धर्माचा स्वामीमान आहे तो त्यांनी त्यांनी जागवला पक्षाकडे राजीनामे दिले अपक्ष म्हणून निवडून.आले या सभागृहात अभिनंदन का केले मुस्लीम असूनही जातीचा स्वाभीमान दाखवला आमचा समाज एक आहे आम्ही निवडून येवू शकतो आम्ही आमच्या स्वाभीमानाबध्दल बोलत असेल तर यास विरोध करण्याचे कारण नाही.तुम्ही तुमचा विरोध नोंदवा. सदस्य बोलतांना ------- जरी बोलत असेल तरी इतिवृत्तात औरंगाबाद उल्लेखित होते.बेंचवर उभे राहणे घोषण देणे कुणीच आमचेवर कार्यवाही करीत नाही असे म्हणत असेल तर या सभागृहाचा अपमान आहे.याना शासन झाले पाहिजे नसता जो प्रकार झाला त्याबध्दल त्या सदस्यांनी माफि मागवावी.

श्री.मुजीब खान :धर्म,व्यक्ती किंवा महापौरच्या बाबतीत बोललोच नाही जे सांगतात ते चुक आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहे औरंगाबाद बोलावे ------ नाही एवढेचा उल्लेख केला होता.जो गोधळ झाला तो त्या बाजूने झालेला आहे.

श्री.संजय सिरसाट :सभागृहाच्या कामकाजाची कॅसेट रेकॉर्डीग झालेली आहे त्यात सदस्यानी घोषणा दिलेल्या आहे.

श्री.संतोष खेंडके :आम्ही संभाजीनगर या नावाने उल्लेख करणार आहे.

याच वेळी डायस समोर पुन्हा मोठमोठयाने बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :वारंवार सुचना देवूनही गोंधळ चालू आहे. महत्वाच्या विषयावर चर्चा करायची आहे सभासदत्व रद्द केलेले आहे त्या सदस्यांनी बाहेर जावे.

श्री.गजानन बारवाल :सुरक्षा रक्षक पोलीस कर्मचारी यांना प्राचारण करून स.सदस्यांना बाहेर जाण्याचे आदेशीत करावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:दिलगिरी व्यक्त केल्यानंतर कार्यवाही मागे घेतली जात नाही यांचा अर्थ आपण राजकारण करीत आहे.असे निर्णय घेवून नये सभागृहाचे कामकाज सर्वांनी मिळून चालवायचे असते

मा.महापौर :ज्यांचे सभासदत्व रद्द केले त्यांनी बाहेर जावे सुरक्षा रक्षक यांनी त्यांना बाहेर घेवून जावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :आम्ही कशासाठी दिलगीरी मागावी बाहेरच पाठविणार असेल तर दिलगिरी कशासाठी व्यक्त करायची

मा.महापौर :दिलगिरी सभागृहासाठी शहराच्या विकासासाठी मागवावी केवळ महापौरासाठी नाही.

श्री.मो.जावेद मो.इसहाक:शहराचा विकास ज्यांनी खराब केला त्यांनी आपल्याला या जागेवर बसविले त्यांनीच गोंधळ केला आपणच विकास खराब केला त्यांनीच सभागृहात शांतता भंग त्यांनी केला.

याच वेळी स.सदस्य श्री.मुजीब खान श्री.मो.जावेद कुरैशी तसेच श्री.सलीम खान यांचे सह अनेक आघाडीचे स.सदस्य घोषणा देत सभागृहाच्या बाहेर जातात. (वेळ दु.२.०० वा.)

श्री.किशनचंद तणवानी :शहरात काही ठिकाणी ५-५ दिवस पाणी येत नाही गुलमंडी भागात ३० तारखेला खंड होता १ तारखेला तांत्रिक अडचणीमूळे पाणी आले नाही २ तारखेला खंड ३ तारखेला पाणी येणार परंतू नक्षत्रवाडी मध्ये टेक्नीकल अडचणीमूळे पाणी आले नाही ८-८ दिवस पाणी मिळाले नाही जे पाणी शहरात येते त्यात प्रशासन कशा प्रकारे नियोजन करणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :श्रेयनगर भागात रस्ते विकास मंडळाकडून एका पुलाचे काम चालू आहे कार्यकारी अभियंता, शहर अभियंता यांना बोललो १५ दिवसापासून झांबड इस्टेट भागात गढूळ ,ड्रेनेजचे पाणी येते ४ दिवसापासून पिण्याचे पाणीच आले नाही १५ मिनिटापेक्षा जास्त वेळ पाणी नसते दोन-दोन दिवसाचा गॅप दिला जातो वारंवार संबधीत अधिकारी यांना माहिती देवून सुध्दा कार्यवाही होत नाही. पाणी देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे यास कोण जबाबदार आहे. अधिकारी एक दुस-यावर जबाबदारी असल्याचे सांगतात कनिष्ठ अभियंता म्हणतात उप अभियंता, उप अभियंता म्हणतात कार्यकारी अभियंता जबाबदारी फिक्स करावी की त्या अधिका-याकडे तक्रार देता येईल व नागीरकांना दिलासा मिळेल.

श्री.विनायक पांडे : जास्त पाणी टंचाई बेंगमपूरा या भागात आहे मी निषेध करणार नाही. श्री.एम.डी.सोनवणे व श्री.रामटेके यांनी या भागात पाणी जास्तीत जास्त देणेसाठी प्रयत्न केले ९० टक्के भाग पाणी टंचाईग्रस्त होता तो २५ टक्केवर आलेला आहे. त्यांना धन्यवाद शहरात येणारे पाणी ज्या त्या भागातील

टाकीवर पाणी देणेसाठी वेळा दिलेल्या आहे ती कार्य. अभियंता यांचे अधिपत्त्याखाली हे काम चालते ११ वाजेची वेळ असेल तर रात्री १ वाजेपर्यंत पाणी चालू राहिले तर बेगमपूरा हा भाग शेवटी येतो जे ऐकत नसतील तर त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :नक्षत्रवाडी ते सिडको टाऊन सेटंर जलद जलवाहिनीवरून ३६ एमएलडी पाणी पुरवठा आवश्यक गेल्या वर्षी कमी होत आहे निदर्शनास आणून दिले. होते परंतू गारखेडा भागात या लाईनवरून ४-५ तास पाणी चालू राहिल या धरतीवर क्रॉस कनेक्शन देण्यात आले ते स.९-३० ते रात्री उशीरापर्यंत चालूच असते त्यामूळे  एन-५ च्या टाकीत पुरेसे पाणी येत नाही .एक पंप कायमस्वरूपी बंद आहे.या टाकीवर  जवळ पास १७-१८ वार्ड अवलंबून असून त्यांचा परीणाम या भागात होतो एकदिवसाआड व १ तास ऐवजी ४५ मिनिटे पाणी देत असतांना त्या भागात दोन दिवसा आड पाणी येत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे याचा अर्थ सिडको व शहर वेगळे नाही. यातही तांत्रिक अडचणी येतात ३-४ दिवसाचा गॅप देवून पाणी दिले जाते सिडको आणि शहर वेगळे नाही  सिडकोच्या नागरीकावर सतत अन्याय करायचा हे बरोबर नाही.एन-५ टाकीवरून मरीमाता टाकीवर दीड पटीने पुरवठा होतो चालू राहतो त्यामूळे सिडको हडको असलेल्या १७-१८ वार्डात ही परीस्थिती निर्माण झाली.त्यानंतर शिल्लक राहिल्यास रामनगर ब्रिजवाडी भागात पाणी दिले जाते उर्वरीत पाणी रामनगर ब्रिजवारी भागात दिले जाते. सर्व भागात पाणी देण्या बाबत प्रशासन केंव्हा व कसे नियोजन करणार आहे.सिडको हडको भागातून सर्वात जास्त पाणीपट्टीची वसूली होते मालमत्ता कराच्या बाबतीत सुध्दा असेच आहे शहरात ११० कोटीचे रस्ते करण्यात आले परंतू या भागात साधा एक रस्ता केला नाही  नियमाने ३-४ वर्षानंतर रस्त्याचे डांबरीकरण करायला पाहिजे परंतू गेल्या ६-७ वर्षात ते सुध्दा केलेले नाही.वार्ड ब कार्यालया अंतर्गत येणा-या रस्त्यावरील पॅचवर्क करण्यासाठी निविदा काढली परंतू तो निधी सुध्दा संपूर्ण शहराच्या रस्त्यासाठी खर्च केला या भागात साधे खडडे बुजविली नाही.पाणी पुरवठयावर चर्चा चालू आहे परंतु खर्चाच्या बाबतीत विचार केला तर सर्व सिडको भागातील जनतेच्या पैशावर प्रशासन कामे करीत आहे. कायमस्वरूपी महापालिकेचे कर्मचारी कार्यालयात काम करतात बचत गटांना सफाईचे काम दिले त्यामागे काय संकल्पना आहे कळाले नाही. बचत गटांना फक्त ४५० रूपये मिळातात एवढया कमी रक्कमेत ते चांगले काम करत असतील असे वाटत नाही. कामासाठी कर्मचारी कमी असेल तर दैनिक वेतनावर घ्यावे रॅम्के कंपनीचे काम बंद केले असेल तर पर्यायी व्यवस्था काय केली नुसते ठराव करायचे त्यास विरोध करायचा एक दोन व्यक्तीमूळे जर या भागाकडे दुर्लक्ष होत असेल तर या नागरकांची जबाबदारी कुणाला तरी घ्यावी लागेल.हस्तांतरण करण्यास होकार दिला त्यात चुक झाली का असे वाटेल या पैकी किती कामाची अमलबजावणी प्रशासन करणार आहे यासाठी बजेटची आवश्यकता नाही सुरळीत पणे व संपर्क करून काम करण्याची गरज आहे.एका मजूर कर्मचा-यानी किती काम करावयास पाहिजे वार्डाचे क्षेत्रफळ विचार घेता कर्मचारी असावे याचे नियोजन केलेले नाही त्यामूळे स्वच्छता पाणी व इतर रेग्यूलर कामे होत नाही. बचतगटांना शहरात काम करू दयावे शहरातील कर्मचारी यांना सिडकोत दयावे जे की

बचतगटामार्फत कशा पध्दतीने काम होते हे कळेल.नागरीकांना मुलभुत सुविधा मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कामे झालीच पाहिजे.पाणी पुरवठयाच्या संबधी ठोस निर्णय घ्यावा कार्य.अभियंता यांचेकडून खुलासा घेवून किती वेळ कोणत्या भागाला पाणी मिळणार याचा खुलासा घ्यावा हा प्रश्न मार्गी लावावा.

मा.महापौर :पाणी प्रश्नावर प्राथमिक स्वरूपात मत मांडावे.

श्री.महेश माळवतकर :मार्च मध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता मा.आयुक्त यांनी बैठक घेवून मे महिण्यात पाणी पुरवठा सुरळीत झाला परंतु २० दिवसापासून ४-५ तासाचा उशीरा व सायंकाळी वेळेस देण्यात येणारे पाण्यास गॅप दिला जातो एन-५,७ ची टाकी २० दिवसात भरल्या न गेल्याने सिडको हडकोच्या १७-१८ वार्ड मध्ये पाणी पुरवठा विस्कळीत झाला व वेळेवर येत नाही.याचा त्रास नागरीकांना सहन करावा लागतो येथील वसूली जास्त असतांना जर विकास कामे होत नसेल तर तेथील नागरीकाच्या रोषाला आपल्याला बळी पडावे लागेल.हस्तांतरण झाले त्या बदल्यात २५ कोटी मिळाले परंतू एक रस्ता वगळता सिडकोच्या कोणत्याच भागातील रस्ता विकसीत केला नाही. सेवन हिल पासून ते ताज हॉटेलपर्यत रस्ता हाती घेतला होता, टीव्ही सेन्टरपर्यत झाला पुढील रस्ता का झाला नाही.तसेच सलीम अली सरोवर ते जाधववाडी चौक पर्यत डिफंर पेमेंन्टमधील रस्ता बजेट मध्ये मंजूर केले ते काम रद्द का करण्यात आले.त्या भागातील नागरीक रांगा लावून टॅक्स भरतात सिडकोतील पाणी,रस्ते स्वच्छता व ग्रिन बेल्डची परीस्थिती बाबत प्रशासनाने चौकशी करावी. एन -१३ ते दिल्ली गेट सलीम अली सरोवर ते जाधववाडी,बळीराम पाटील शाळा ते एमजीएम पर्यतच्या रस्त्याची दुर्रावस्था झाली याकडे लक्ष देण्याची गरज आहे सिडको हडको भागात जास्तीत जास्त सदस्य शिवसेना भाजपा पक्षाचे असून सत्ता आपली असतांना या भागात विकास कोमे होत नसेल तर योग्य नाही येणा-या बजेट मध्ये या भागात कामे करण्यासाठी विशेष तरतूद ठेवावी या भागातील विकास कामे झाली पाहिजे पाणी वेळेवर आले पाहिजे.याची दखल ध्यावी.

सौ.रजनी जोशी :हस्तांतरणानंतर या भागात विकास होईल व सिडकोसाठी एक्सप्रेस लाईन टाकल्यानंतर मुबलक पाणी मिळेल अशी अपेक्षा होती परंतु त्यानुसार होत नाही ४ दिवस झाले वार्डात पाणी नाही,आले तरी ४० मिनिट असते टाकी भरली नाही पंप बंद होता अशी उत्तरे मिळतात या भागातील वसुली चांगली असतांना पाण्यासाठी वंचीत राहावे लागते हे बरोबर नाही.पाणी हा महिलाच्या संबधीत जिव्हाळयाचा प्रश्न असतो. पाणी पुरवठयाचे नियोजन प्रशासनाने करावे एक दिवसा आड पाणी केल्यानंतर ६० मिनिटे पाणी देणार होतो त्यानुसार व वेळेवर पाणी मिळावे तसेच या भागात स्वच्छतेकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

श्री.अनिल जैस्वाल :जुन्या शहरात ९० मिनिटे काही भागात दररोज तर सिडकोला ४० मिनिटेच पाणी का? माझे वार्डात विहिरीवरून पाईपलाईन केली विहिरीवर इलेक्ट्रीक मोटार बसवून पाणी दयावे असे आदेशीत केले असतांना कार्यवाही झाली नाही. सिडको भागातून वसुली जास्त होते सिडको भागातील रस्त्यावर मोठमोठे खडडे पडलेले आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.शशांक विसपुते :गारखेडा गजानन,गुरूदत्तनगरला ३-४ महिण्यापासून कमी पाणी मिळते बाजूच्याच वस्तीत जास्तीचे पाणी येते रस्त्यावरून वाहते काही भागात २-३

तास पाणी असते. याचे नियोजन केल्यास सर्वांना समान पाणी मिळू मिळेल आरबी हिल व नाथप्रांगण या भागात ५ वर्षापासून पाईपलाईन टाकली प्रत्येक बिल्डींगला एक कनेक्शन असे ३२ कनेक्शन दयावे असे ठरले होते पाणी नसल्याचे कारण दाखवून दिले नाही त्याच भागात अनधिकृत १०० पेक्षा जास्त नळ कनेक्शन आहे त्याच भागात साहस सोसायटीच्या लाईवरून एका बिल्डरला ३ इंचचे कनेक्शन दिले ते लिगल की अनधिकृत तपासावे तेथे नागरीक नाही तेथील मिळकतींचे भाव वाढले पाणी पुरवठा आहे दाखवतात. याबाबत चौकशी करावी.

श्री.कचरू मोरे :माझा वार्ड स्लम असून व्यवस्थीत पाणी येत नसल्याची संबधीत सर्व अधिकारी यांना तक्रार देवून सुध्दा गेल्या सहा महिण्यापासून नुसते वार्डात येवून माझेशी संपर्क करतात निघून जातात अदयाप नियोजन केले नाही. तसेच एका मुख्य रस्त्याचे १ वर्षापासून टेंडर काम सुरू केले नाही तक्रार देवून सुध्दा कार्यवाही नाही यादोन्ही बाबीकडे लक्ष देवून त्वरीत करण्याचे आदेशीत करावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : जवाहर कॉलनी उल्कानगरी भागात कमी दाबाने तसेच ४-४ दिवस पाणी येत नाही, आलेले पाणी १५ मिनिटे असते तेही गढूळ असते जयनगर म्हाडा कॉलनीत ड्रेनेज पाणी येते निदर्शनास आणून दिले अशा वेळी तात्काळ ते काम हाती घेतले पाहिजे.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :रामकृष्णनगर,व त्या परीसरातील लोक १०० टक्के बेंटरमेंन्ट चार्जेस भरणा करतात सातआठ वर्षापासून या भागात पाणी देण्याची मागणी करीत आहे पाणी दिले नाही.माझे वार्डात डांबरीकरणाचे एकही काम झाले नाही पॅचवर्कचे काम होत नाही तसेच ५२/६ स.न.मध्ये महापालिकेची खुली जागा आहे तेथे एका व्यक्तीने अतिक्रमण केले असून स्वत:च्या नावाने पीआर कार्ड बनवले त्या संबधीत कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते प्रशासनाने अदयाप कार्यवाही केली नाही. टाक्या भरतात. व्यवस्थितपणा नाही. फोन करावा लागतो.

श्री.संजय जोशी एकाच टाकीची ४ मीटर तर दुस-या टाकीत एक मीटरपर्यत लेव्हल नसते रात्री २-३ तास एकाच टाकीत पाणी चालू असते लक्षात आणून दिल्यानंतर व्हॉल बंद करून दुस-या टाकीत चालू केला जातो यात सुरळीतपणा आणला तरी संपूर्ण शहराला समान पाणी मिळेल.नळ कनेक्शन देण्याचे व कट करण्याचे काम वार्ड अधिकारी तर देखभाल दुरूस्ती व पाणी पुरवठा करण्याचे काम पाणीपुरवठा कडे या दोन्ही विभागाचे समन्वय होत नाही. हे दोनही कामे एकाच तांत्रिक विभागाकडे असावीत जेणे करून नागरीकांना कनेक्शन घेण्याचे सोयीस्कर होईल.वार्ड अधिकारी यांना टेक्नीकल माहिती नसल्यामूळे डिस्ट्रीब्युशन लाईन सोडून मुख्य लाईनवर कनेक्शन दिले जाते.पाणी पुरवठाचे कर्मचारी यांना विचारणा केली असता आमचा याशी संबध नाही असे उत्त्तर देतात यात नागरीक व स.नगरसेवकांना त्रास सहन करावा लागतो या बाबतीत योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले :पाणी वाटपाच्या बाबतीत सिडको हडकोच्या नागरीकांवर नेहमीच अन्याय होत आलेला आहे ५-७ वर्षापूर्वी शहरात २४ तास पाणी होते सिडका-हडको तेव्हा ही एक दिवसा आड पाणी होते. परंतु वसुली मात्र १०० टक्के होते.असे असतांना १५ दिवसापासून माझे वार्डात व इतर ही काही वार्डात दोन दिवसा आड पाणी येते वेळेनुसार पाणी न देता केंव्हाही सोडले जाते.

आल्यानंतर कमी दाबाने व कमी वेळ असते. ही पध्दत बरोबर नाही.या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करावा तसेच लाईट लावण्याची व्यवस्थ करावी ड्रेनेज लाईनची कामे वेळेवर करावी स्वच्छतेचे काम दररोज करण्याचे आदेशीत करावे.

श्री.भाउसाहेब ताठे :सिडको हडको भागात एक ते दीड महिण्यापासून पाण्याची टंचाई असून मध्यतंरी मा.आयुक्त यांनी बैठक घेतली त्यानंतर १५ दिवस पाणी पुरवठा सुरळीत झाला १५ दिवसापासून पुर्वीप्रमाणे पाणी येते. सिडको हडको साठी ३५ एमएलडी ऐवजी २३-२४ एमएलडीच येते यातून किराडपूरा व इतर पाच वार्डातही पाणी दिले जाते ३५ एमएलडी पाणी या भागासाठी दयावे व येथील पाणी पुरवठा पूर्वी प्रमाणेच सुरळीत करावा.

श्री.देसरडा प्रशांत :सिडकोला ४५ मि. ऐवजी २०-२५ मिनीटे पाणी येते शिवाय दोन दिवसाआड पाणी येते.आवश्यक उपाययोजना यासाठी करता येवू शकते. माझा वार्ड ५० टक्के सिडकोत व उर्वरीत शहरात येतो. शहरात २४ तास पाणी दिले जात होते असे काहीही नाही परंतु सिडको भागात मोठया प्रमाणात टंचाई आहे.प्रशासनाने सिडकोच्या नगरसेवका समवेत सिडकोच्या पाणी प्रश्नासाठी वेगळी बैठक आयोजित करावी समस्या समजावून घ्याव्यात.वृत्तपत्रात पाण्या विषयी तज्ञाचे मत येते त्याकडे प्रशासनाने लक्ष देवून अभ्यास केला तर मार्ग निघेल तसेच पावसाळयाच्या दिवसात बोरसाठी जे पुर्नभरण करतो त्याचा पूर्ण खर्च महापालिकेने किंवा ज्या काही सेवाभावी संस्था करण्यास तयार असेल त्यांना काम दयावे रेनवाटर हर्वेस्टींग महापालिकेने करावे.त्यांचा परीणाम पुढील उन्हाळयात लगेच दिसून येईल अनेक विकास कामे ही निधी अभावी थांबलेली आहे परंतू शासनाच्या एका वरीष्ठ अधिकारी यांनी महापालिकेला पत्र दिले की पाणी टंचाईच्या परीस्थितीस मात करण्यासाठी जर शासनाच्या मार्फत जर या विभागाकडून काही मदत हवी असेल तर त्या संदर्भात तसे कळवावे १५-२० दिवसापूर्वी पत्र आले असेल त्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली खुलासा घेण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे :सिडको हउको व इतर सर्वच वार्डात पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :पिण्याचे पाणी विषयी जशा सदस्यांच्या भावना तिव्र आहे त्याच बरोबर स्वच्छताही होणे महत्वाचे आहे बचत गटाना काम दिल्यापासून स्वच्छतेचे कर्मचारी साफसफाई करतांना रस्त्यावर दिसून येत नाही. बचत गटावर कुणाचे कन्ट्रोल आहे ते प्रेक्षक गट होवू नये बचतगटाचे कर्मचारी काम करीत नसेल तर त्यांना शहरात नियुक्त करावे मनपाचे कर्मचारी सिडकोत पाठवावे. सिडकोत अनेक रस्त्यावर, मोकळया जागा, नालेवरील जागावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले आहे ते काढावे यामूळे रस्त्याची कामे करता येत नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

मा.महापौर :शहरातील पाणी टंचाई,स्वच्छता,अतिक्रमण तसेच विकास कामाच्या संदर्भात सदस्यांनी आपआपले मत मांडले त्या बाबतीत मा.आयुक्तांनी सविस्तर खुलासा करावा.

मा.आयुक्त :पाणी प्रश्नाबाबत स.सदस्यांच्या भावना तिव्र आहेत. पाणी व स्वच्छता हे अत्यंत महत्वाचे आहे. शहराचा वाढलेला विस्तार,लोकसंख्या,जुनी झालेली पाईप लाईन ई.बाबत मला कल्पना आहे. मा.महापौर यांनी मुंबईला एमजीपीचे सचिव यांचेशी या समातंर जलवाहिनीच्या संदर्भात चर्चा केली

होती काम मार्गी लागण्याच्या दृष्टीने कार्यवाही होत आहे त्यानुसारच अमलबजावणी करण्यासाठी आज प्रस्ताव सादर केला आहे पाणी पुरवठा कमी होणे किंवा कमी दाबाने पाणी येणे हे दोन भाग पाणी टंचाईचे आहेत.उपाययोजना म्हणून मार्गदर्शन घेतले असता हायड्रोलिक मॉडेल केल्याशिवाय गत्यंतर नाही असे या क्षेत्रातील अधिकारी यांनी म्हटले आहे.वृत्तपत्रात पाणी प्रश्नाविषयी काही लेख येतात त्याचे मी वाचन करीत असतो इजिनिअरीग कॉलेजचे दोन प्राध्यापक यांनी लिहिलेला लेख वाचून मी शहर अभियंता यांचेशी चर्चाही केली. यावर उपायोजना काय यासाठी प्रशासनाने हायड्रोलिक मॉडेल चा ठराव ठेवलेला आहे.१४३ कोटी शासनाकडे समांतर जलवाहिनीसाठी आलेले आहे ४० कोटीमध्ये कांचनवाडी पासून पाईपलाईन टाकायची आहे शासनाने २८ कोटी मंजूर केले विषय असा येतो की यात सर्वांच्याच अडचणी आहे ज्या अडचणी मांडल्या त्या बाबतीत तांत्रिकदृष्टया काय करता येईल याकडे लक्ष दिले जाईल. तांत्रिक दृष्टया माहिती शहर अभियंता देतिल ज्या सुचना सदस्यांनी केल्या त्यानुसार पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार असेल तर तो प्रयोग प्रशासन करेल यात शंका नाही.तीन प्रस्ताव सादर केलेले आहे त्यावर विचार करून मान्यता व्हावी शहरातील कच-यांची व्यवस्था कशी होते याची मी प्रत्यक्ष शहरात फिरून पाहणी केली समाधानकारक वाटली नाही. त्यानंतर वेळापत्रक तयार केले सात अधिकारी प्रत्येक दिवशी सात दिवसाकरीता प्रत्यक्ष त्या भागात पाहणी करण्याकरीता नेमून दिलेले आहे.प्रत्येक दिवशी पाहणी करून त्यांचे निष्कर्ष नोंदणी होवून अहवाल येतो.त्याची प्रत वार्ड अधिकारी यांचेकडे जाते.यामुळे १०० टक्के प्रश्न सुटेल असे नाही परंतु प्रशासनाने हा केलेला एक प्रयत्न आहे यात काही वाढ करायची असेल तर प्रशासन करण्यात तयार आहे.नाल्याचे गटारीचे प्रॉब्लेम आहे मी स्वत: पावसाळयाच्या सुरूवातीला पाहणी केली होती नाला किंवा नालीतून काढलेला गाठ बाजूलाच जास्त वेळ न ठेवता लगेच उचलून कचरा डेपोकडे पाठवण्याच्या सुचना दिल्या त्याची ७०-७५ टक्के अमलबजावणी होते आहे.शासनाकडील आलेले अनुदान आले ते किमान पुढील वर्षापर्यत शिल्लक राहू नये पुढील मार्च महिण्याच्या अडचणी अशाच प्रकारे मांडल्या जावू नये त्यासाठी आतापासून उपाययोजना करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहेत या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर तात्काळ उपाययोजना केल्या जातील कायमस्वरूपी ज्या उपाययोजना आहे त्या करणे गरजेचे आहे असे प्रशासनाचे मत आहे.

मा.महापौर :हायड्रोलिक मॉडेलची आवश्यकता असून त्वरीत कार्यवाही करणार आहोत असे प्रशासनाने म्हटले आहे हे जरी सत्य असले तरी ज्या अडचणी येतात त्यासाठी त्वरेने नियोजन करणे गरजेचे आहे.प्रशासनाने शहरातील संपूर्ण पाणी पुरवठा सुरळीत करून पुरेसे पाणी दयावे सर्व टाकीमध्ये सारख्याच लेव्हलने पाणी भरावे जेणे करून सर्वाना पाणी मिळेल.सिडको हडको भागातील स्वच्छतेकडे प्रशासनाने लक्ष दयावे.या भागातील स.सदस्यां सोबत मा.आयुक्तांनी एका बैठकीचे आयोजन करून त्या भागातील समस्या जाणून घ्याव्यात.तसेच शहरातील स.सदस्या समवेत बैठक घेवून समस्या जाणून घेवून काम करता येईल अशी कार्यवाही करावी.स.नगरसेवकांनी तक्रार केल्यानंतर ते काम माझेकडे नाही दुस-या विभागाचे आहे अशी उत्तरे

सदस्यांना मिळतात याबाबतीत प्रशासनाने दखल घेवून त्या त्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करावी.

**विषय क्र.४९९ :**

दिनांक १२.०२.२००९ (दिं.१९.९.२००९ ची तहकुब सभा (का.प.क्र.२१),दि.१२.०२.२००९ (का.प.क्र.२२), दि.०२.०३.२००९,व दिं.२५.०३.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : दिनांक १२.२.२००९ रोजीच्या इतिवृत्तातील विषय क्र.४१६ संदर्भात यापुर्वीच बोललो होतो या ठरावातील उद्यान स्वतः ते व्यक्ती डेव्हलप करणार व बाजुला कव्हर पार्कींग गाडया लावण्यासाठी करणार होते. ठरावात तसे नमुद केले नाही. तशी दुरूस्ती करावी.

श्री.गजानन बारवाल : दिं.१२-२-२००९ च्या इतिवृत्तातील पानक्र.३ वर वार्ड ड कार्यालय स्थलांतर करण्यासाठी स.सदस्यांना प्रशासनाने बोलवून त्यांचे सुचना विचारात घेवून सर्वांना सोईनुसार पडेल अशा इमारतीमध्ये स्थलांतर करण्याचे आदेशीत केले व अहवाल सादर करावा असे म्हटले त्या संदर्भात अहवाल आला आहे का?

मा.महापौर : वार्ड ड कार्यालयाची जागा चांगली नाही मधल्या काळात छत पडून एक मुलगी जखमी झाली होती.आताच स.सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे मागिल बैठकीत हे कार्यालय स्थलांतर करण्याच्या सुचना दिल्या होत्या परंतु कार्यवाही केली नाही आता त्वरीत हे कार्यालय स्थलांतर करून सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या.

श्री.सतीष कटकटे :४ महिण्यापूर्वी आदेशीत केले होते संबधीत अधिकारी यांनी कार्यालय स्थलांतर करण्याची कार्यवाही का केली नाही. छताचा काही भाग डोक्यावर ही पडला होता.

मा.आयुक्त :येत्या सात दिवसात म्हणजे ३० तारखेपर्यत वार्ड ड कार्यालय स्थलांतर करण्या संदर्भात प्रस्ताव सादर होईल.

श्री.गजानन बारवाल :याच इतिवृत्तातील पान क्र.१० वर सन २००८-०९ या वर्षात वार्डनिहाय कोणती कामे केली, कोणती चालू आहे, किती कामाचे अंदाजपत्रक झाले किती कामाचे टेंडर काढले याची माहिती ठेवण्याचे आदेशीत केले होते माहिती आलेली आहे का ?

मा.महापौर :सभागृहात जे आदेशीत केले जाते त्याची अमलबजावणी होते की नाही हे बघणे प्रशासनाचे काम असते.माहिती प्रशासनाने ठेवावी सर्व स.सदस्यांना त्याची प्रत देण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :पान क्र. २३ वर विषय क्र. ४२१ च्या संदर्भात प्रशासनाने या संबधी ताबडतोब प्रपोजल तयार करावे केंद्र शासनाकडे पाठवावे निधी ताबडतोब मिळ शकतो. असे म्हटले तसा प्रस्ताव तयार केला आहेत का ?

संचालक(प्रांणी संग्रहालय) : प्रांणी संग्रहालयात संरक्षित भिंत तसेच हत्तीसाठी हौद करणे बाकी होते. हया सर्व कामाचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडे पाठविले आहे त्यानंतर लेखा विभागाकडे पाठविले.

मा.आयुक्त :केंद्र शासनाकडे पाठवायच्या प्रस्तावात काही अटी होत्या त्या पॅरामीटरस मध्ये बसवून प्रस्ताव करावा लागणार आहे काही जागेची आवश्यकता होती सिध्दार्थ उदयानची काही जागा उपलब्ध आहे आता नावांचा प्रश्न आहे सिध्दार्थ उदयान व प्राणीसंग्रहालय म्हणावे लागेल. जागेचे नियोजन कसे

करणार ठरावात ठेवले ठराव पूर्णत:तयार आहे मंजूरी मिळाल्यानंतर लगेच केंद्र शासनाकडे पाठविला जाईल.

श्री.गजानन बारवाल :दिं.२-३-२००९ रोजीच्या इतिवृत्तातील पान क्र.५ वर मालमत्ता अधिकारी यांना बरोबर माहिती देता आली नाही या बाबतीत अभ्यास करावा या विषयीची माहिती घेवून ताबडतोब संबधीतावर मा.आयुक्तांनी गुन्हे दाखल करावे गुन्हे दाखल केले असे आदेशीत केले होते कार्यवाही केली का ?

श्री.सतीष कटकटे :जाफरगेट रविवार बाजारच्या जागे संबधी आपण रूलीग दिले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे का असेल तर ताबा घ्यावा भरवता येईल नसता पावसाळा सुरू झाल्यानंतर अभिनय टॉकीज ते अंगुरीबागच्या रस्त्यावर बाजार भरेल.

श्री.गजानन बारवाल :या जागेच्या प्रकरणात महापालिकेची फसवणूक झालेली आहे संबधीतावर गुन्हे दाखल करावे. मा. न्यायालयाने आदेशीत केलेले आहे.

मालमत्ता अधिकारी :जाफरगेट आठवडी बाजारच्या जागे संदर्भात विषय होता.गेल्या वेळेस असे निवेदन केले की या जागेवर इतर खाजगी लोकांनी पीआर कार्ड नावे टाकून घेतली आहे या विभागाने नगररचना विभाग तहसिल कार्यालय तसेच भुमि-अभिलेख कार्यालयाकडे सखोल चौकशी केली असून सदर संचिका श्री. पानझडे साहेब यांचेकउे चौकशीसाठी दिली होती ती संचिका परत आली आता भुमि अभिलेख विभागाकडे महानगरपालिकेची मुळ कागदपत्रे व जो फेरफार केलेला आहे त्याची कागदपत्रे मिळविण्याची कार्यवाही चालू आहे सर्व कागदपत्रे मिळाल्यानंतर संबधीत विभागाकडे महापालिकेचे नाव लावून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सतीष कटकटे :नगरपरिषदेच्या काळात श्री.अग्रवाल कडून ही जागा खरेदी केली सन २००६-०७ पर्यत पीआर कार्डवर महाराष्ट्र शासनाचे नाव होते त्यानंतर दुसरे व्यक्तीचे नाव कसे लागले जाते.त्या जागेवर बांधकाम चालू आहे रोखले जात नाही बाजारची वसुली करू दिली जात नाही.वेळोवेळी पत्र दिले कार्यवाही केली नाही.जागा महापालिकेची नसेल तर बाजार कोणत्या नियमाने भरला जातो पावसाळा लागला बसायला जागा नाही लोक रस्त्यावर बसतात.

मा.आयुक्त :या विषयी अधिकाऱ्यांशी चर्चा केली फेरफार घेतांना नोटीस दिल्याशिवाय कुणाचेही नाव कमी करता येत नाही महाराष्ट्र शासनाचे नाव असेल तर जिल्हाधिकारी यांना दखल घेवून कार्यवाही करावी लागेल महापालिकेचा कब्जा असेल व नाव कमी झाले असेल तर अपील करावे लागेल व त्या प्रकरणाचे गांभीर्य बघून फौजदारी कार्यवाही करावी लागेल.जोफेरफार झाला त्याच्या प्रति मागविल्या आहे कुणाच्या अर्जानुसार फेरफार झाला नाव डिलीट झाले का ते डिलीट करण्यापूर्वी नियमाप्रमाणे नोटीस दयावी लागते ती दिलेली आहे हे बघणे आहे.

श्री.गजानन बारवाल : २४ लक्ष रूपयात महापालिकेने जयराम सांळुके यांचेकडून जागा घेतली ती दुस-यांची आहे फसवणूक केली त्यांचेवर काय कार्यवाही केली.

मा.महापौर :संबधीतावर गुन्हा नोंदवावा असे म्हटले होते गुन्हा नोंदविला किंवा नाही हे प्रशासनाने बघून घ्यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : पान क्र.५ वर दशमेशनगर,गजानननगर,जुनी एसबीएस कॉलनीतील महापालिकेच्या जागा ताब्यात घेण्याचे आदेशीत केले होते त्या प्रमाणे कार्यवाही झालेली आहे का ?

मा.आयुक्त :एकूण १८८९ जागेला महापालिकेचे नाव लावणे होते.

श्री.रेणुकादास वैद्य :स्पेशीफिक माझे वार्डातील जागेच्या संदर्भात बोलतो ४ वर्षापासून या जागेला महापालिकेचे नाव लावावे म्हणून पत्र देत आहे कार्यवाही झाली नाही.दशमेश नगरच्या कॉर्नरला अतिक्रमण झाले त्या जागेला टॅक्स लावण्यासाठी संबधीतांनी अर्ज केला अशाच प्रकारे टॅक्स लावून जागा बळकावण्याचे रॅकेट या शहरात आले या बाबतीत योग्य ती कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :शहरात अशा अनेक महापालिकेच्या मालकीच्या व मोक्याच्या जागा आहेत केवळ प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामूळे या जागावर अतिक्रमण होत आहे.

मा.आयुक्त :स्पेसीफिक माहिती विचारलेली आहे संबधीत जे असतील त्यांनी खुलासा करावा.

मा.महापौर : ज्या वेळेला माहिती दयायची त्यावेळी कोणत्या अधिका-यांनी माहिती दयायची हे सुध्दा समजत नाही विषय सभागृहासमोर येत नाही.अनेक दिवसापासून ही परीस्थिती अशी आहे यावर अनेक वेळा सभागृहाने नाराजी व्यक्त केली परंतु अधिका-यामध्ये फरक पडलेला नाही.याकडे प्रशासनाने त्वरेने लक्ष घालावे व या प्रकरणाचीच नव्हे तर इतर प्रकरणात अधिकारी हे अतिशय दक्ष असले पाहिजे सर्वसाधारण सभेत निर्णय झालेले असतील प्रशासनातील अधिकारी यांना कार्यवाही करण्यास पुरेसा वेळ मिळतो असे असतांना अधिकारी जर काम करीत नसतील तर त्यांचेवर आयुक्तांनी कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :गजानननगर खुल्या जागेच्या संदर्भात मा.न्यायालयात आज बोर्डावर केस होती नेहमी प्रमाणे महापालिकेचे वकील तेथे गैरहजर आहे. जी काही कागदपत्रे महापालिकेकडे असेल ती सादर करण्याचे आदेशीत केले आहे तीन वेळेस पासून महापालिकेचे वकील गैरहजर आहे विरोधी पार्टीकडून यामूळे निकाल लागू शकतो.हे जाणीव पुर्वक केले जाते असा माझा आरोप आहे. आपले वकील ३ तारखेपासून सतत गैरहजर आहेत.

मा.आयुक्त :जे मुद्दे मांडले त्याची माहिती पुढील सात दिवसात लेखी स.सदस्यांना देण्यात येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :रस्ता तयार करतांना अनेक रस्त्यावरील झालेले अतिक्रमण काढण्याचे धाडस केले जात नाही. अनेक केसेस कोर्टात आहे.संबधीत वकील मिळालेले आहे.जकातचे प्रकरण सोडले तर मा.न्यायालयात महापालिकेच्या बाजूने निकाल लागलेला दिसत नाही.

श्री.देसरडा प्रशांत :नगरपालिकेपासून आजपर्यत महापालिकेच्या मालमत्ता किती पत्र देवून माहिती मागविली होती दिली नाही त्यानंतर दिं. २-३-२००९ च्या बैठकीत पान क ४ वर मुद्दा उपस्थित केला असता मा.महापौर यांनी प्रत्येक वेळी असे का होते यास मा.आयुक्त सर्वस्वी जबाबदार आहे यापूढे अशी दिरंगाई होवू नये ज्या अधिका-यांनी टाळाटाळ केली केलेली आहे त्यांचेवर कडक कार्यवाही करावी त्यांना निलंबीत करण्या बाबत कार्यवाही करावी असे आदेशीत केले होते कोणते अधिकारी निलंबीत केले याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त :महापालिकेच्या निलंबीत अधिकारी कर्मचारी यांची जी माहिती आहे त्यामध्ये अशा प्रकरणात कोण अधिकारी निलंबीत झाल्याचे माहित नाही सभागृहाने निलंबीत करण्याचे आदेशीत केले असेल व कार्यवाही झाली नसेलव कोणत्या अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली जबाबदारी

फिक्स झाली असेल तर ७ दिवसात निलंबणाची कार्यवाही होईल किंवा उदयाच कार्यवाही होईल जर अधिकारी कोण जबाबदार आहे हे निष्पन्न झाले नसेल कारणे दाखवा नोटीस देवून १४ दिवसाची मुदत देवून जेवढा कालावधी लागतो तो देवून १५ व्या दिवशी कार्यवाही केली जाईल.

श्री.अनिल जैस्वाल शिवनेरी कॉलनीत महापालिकेच्या खुल्या जागेवर एका व्यक्तीने स्थगिती आणली तो स्थगिती आदेश उठवावा म्हणून अधिकारी यांना वारवांर सुचना केली कार्यवाही झाली नाही १५ लक्ष खर्च करून महापालिकेने सभागृह बांधले चांलू असलेले काम त्या व्यक्तीने बंद केले.

मा.महापौर :आताच स.सदस्य यांनी सुचना केल्याप्रमाणे या जागेच्या संदर्भात मा.आयुक्तांनी स्वत:लक्ष देवून कार्यवाही करावी.

श्रीमती कला बोरामणीकर:समर्थनगर पुष्पनगरीकडे जाणा-या रस्त्याचे काम अर्धवट आहे ते करण्यात यावे तसेच समर्थनगरभागात महापालिकेच्या जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण केले दोन मातीची घरे बांधली माझे मालकीची जागा महापालिकेकडे आहे अशी त्याची मागणी आहे या बाबतीतही तात्काळ कार्यवाही करावी.

मा.महापौर :या बाबतीतही प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी सदरचे अतिक्रमण त्वरीत काढावे.

श्री.रविकांत गवळी :भुखंडाचा विषय ४-५ वर्षापासून चर्चेला येतो निर्णय होवून अदयाप ठोस कार्यवाही झाली नाही आताच मा.आयुक्तांनी म्हटले की सर्वच बाबतीत ७ दिवसात कार्यवाही होईल त्याबध्दल त्यांचे अभिनंदन १५-२० वर्षापासून अनेक नागरीकांनी तक्रार देवून सुध्दा कार्यवाही नाही. भुखंड क्र.१७ सि.स.नं. १५८४९यामध्ये १९८५ ला लेआउट मंजूर झाला १९८६ मध्ये लेआउटमधील अंतर्गत रस्ते व खुली जागा महापालिकेला हस्तांतर करून देण्यात आले.या जागेला अदयाप महापालिकेने नाव लावून घेतले नाही काही भुखंड धारकांनी त्या जागेवर बांधकाम परवानगी घेवून काम सुरू केले प्रशासनाने काय कार्यवाही केली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :स्थायी समितीमध्ये भुखंडा संदर्भात चर्चा होवून निर्णय होतात`.त्या काय कार्यवाही होते लक्ष दिले जात नाही स्थायी समिती जे निर्णय घेते ते बरोबरच असते असे नाही.

श्री. रविकांत गवळी :स्थायी समितीमध्ये हा विषय झालेला नाही या ओपनस्पेसवर ४० वर्षापासून असलेले देवीचे मंदीर आहे महानगरपालिकेची खुली जागा आहे. का नाव लागले नाही.

मा.आयुक्त :एखादया जागेवर नाव लावणे व ताबा असणे यास ही कायदेशिर प्रक्रिया असते. महापालिकेला सुध्दा नाव लावून घ्यायचे असेल तरी एमएलआरसी कोड मध्ये जी तरतूद आहे त्या मार्गाने जावे लागेल.नाव का लागले नाही, व नाव लावण्यासाठी अर्ज देवून त्याचा पाठपुरावा करुन नाव लावून घेणे हा दुसरा विषय समोरची पार्टी अपील मध्ये गेल्यास महापालिकेला सुध्दा अपीलमध्ये जावे लागेल दिवाणी दावा झाल्यास मा. न्यायालयात जावून महापालिकेला पुरावा सिध्द करून दाखववावा लागेल.

आपली भावना समजू शकतो महापालिकेची जागा आहे नाव निश्चित लागले पाहिजे जर स्टे असेल तर तहसिलदार ते अतिरिक्त आयुक्त कार्यालयापर्यतची प्रोसेस करून कार्यवाही करावी लागेल.

श्री.रविकांत गवळी :अनेक दिवसापासूनचा प्रश्न आहे. नागरी समन्वय समिती १८ वर्षापासून पाठपूरावा करते. या जागेवर महापालिकेने आपले नाव लावून घ्यावे पीआर कार्डवरील नाव कमी करण्यास तयार आहेत असे संबधीत विभागाने महापालिकेला कळविले अदयाप कार्यवाही नाही.

श्री.रविकांत गवळी :अदयाप नाव लागलेले नाही महापालिकेने सुध्दा ही ओपनस्पेस महापालिकेची असून हस्तांतर करून घेतलेली आहे नाव लावून घेण्याची प्रोसेस चालू आहे असे दिले ८ वर्ष झाले नाव लावले जात नाही.

मा.महापौर :या जागेच्या बाबतीत मा.आयुक्त यांनी स्वतः गांभीर्याने घेवून तात्काळ या बाबतीत कार्यवाही करावी.

श्री.सतीष कटकटे :दि.१२-२-०९ च्या इतिवृत्तातील विषय क्र.४११ मध्ये सदरील कमानीस कै.प्रभाकरराव सुभेदार नांव दिले आहे व त्या लगतच्या रस्त्यास नाव देण्यात यावे अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : इतिवृत्त दुरूस्तीसह मंजुर

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सर्वसाधारण सभा इतिवृत्त दिनांक १२.२.२००९ प्रस्ताव क्रमांक ४१६ मध्ये खुल्या जागेच्या बाजुला वाहने पार्कींग करण्यासाठी खुल्या जागेचा विकास करणार यांनी त्यांच्या खर्चाने कव्हर पार्कींग करावी तसेच विषय क्र.४११ मध्ये कमानीस व रस्त्यास कै.प्रभाकरराव सुभेदार नांव देण्याच्या व इतर दुरूस्तीसह दिनांक १२.०२.२००९ (दि.१९.०१.०९ ची तहकूब सभा (का.प.क्र.२१), दि.१२.०२.२००९ (का.प.क्र.२२),दि.०२.०३.२००९ व दि.२५.०३.२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**विषय क्र.५०५ :**

महाराष्ट्रातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधीन शासन क्र. कडोमपा-१००६/ प्र.क्र. १९२/२००६ नवि-२८ दिनांक २/३/२००९ अन्वये सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

उक्त शासन निर्णयानुसार नागरी पोलीसांची योजना महानगरपालिकांकरीता अनिवार्य व नगरपालिकांकरिता ऐच्छिक करण्यात आली आहे. नागरी पोलीस यंत्रणा उभी करण्यासाठी संबंधीत महानगरपालिका/नगरपालिकांकडून स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पदे निर्माण करण्यासाठी प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल. तसेच विशेष पोलीस ठाणे स्थापन करण्यासंबंधी महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर करण्यात येईल.

विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी संबंधीत महानगरपालिका/नगरपालिकांकडून स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल.

नागरी पोलीस, विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालयांसाठी प्रस्ताव सादर करतांना विविध वर्गाच्या महानगरपालिका/नगरपालिका (विवरणपत्र-अ,ब,क) मध्ये दर्शविलेल्या संभाव्य आकृतीबंधाचा विचार करू शकतील. या संबंधाने सोबत जोडलेल्या आकृतीबंधानुसार औरंगाबाद महानगरपालिका करीता ड वर्ग महापालिका असल्याने.

१. नागरी पोलीस यंत्रणेसाठी अधिकारी/कर्मचारी असे एकुण ५३ पोलीस कर्मचारी
२. विशेष पोलीस स्टेशन यंत्रणेसाठी अधिकारी/कर्मचारी असे एकुण १७ पोलीस कर्मचारी
३. विशेष न्यायालय यंत्रणेसाठी मा.न्यायाधीश, अधिकारी/कर्मचारी असे एकुण ०९ कर्मचारी

कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध विचारात घेऊन वरील प्रमाणे नागरी पोलीस यंत्रणा, विशेष पोलीस ठाणे, व विशेष न्यायालय बाबत स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याच्या जबाबदारी स्विकारण्यासहचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर मंजुर ठराव शासनाकडे वरील प्रमाणेच्या आकृतीबंधानुसार नागरी पोलीस यंत्रणा, विशेष पोलीस ठाणे, विशेष न्यायालया संबंधाने पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर करण्यात येईल.

**<u>संवाद :</u>**

श्री.प्रशांत देसरडा :अतिक्रमण व विशेष न्यायालय असे दोन विषय आहे अतिक्रमण संदर्भात अनेक प्रकरणे महापालिकेची न्यायालयात प्रलंबीत आहे न्यायालय व्हावे म्हणून गेल्या ४-५ वर्षापासून मागणी होत आहे.जी पदे निर्माण करायची व एकूण १७ पोलीस भरती करायचे असे यात दिसून येते ही पदे अतिक्रमण विभागाशी निगडीत असल्यामूळे ५-६ वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपास कर्मचारी भरती करावे त्यांचे इतरत्र ठिकाणी बदल्या होणार नाही.

मा.आयुक्त :पदाला मंजूरी देत आहोत कोणत्या व्यक्तीला किती कालावधीसाठी ठेवायचे याला मंजुरी देत नाही पदाला मंजुरी स्थायी स्वरूपाचीच घ्यावी लागेल अधिकारी कर्मचा-याच्या बदल्या होतच राहतील.

श्री.गजानन बारवाल :प्रत्येक वर्षी पोलीस यंत्रणेवर बराच खर्च होतो.चांगला प्रस्ताव आहे तसेच महापालिकेचे स्वतंत्र न्यायालय होण्यासाठी जागेची पाहणी केलेली होती जो विषय घेतलेला आहे तो त्यांचाही विचार व्हावा.

सौ.लता दलाल :यापुर्वी असा विषय येवून त्यास मंजूरी ही दिली होती पोलीस चौकीसाठी टाउनहॉलमध्ये जागा दिली होती तसेच न्यायालयासाठी सुध्दा न्यायालयाने दिलेले निर्देशानुसार जागा ठरविली होती तरी पुन्हा विषय का आला याचा खुलासा व्हावा तसेच खाजगी सेक्युरिटी मध्ये सर्वच माजी सैनिक असतात असे नाही. खरे तर माजी सैनिकासाठीच खाजगी सेक्युरिटीचा आपण विचार केलेला होता.त्याऐवजी होमगार्डची मागणी केली तर ते मिळू शकतील जे माजी सैनिकाचा समोवश असावा.

मा.आयुक्त :पुर्वीचा प्रस्ताव काय होता मी बघीतला नाही परंतू शासनाकडून नुकतेच एक पत्र प्राप्त झाले. पदे ठरविली आहे. महापालिकेला अंदाजे खर्च किती येणार हे दिलेले आहे. ही महापालिका ड वर्गात असल्यामूळे एक एपीआय दोन पीएसआय ८ हेड कॉन्स्टेबल असे दिले आहे पुर्वी असे दिले नव्हते त्यामूळे सविस्तर प्रस्ताव ठेवला आहे तसेच न्यायालयाच्या बाबतीत सुध्दा त्या महापालिकेचे किती कामकाज बघून कुठल्या स्तराचे न्यायालय तसेच लघुटंकलेखक वगैरे दयावे याचा सविस्तर प्रस्ताव शासनाने आपल्याक डे पाठविलेला होता हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर विधी व न्याय विभागाकडे जाणार आहे.त्याची मंजूरी येईल त्यानंतर पूढील कार्यवाही होईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी असा प्रशासनाच्या माध्यमातून प्रस्ताव आला होता त्यावर चर्चा होवून मान्यता ही दिली होती.परंतु आता शासनाच्या नवीन परीपत्रकानुसार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले असेल किंवा नसेल याची कल्पना नाही परंतु पुर्वीचा प्रस्ताव काय आहे व हा प्रस्ताव एक तर पुर्वीचा रद्य करावा यास मंजूर करावे.

मा.आयुक्त :शासनाने प्रत्येक महापालिकेला यासाठी किती कर्मचारी वर्ग देता येईल हे सर्व मेन्शन करून दिले आहे.शासनाकडून आलेल्या परीपत्रकाच्या अधारीत हा प्रस्ताव आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : पुर्वीचा प्रस्ताव रद्द करून हा मंजूर करावा.

मा.महापौर : शासनाने प्रस्तावित केलेल्या आकृतीबंधाला मान्यता देत आहोत. त्या प्रमाणे कर्मचारी वर्ग मिळावा म्हणून शासनास प्रस्ताव देत आहोत. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महाराष्ट्रातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधीन शासन क्र. कडोमपा-१००६/प्र.क्र.१९२/२००६नवि-२८ दिनांक २/३/२००९ अन्वये सूचना निर्गमीत करण्यात आल्या नुसार नागरी पोलीसांची योजना महानगरपालिकांकरीता अनिवार्य व नगरपालिकांकरिता ऐच्छिक करण्यात आली असल्यामूळे,नागरी पोलीस यंत्रणा उभी करण्यासाठी संबंधीत महानगरपालिका/नगरपालिकांकडून स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पदे निर्माण करण्यासाठी प्रस्ताव गृह विभागाकडे सादर करणेसाठी तसेच विशेष पोलीस ठाणे स्थापन करण्यासंबंधी महानगरपालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर करण्यास व विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी संबंधीत महानगरपालिका/नगरपालिकांकडून स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर करणेस आणि नागरी पोलीस, विशेष पोलीस ठाणे व विशेष न्यायालयांसाठी प्रस्ताव सादर करतांना विविध वर्गाच्या महानगरपालिका/नगरपालिका (विवरणपत्र-अ,ब,क) मध्ये दर्शविलेल्या संभाव्य आकृतीबंधाचा विचार करू शकतील. या संबंधाने खालील आकृतीबंधानुसार औरंगाबाद महानगरपालिका करीता ड वर्ग महापालिका असल्याने.

१. नागरी पोलीस यंत्रणेसाठी अधिकारी/कर्मचारी असे एकुण ५३ पोलीस कर्मचारी
२. विशेष पोलीस स्टेशन यंत्रणेसाठी अधिकारी/कर्मचारी असे एकुण १७ पोलीस कर्मचारी
३. विशेष न्यायालय यंत्रणेसाठी मा.न्यायाधीश, अधिकारी/कर्मचारी असे एकुण ०९ कर्मचारी

कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध विचारात घेऊन वरील प्रमाणे नागरी पोलीस यंत्रणा, विशेष पोलीस ठाणे, व विशेष न्यायालय बाबत स्थायीरित्या पूर्ण खर्च उचलण्याच्या जबाबदारी स्विकारण्यासह मंजुरी देण्यांत येते, तसेच हा ठराव शासनाकडे वरील प्रमाणेच्या आकृतीबंधानुसार नागरी पोलीस यंत्रणा, विशेष पोलीस ठाणे, विशेष न्यायालया संबंधाने पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००६-०७ नुसार रक्कम रू.१४,७७,७८५/- एवढयाचे अंदाजपत्रक करण्यात आलेले होते. सध्या या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये २६,००,०००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचे दरसुची सन २००८-०९ नुसार तयार करण्यात आलेले आहे.

तरी एन-६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये २६,००,०००/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी :शहरात पाणी नाही आताच अनेक वेळ त्यावर चर्चा झाली असे असतांना २६ लक्षचे प्रस्ताव पाण्यापुरवठया संबधीचे येतात त्यामूळे हा रद्द करावा.

श्री.गजानन बारवाल :स्मशानभुमी ते मदनी चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण काम झाले आता पुन्हा रस्ता खोदणार आहे काय ?

कार्य.अभियंता(पापू) :१४ लक्षचे काम होते निविदा काढली असता८० टक्के अबाऊ आली होती.

श्री.रेणुकादास वैद्य :सन २००६-०७ चे काम होते अदयाप झाले नाही याचा अर्थ ते महत्वाचे वाटत नाही. महापालिकेची आर्थीक परीस्थिती बघता असे काम करण्याची आवश्यकता वाटत नाही. रद्य करावे.

मा.महापौर : हा विषय रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५०७ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत औरंगाबाद शहर पाणीपुरवठा योजनेसाठी आणि मलनि:स्सारण प्रकल्प (STP) करीता रू.१०० कोटी रक्कमेचे अनुदान महाराष्ट्र शासनाने दिनांक १८/९/२००८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मंजुर केलेले आहे. प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. यामध्ये खालील कामे अंतर्भुत आहेत.

| | |
|---|---|
| १. नक्षत्रवाडी संतुलीत टाकी ते शहरापर्यंत असलेली पी.एस.सी जलवाहिनी बदलणे व शहराअंतर्गत आवश्यक ट्रान्समिशन मेन्स बदलणे व तद्नुषंगीक कामे करणे. | रू.४० कोटी |
| २. शहरातील वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करून Hydraulic Model तयार करणे व आवश्यक भागातील वितरण व्यवस्था बदलणे व तद्नुषंगीक कामे करणे | रू. ३० कोटी |
| ३. शहरात बनेवाडी परिसरात एस.टी.पी. उभारणे. | रू. ३० कोटी |
| | --------------------- |
| | **एकुण रू.१०० कोटी** |

यापैकी क्र.१ मध्ये नमुद कामासाठी विहीत पध्दतीचा अवलंब करून निविदा कार्यवाही अंतिम केलेली आहे. या कामासाठी शासन निर्णय-दिनांक ०७/०५/२००९ अन्वये शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

दिनांक १२ मे २००९ रोजी महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० संदर्भाने मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीमध्ये औरंगाबाद शहर वितरण व्यवस्था- सुधारणा व उपाययोजना बाबत मा.प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई व मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेसोबत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर दिनांक १८ मे २००९ रोजी मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी औरंगाबाद महानगरपालिकेत येऊन वितरण व्यवस्थेसंदर्भाने सविस्तर मार्गदर्शन केले. संपुर्ण वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करून Hydraulic Model तयार करणे, सुधारणा व उपाययोजना करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) म्हणून काम करण्यास तयार असल्याबाबत मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी बैठकीमध्ये सहमती दर्शविली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने पाणी व उर्जा लेखा परिक्षणाचे काम पूर्ण केलेले आहे. आज औरंगाबाद शहरामध्ये उपलब्ध सर्व स्त्रोतांव्दारे एकुण १२० ते १२२ द.ल.ली. पाणी दररोज प्राप्त होते. संपुर्ण वितरण व्यवस्थेतील साधारणत: ६५% पाईप अे.सी./पी.व्ही.सी./आर.सी.सी. आहेत सदर पाईप जुने असून जस जशी गरज भासली त्यानुसार कोणतेही नियोजन /संकल्पन न करता

जलवाहिन्या टाकल्या गेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. सद्यस्थितीत संपुर्ण शहर परिसरामध्ये एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येतो. समांतर जलवाहिनीची योजना मंजुरीनंतर काम पूर्ण होण्यास साधारणतः तीन ते चार वर्षाचा कालावधी लागणार आहे. संपुर्ण शहरातील वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करून Hydraulic Model तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. हे काम IIPDF अंतर्गत Crisil करणार असून ते काम ढोबळमानाने करण्यात येईल. त्यामुळे तपशिलवार घरोघरी जाऊन सर्वे करणे आणि त्याआधारे नियोजन करणेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करून देणार आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे शहरामध्ये समतोल वाटप करणे महानगरपालिकेस शक्य होईल. यास्तव मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत मंजुर रू.३० कोटीच्या अनुदानातून सदरची कामे करणे प्रस्तावित आहे.

मराठवाडा विकास कार्यक्रमातून मंजुर रू.३० कोटी रकमेच्या अनुदानासाठी वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

- योजनेची किंमत - रू.३० कोटी
- अनुज्ञेय अनुदान (७०%) - रू.२१ कोटी
- कर्ज (२०%) - रू.६ कोटी
- नागरी संस्थेचा सहभाग (१०%)- रू.३ कोटी

उपरोक्त प्रमाणेच्या आकृतीबंधानुसार औरंगाबाद महानगरपालिकेस एकुण किमतीच्या ३०% म्हणजेच रू.९ कोटी रक्कम टाकावी लागणार आहे. याकरीता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पामध्ये रू.९ कोटी रकमेची तरतुद ठेवण्याबाबत मान्यता व्हावी.

रू.३० कोटी किमतीच्या योजनेमध्ये प्रस्तावित कामाची व्याप्ती (Scope of Work) खालीलप्रमाणे राहील.

**<u>अ) औरंगाबाद शहर संपूर्ण वितरण व्यवस्था सुधारणे अंतर्गत :-</u>**

I) औरंगाबाद शहराचे उपग्रहीय नकाशे/छायाचित्र तयार करणे.
II) उपग्रहीय नकाशे/छायाचित्रांचे Digitized Maps तयार करणे
III) वितरण व्यवस्थेचे नकाशे तयार करणे.
IV) Digitized नकाशांवर वितरण व्यवस्थेचे नकाशे Super Impose करणे.
V) विविध स्तरांचे (Layers)GIS Maps तयार करणे.
VI) वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करणे करीता आवश्यक ती सर्व कामे (उदा. सर्व्हे ई.)करून वितरण व्यवस्थेचे Hydraulic Model तयार करणे.

ब) उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करून साधारणतः शहराच्या ३५ ते ४०% भागातील जास्त जुन्या, जास्त गळत्या असलेल्या तसेच पाणी कमी मिळत असलेल्या भागातील वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी रू.३० कोटी किमतीच्या मर्यादेपर्यंतच्या कामाचे संकल्पन करून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, शासनाची प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा दस्तावेज तयार करणे, निविदा कार्यवाही पुर्ण करणे, तद्नुषंगीक कामे करणे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे रू.३० कोटी रकमेच्या कामास सर्वप्रकारचे प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सहाय्य करण्यास महाराष्ट्र जिवन प्राधिकरण तयार आहे. म.जि.प्रा. कार्यालयाचे दिनांक ३० मे २००९ रोजी यासंदर्भाने पत्र प्राप्त झालेले आहे. म.जि.प्रा. परिपत्रक क्र.१२६ दिनांक ३/४/०८ च्या परिपत्रकाप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सेवा घेऊन ई.टी.पी. चार्जेस देण्यास, तसेच संपुर्ण शहराचे Hydraulic Model तयार करणे व तद्नुषंगीक बाबींसाठी वेगळे रू.५० लक्ष म.जी.प्रा. कडे सेवा चार्जेस म्हणून देण्यास मान्यता व्हावी. वरील कामे निधिच्या उपलब्धतेनुसार व टप्प्या टप्प्याने Core Area मध्ये तातत्काळ सुरू करण्यास मान्यता द्यावी.

करीता मराठवाडा विकास कार्यक्रम -२००८ अंतर्गत मंजुर रू.३० कोटी किमतीच्या योजनेतून उपरोक्त प्रमाणे कामे करण्याचा, महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पामध्ये रू.९ कोटी इतक्या रकमेची तरतुद ठेवण्याबाबतचा तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सेवा घेण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी :या प्रस्तावात पान क्र.३ वर हायड्रोलीक मॉडेल तयार करणे अत्यंत आवश्यक आहे हे काम ढोबळमानाने करण्यात येईल त्यासाठी रू.१.२० कोटी खर्च येणार आहे मागिल पानावर असे दिले की महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सेवा घेवून ईटीपी चार्जेस देण्यास तसेच संपुर्ण शहराचे हायड्रोलिक मॉडेल तयार करणे व तदनुषंगीक बाबींसाठी वेगळे रू. ५० लक्ष महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे सेवा चार्जेस म्हणून देण्यास मान्यता मागविली आहे. हायड्रोलिक मॉडेल ढोबळमानाने क्रिसील तयार करणार तर जीवन प्राधीकरण काय करणार आहे श्री.पानझडे यांना कल्पना आहे यापूर्वी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या माध्यमातून ६५ कोटी नुसते टाकी बांधण्यासाठी खर्च केले.

मा.आयुक्त जसे इमारत बांधण्यापूर्वी आर्कीटेक्ट नकाशा तयार करतात त्या पध्दतीने:म.जि.प्राधिकरणास हायड्रोलिक मॉडेलचे काम देत आहोत एज्युकेशनचे काम देत नाही. हायड्रो मोडेलिंगच्या कामासाठी ६ मुख्य घटक नमुद केले त्यांचेकडून काय काम करून घ्यायचे आहे क्रिसीलला ऑलरेडी एक काम दिलले आहे.क्रिसीलच्या कामाचे स्वरूप हायड्रो मॉडेलिंग करणे शहराचा पाणी पुरवठा प्रश्न तो सोडवण्याच्या दृश्टीने त्याची व्याप्ती आहे ती एमजीपीकडून करून घेणार आहोत. क्रिसीलला दिलेल्या कामात वेगवेगळे घटक आहे.

श्री.संजय जोशी :हायड्रोलिक मॉडेल जे क्रिशल करणार तेच एमजीपी करणार असे यात दिले आहे.

मा.आयुक्त. : तसे नाही ढोबळ मानाने शंब्द वापरला आहे.क्रिशीलला जी वर्क ऑर्डर दिली त्यात व जे शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी जो हायड्रोलिक मॉडेल करायचे यात फरक आहे.आणखी याबद्यल तांत्रिक माहिती श्री. पानझडे देतिल.

श्री.संजय जोशी :हायड्रोलिक मॉडेल हे एकच असणार आहे ढोबळ मानाने असो किंवा एमजीपीचे असेल.

कार्य.अभियंता(पापू) :क्रिशीलला इंडियन इन्फ्रस्ट्रक्चर डेव्हलपमेंन्ट प्रोजेक्ट फंडमध्ये सेंन्ट्रल गव्हरमेंन्टने जे १.२ करोड रूपये दिले त्याचे अंतर्गत परस्पर सेन्ट्रल गव्हरमेंन्ट व एसएन डेव्हलपमेंन्ट बँक यांनी ७५-२५ प्रमाणे खर्च उचलेला आहे त्यांनी परस्पर निविदा प्रक्रिया केली आहे. आणि औरंगाबाद शहरासाठी त्याची नेमणूक करून पाणी पुरवठयाचा पब्लीक प्राव्हेट पार्टनरशिप अंतर्गत येथील पाणी पुरवठयाची सेवा त्याचा दर्जा उंचावण्यासाठी जे पीपीपी मॉडेल व डाकुमेन्ट बनवायचे आहे त्यासाठी क्रिशीलची नेमणूक केली. डाकुमेन्ट तयार करतांना प्रोजेक्ट कॉस्ट काढून येथील सर्व जलवाहिन्याचा सर्वे व हायड्रोलिक मॉडेल तयार करून रफली डिजाईन करावी लागते त्यांचा स्कोप थोडा स्लाईटली वेगळा आहे जो उद्येश डिजीटाईज मॅपींग वरून हायड्रोलिक मॉडेल तयार करायचे प्रत्येक

घरी जावून सर्वे करायचा त्यानंतर डिजाईन हायड्रोलिक मॉडेल तयार करायचे हे काम थोडे विस्तृत स्वरूपाचे आहे.जेंव्हा क्रिशीलचे मॉडेल बनेल प्रोसेस होईल त्यावेळी जो कुणी खाजगी ऑपरेटर येईल तो सुध्दा लगेच त्यावर विश्वास ठेवणार नाही.ते त्यांचे स्वत: हायड्रोलिक मॉडेल व डिजाईन तयार करणारच आहे.हे काम थोडया फार प्रमाणात पीपीपी ऑपरेटर करील परंतु आता पूर्ण शहराचे नियोजन करायचे आहे.तात्काळ याचा फायदा होणेसाठी एक दिवस वर्कशॉप पण ठेवले होते.काम कसे करणार हे सर्व त्यांनी विषद केले आहे त्यामूळे तेवढयापूरते काम एमजीपीला देणार आहोत.३० कोटीचे जे काम आहे ते पीएमसी म्हणून काम करणार आहे.उर्वरीत ७ टक्के चार्जेस म्हणून देणार आहोत. उरलेल्यामध्ये अंदाजपत्रक व प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे ,मंजूरी देणे , निविदा प्रक्रिया होणे, काम करून घेणे यावर देखरेख एमजीपीच्या माध्यमातून करून घेणार आहे.

श्री.संजय जोशी :वृत्तपत्रात वाचले की एमजीपी हे विभाग बंद होत आहे.

मा.आयुक्त :क्रिशील हायड्रोलिक मॉडेल करणार असेल तर एमजीपी कशासाठी प्रशासनालाही शंका आली होती त्या संबधी बैठक घेवून माहिती घेतली क्रिशीलचे काम टेंडर प्रोसेस कशी करायची तसेच शहरातील पाईललाईन कुंठे खराब आहे कुठे बदलण्याची गरज आहे मीटर, व्हॉल कुठे बसविणे पाण्याचे ऑडीट करणे ईत्यादी.

श्री.संजय जोशी :एमजेपीकडून काम करून घेणार तर ढोबळमानाने म्हणजे काय क्रिशीलला ढोबळमानाने टेंडर काढण्यासाठी नेमणार आहोत का? तीन कार्य.अभियंता २५ हजार प्रत्येकी पगार घेतात त्यांचा कामाचा अनुभव बघता क्रिशीलचे काम तीन दिवसात अधिकारी करू शकतात क्रिशीलला शहरातील काही माहिती नाही.

मा.आयुक्त : क्रिशील किंवा एमजेपी कुठलीही एजन्सी असेल त्यांची पहिली मागणी त्यांना कंटूर मॅप देणे ते महापालिकेने दयायचे व त्यांना डिटेल मॅपींग करण्याकरीता जी माहिती पाहिजे ती महापालिकेलाच दयावी लागणार त्यावर ते प्रोसेस करून देणार आहे.

श्री.संजय जोशी : यानंतर असे होवू नये क्रिशीलनेच असे केले एमजेपीने केले म्हणून पैसे कमी पडले. यापूर्वी असे झालेले आहे.दोन्ही ही हायड्रोलिक मॉडेल करणार आहे जबाबदारी कुणावर फिक्स करणार आहे.क्रिशील अंदाजपत्रक तसेच ढोबळमानाने हॉयड्रोलिक मॉडेल करणार एमजेपी चांगल्या प्रकारे हायड्रोलिक मॉडेल तयार करून दिले त्यासाठी ५० लक्ष जास्त खर्च लागला जो फरक येतो त्याची जबाबदारी कुणावर असणार आहे.

मा.आयुक्त :शहरात कुठल्या लाईन बदलायच्या कुठे कमी जास्त पाणी नाल्यात सोडायचे तसेच पाणी ऑडेक्टींग करणे हे काम एमजेपी करणार आहे शहराचा पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी एमजीपीने जे हायड्रो मॉडेल केले ते वापरणार आहोत. क्रिशीलच्या कामाचा स्कोप हा १५-२० टक्के असेल क्रिशीलला हायड्रो मॉडेल व्यतिरिक्त इतर ही कामे दिली आहे.

श्री.संजय जोशी :इतर कामाचे यात नमूद केले नाही.

कार्य.अभियंता(पापू) :तो तपशिल येण्याचे कारण नाही हा विषय वेगळा होता.क्रिशीलचा विषय वेगळा आहे.

| | |
|---|---|
| श्री.संजय जोशी | :क्रिशील काय काम करणार हे सभागृह ठरविल. सर्व डिटेलमध्ये का आले नाही. |
| कार्य.अभियंता(पापू) | :क्रिशीलचे जे काम आहे हॉयड्रोलिक मॉडेल करणे हे त्यातील एक उपअंग आहे. |
| श्री.संजय जोशी | : काय काम दयायचे सभागृह ठरवेल या अगोदर तशी पध्दत होती सर्व मंजूर करायचे व त्याचे दुष्परीणाम महापालिका आज भोगते आहे. स्पेकचा जो प्रकार असाच झाला पुर्ण अधिकार दिले त्याचा परीणाम आज भोगावा लागत आहे.त्यासाठी क्रिशील व एमजेपी काय करणार हे दोन विषय वेगळे करायला पाहिजे. यात तसा उल्लेख नाही. |
| कार्य.अभियंता(पापू) | : दोन्ही चे विषय वेगळे आहे.क्रिशीलचे ऑलरेडी काम चालू असल्यामूळे यात आले नसेल.एमजेपी जे काम करणार ते तपशिलवार दिले आहे.या शहरातील पाणी पुरवठयाच्या संदर्भात अभ्यास करायचा येथीली पाणी पुरवठा सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी पब्लीक प्राव्हेट पार्टनरशिपमध्ये मॉडेल तयार करणे शासनाने त्यासाठीच निधी दिला आहे.मा.सचीव पातळीवर बैठक झाली होती या शहराला पब्लीक प्राव्हेट पार्टनरशिपमध्ये मॉडेल राबवून काम करण्याचे शासनाचे निर्देश आहे.क्रिशीलची नेमणूक डाक्युमेंन्ट तयार करण्यासाठी आहे ते किचकट काम आहे. |
| श्री.देसरडा प्रशांत | :अनेक मोठया योजनेच्या विषयाला मंजूरी दिली जाते त्याचा बेनिफिट फारसा दिसून येत नाही जायकवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यत असलेल्या लाईनवर व्हॉल,वायू,गॅस व इतर साहीत्य खरेदीसाठी बजेटमध्ये मोठी तरतूद केली जाते टेक्नीकल साहित्य कसे व कोणते असावे हे कळत नाही. मंजूरी दिल जाते.या लाईनवर आतापर्यत किती खर्च झाला यांचे स्वतंत्र ऑडीट व्हावे. हा ठराव मंजूर करण्यास हरकत नाही परंतु अंदाजपत्रक तयार करून मंजूरीसाठी या सभागृहासमोर यावे नंतर टेंडरसाठी पाठवावे. |
| श्री.संजय जोशी | :६५ कोटीची योजना एमजेपी मार्फत राबविली होती २०-२५ एमएलडी पाणी शहरासाठी वाढीव येणार होते आम्ही सभागृहात होतो फक्त मंजूरी घेतली तीन टाक्या बांधल्या त्यात पाणीच पडत नाही.व शहराला येणारे पाण्यात वाढही झाली नाही. |
| मा.आयुक्त | शहरातील संपुर्ण वितरण व्यवस्था सुधारणे अंतर्गत जे ६ मुद्दे घ्यायचे त्या संबधीत असलेला आराखडा व डिजाईन एमजेपी करून देणार आहे टेंडर काढणे नंतर व पुढील काम करणे हे एमजेपीचे नाही. |
| श्री.संजय जोशी | :जो आराखडा तयार करणार तो सभागृहासमोर सादर करावा. एमजेपीने ६५ कोटीची योजना राबविली ०३ टाक्या बाधंल्या आज त्या टाक्यामध्ये पाणी जात नाही हे करतांना ३०-३५ एमएलडी पाणी वाढणार होते तेही झाले नाही भिती वाटे तसा प्रकार पुन्ही होवू नये. त्यासाठी या सभेत पुन्हा सविस्तर सादर करावे. |
| मा.आयुक्त | :एमजेपीला काम करण्यास मंजूरी दिली तर काम करेल त्यानंतरच काय काम केले हे दाखवता येईल.फक्त एमजेपीच्या विषयी बोलतो आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :एमजेपीने करेल किंवा दुसरी एजन्सी करेल काय काम करायचे हे ठरवावे. |
| मा.आयुक्त | :औरंगाबाद चा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जे हायड्रोलिक मॉडेल आहे उपयोगी पडेल कारण एमजेपीने अशा प्रकारे इतर ठिकाणी हायड्रोलिक |

मॉडेल तयार करून प्रश्न सोडविल्याचे महाराष्ट्रात उदा.आहे. या शहराचा त्यांनी अभ्यास केला व ज्या उपाययोजना सुचविल्या त्या या परीस्थितीत उपयोगी पडणार आहे असे प्रथम दर्शनी त्यांना प्रेजेन्टेशनची संधी दिली होती त्यावरून दिसून येते.

श्री.संजय जोशी :आमच्या दृष्टीने एमजेपीचे अगोदर कसे काम केले महापालिकेत उदा. आहे. जी या सभागृहाची भिती आहे ती व्यक्त केली प्रशासनाने विचार करून पुन्हा सभागृहा समोर मांडावे.

श्री.गजानन बारवाल :यापूर्वी जे एजन्सीला अधिकार दिले कामे केली. त्यांचे अनुभव वेगवेगळे होते.शासनाकडून येणारे अनुदानातून एजन्सीला काम दिले जाते जोपर्यत निधी असतो तोपर्यत ती एजन्सी काम करते यासाठी जो खर्च लागणार आहे तो कसा उपलब्ध करणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :हायड्रो मॉडेल म्हणजे काय ? सविस्तर माहिती द्यावी.

मा.आयुक्त :एक सेमीनर घेतले होते एमजेपीचे मा.सचिव यांनी माहिती दिली होती. औरंगाबाद शहराची सध्याची पाणी पुरवठयाची जी व्यवस्था त्याचे अवलोकन करायचे जायकवाडी पासून पाहिजे तेवढे पाणी मिळते फारोळा त्यानंतर नक्षत्रवाडी काचंनवाडी त्यानंतर पुढे शहरात येते असे असतांना सुध्दा शहरात व्यवस्थीत पाणी पुरवठा का होत नाही. हायड्रोलिक मॉडेलमध्ये २४ तास ७ दिवस पाणी मिळावयास पाहिजे ही त्याची संकल्पना असून त्यांनी सुचवल्यानुसार शहरात आलेली पाईपलाईन किती वॉटर प्रेशर घेवू शकते किती साईजची लाईन पाहिजे तसेच अनेक वेगवेगळया भागात पाणी वाटपासाठी नेटवर्क आवश्यक असते. इएसआर बांधले पाण्याच्या टाकीमध्ये पाणी पडत नाही त्यासाठी काय करावे लागेल जेथे उंच सखल भाग आहे अशा ठिकाणी दोन टप्प्यामध्ये पाणी कसे देता येईल शेवटचा भाग ऑडीट आहे नळ कनेक्शन किती पाणी देतो किती वसुली किती जेथून वसुली होत नाही असे किती व हे थांबविण्यासाठी काय करावे लागेल अशा प्रकारे जनरल माहिती त्यात होती ढोबळमानाने यात तांत्रिक दृष्टी पुष्कळ बाबी सांगितलेल्या होत्या.

श्री.भगवान घडमोडे :पाणी वितरण व्यवस्था कशी होणार याबध्दल माहिती दिली एमजेपीचे काम काय असणार आहे.

मा.आयुक्त :एमजेपी मॉडेल एक प्रकारचा प्लॅन करून देणार जे की ही लाईन बदलावी ही बदलण्याची गरज नाही उपाययोजनाचा प्लॅन देणार त्या प्रमाणे पुढे कार्यवाही करणार आहे.

श्री.संजय जोशी :२४x७ असे पाणी या शहराला मिळेल असे म्हटले.

श्री.देसरडा प्रशांत :२४x३.५ इतके पाणी मिळाले तरी समाधानी आहेत.

मा.आयुक्त :एमजेपी प्रीस्क्रीप्शन देणार आहे. पुढील काम दयावे किंवा आमचा सहभाग असावा असे त्यांनी म्हटले नाही.

श्री.संजय जोशी : काम देतांना त्यांना नियमाने बांधून घ्यावे नसता स्पेक एजन्सीच्या विरोधात जसे स.सदस्य श्री.देसरडा यांना कोर्टाची पायरी चढावी लागली तसे यापुढे वेळ येवू नये.

मा.आयुक्त : प्रशासनाने रायटींग मध्ये कमेटमेन्ट घेतलेले आहे यापेक्षा आणखी काही पाहिजे असेल तर तसे त्यांना कळवू.

श्री.रेणुकादास वैद्य : एमजेपीचे अनुभव काय पाणी कुठे ग्रॅव्हेटीने जाणार कोणती लाईन बदलायची याचे मॉडेल करण्यासाठी हे सर्व होत आहे. एमजेपी किंवा

इतर एजन्सी जेवढे प्रभावीपणे काम करेल त्यापेक्षा महापालिकेचे लाईनमन/उप आवेक्षक चार तास उपअभियंता सोबत व्हिजीट केल्यास हे काम करू शकतील. दुय्यम अवेक्षक श्री.मिस्कीन यांचे जागेवर श्री.शिंदे नावाचे अभियंता काम करतात त्यांना कोणती लाईन कुठे आहे कोणते पाणी कसे व कुठे जाते याची माहिती नाही मिस्कीन हे सर्व सांगू शकतात. सॅटेलाईटने मॉडेल करणार जलवाहिन्याची परीस्थिती तशी इमेज मिळेल का मॉडेल तयार करून काम करायचे कोटयवधी रू.खर्च करायचे हा विचार होतो आहे.रॉ मटेरियल महापालिकेने तयार करावे ज्या कुण्या एजन्सीला दयायचे ते दयावे. जलवाहिनीबाबत लहान सहान बाबी लाईनमनला सब ओवरसीयरला जेवढया माहित आहे तेवढया एमजेपीच्या लोकांना माहिती नाही.

मा.आयुक्त :माझा यास विरोध नाही प्रशासनाची कुणालाही काम देण्या विषयी भूमिका नाही जर महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी कार्यक्षम असेल तर त्यांचेकडून काम करता येईल.मार्च एप्रिल मध्ये पाणी टंचाई आली तर त्यावेळी मी येथे असेल किंवा नसेल.

श्री.संजय जोशी :प्रशासनाने असे म्हणणे योग्य नाही. काम करून घ्ेणेची जबाबदारी प्रशासनाची असते.

मा.आयुक्त :मनपाचे अधिकारी /कर्मचारी या परीस्थितीत हे काम करू शकेल असे वाटत नाही.एमजेपीला दिल्यास वेळेवर होवू शकते.योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संजय जोशी :काम कुणाला दयायचे याबध्दल बोलत नाही बारकावे लक्षात घ्यावे

श्री.रेणुकादास वैद्य :लाईनमन दुय्यम आवेक्षक यांना सोबत घेवून अभियंता संबधीत जे अभियंता असतील त्यांचे कडून अगोदर रॉमटेरियल तयार करावे त्यानंतरच एजन्सीकडे दयावे.

मा.आयुक्त :रॉमटेरियल दिल्याशिवाय एमजीपी त्यावर वर्कीग करू शकत नाही. दिलेले रॉमटेरियल हे व्यवस्थित असल्यानंतर त्यांवर हायड्रोलिक मॉडेल करता येईल.

श्री.संजय जोशी :यापूर्वी शहा कन्स्ल्टन्सीला २५ लक्ष देवून ड्रेनेज लाईनच्या संदर्भात सर्वे करून सविस्तर नकाशा व अहवाल तयार करण्याचे काम दिले होते तो अहवाल अजूनही आहे परंतु पुढे काहीच कार्यवाही झाली नाही.

मा.आयुक्त : यात तज्ञाचा सल्ला घेणे,प्रिस्क्रीप्शन घेणे, सभागृहाने योग्य निर्णय घ्यावा. इथला कर्मचारी वर्ग जर हे काम करू शकत होते तर इतके दिवसात झाले असते.

सौ.लता दलाल :स्पेकच्या बाबतीतही असे म्हटले होते एका पथकात चार लोकांचा स्टॉफ असणार ते अमुक भाग एवढया दिवसात पुर्ण करणार असे आपले कर्मचारी मदत करतील १० ,१२ वी असलेल्या मुलांकडून मालमत्ताचा सर्वेचे काम करून घेतले तो पुर्ण प्रयोग फसलेला आहे.एमजेपीच्या लोकांना यापूर्वी कामासाठी घेत होतो १९९० पासून जवळपास घेत नाही. त्यानंतर ज्या लाईन टाकल्या जी नवीन कामे योजना हाती घेतल्या त्या बाबत एमजेपीच्या कर्मचा-यांना याची कल्पना नाही. कोणत्या लाईन कुठे आहे हे अधिका-यांना माहिती नसेल एवढी माहिती लाईनमन दाखवू शकतो त्याच प्रमाणे एमजीपीचा स्टाफ असू शकतो.

मा.आयुक्त :एमजेपीला डाटा इतर अचूक माहिती महापालिकेच्या तांत्रिक विभागाला दयावी लागणार तरच हायड्रोलिक मॉडेल होणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :एमजेपीला महापालिकेचे अधिकारी डाटा देतिल क्रिशील काय करणार आहे.माझे माहितीनुसार एमजेपी व क्रिशीलचे काम सारखे वाटते.स्पेक सारखे होवू नये एकाच एजन्सीने काम करायचे व दोघानीही बिले उचलायचे असे होवू नये.

श्री.रेणुकादास वैद्य :दुसऱ्या एजन्सीला काम देणे ऐवजी संपुर्ण काम एमजेपीला का देत नाही.

मा.आयुक्त : ४० कोटीचे काम क्रिशील एजन्सीला दिले त्याचे बिलही दिले केंद्र शासनाकडून अनुदान आले होते एमजीपीला देणार असेलेले काम क्रिशील करीत असेल व त्या व या कामात काय फरक आहे अधिकारी तसा खुलासा करतील.केंद्र सरकारने जो निधी दिला ते काम त्यांना दिले.

श्री.संजय जोशी :क्रिशीलला मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे.एक नगरसेवक यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती.

कार्य.अभियंता(पापू) :स्टे वगैरे नाही सदर मॅटर विड्रॉल केलेले आहे.क्रिशीलला केंद्र शासनाने नेमलेले आहे सर्वसाधारण सभेची औपचारिक मंजूरी घेतली नाही परंतु १.२ कोटी रूपये हे केंद्र शासनाने एसएफ डेव्हलपमेंन्ट बँकने दिलेले आहे.

श्री.देसरडा प्रशांत :क्रिशीलला काम दिले केंद्र शासनाचा निधी होता म्हणून या सभागृहाची मान्यता घेतली नाही जे काही होईल त्यास केंद्र शासनच जबाबदार राहील का?

कार्य.अभियंता(पापू) :अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने नेमलेले आहे.अभ्यास करणार, सर्वेचे काम करणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :निधी दिला त्यावेळी क्रिशीलनेच सर्वेक्षणाचे काम करावे अशी अट टाकून नावानिशी मंजूरी आलेली होती का ?

श्री.प्रशांत देसरडा :स्पेकला काम देतांना पुर्ण भारतातील छावनी ने सर्वेक्षन केल्याचे सांगण्यात आले होते.

कार्य.अभियंता(पापू) :इंडियन इन्फ्रॅक्स्टक्चर डेव्हलपमेन्ट प्रोजेक्ट फंड जो आहे त्या फंडाच्या अंतर्गत सर्वेक्षणाची एजन्सी ही शासनाने नेमलेली आहे.

श्री.संजय जोशी :माझे माहितीप्रमाणे स्पेसिफिक एजन्सीचे नाव देवून शासननिधी देणार नाही.

कार्य.अभियंता(पापू) : शासनाचे पत्रात तसे आहे पत्र मागवून घेतो.

मा.आयुक्त :यास मंजूरी देण्या अगोदर ज्या शंका असतील त्यांचे कागदोपत्री खात्री करून घेणे गरजेचे आहे भविष्यात चुका दिसून आल्या तर त्यांचा दोन प्रशासन व सभागृहावर यायला नको

श्री.गजानन बारवाल :ज्या सुचना स.सदस्यांनी मांडल्या त्याची दखल घेवून कार्यवाही करण्यास हरकत नसावी हा विषय मंजूर करावा.

श्री.भगवान घडमोडे :दोन्ही एजन्सीच्या कामाचा तपशिल काय याचा स्पष्ट खुलासा व्हावा.मंजूरी देण्यास हरकत नाही आमचा विरोध नाही कारण पाणीही मिळाले पाहिजे

मा.आयुक्त : क्रिशीलचा स्कोप ऑफ वर्क काय एमजेपीचे काम काय हेही रेकॉर्डला आहे त्याचा विचार करूनच मंजूर दयावी.

श्री.गजानन बारवाल :प्रस्ताव स्थगित ठेवणे योग्य नाही ज्या सदस्यांची शंका असेल त्यांना आपल्या दालनात बोलवून चर्चा करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :अनेक एजन्सीने येथे कामे केली त्यांचा अनुभव लक्षात घेता सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले पाणी प्रश्न सर्वाच्या जिव्हाळयाचा आहे स्पेक, शहा कन्स्ल्टन्सी प्रमाणे होवू नये माझे माहिती प्रमाणे शहा एजन्सीने ड्रेनेजचा सर्वे चांगला केला त्यात सिडकोचाही भाग होता सदस्यांनी

| | |
|---|---|
| | अभ्यासपुर्वक निवेदन केले आहे प्रशासनाचीही बाजू ऐकावी पारदर्शकपणे काम करणार आहोत जीवन प्राधीकरणच्या माध्यमातून काम करायचे आहे दोन वेगवेगळे विषय असले तरी वेळ वाया न जाता तसेच आचारसंहितेचा विचार करून यास पारदर्शकपणे मंजूर करावे क्र.३ बनेवाडी एसटीपी प्लॅन्ट सुरे वाडी नारेगाव चिकलठाणा व मागिल संपूर्ण भाग असे चार वार्डातील आरोग्य धोक्यात आलेले आहे उघडयावर ड्रेनेज लाईन वाहतात चिकलठाणा झाल्टा एसटीपी प्लॅन्ट वर्ग करून तसेच जाधववाडी सुरेवाडी भागातही एसटीपी प्लॅन्ट पंपीग स्टेशन करणे आवश्यक आहे परंतु ते यात का घेतलेले नाही खुलासा घ्यावा.हा प्रस्तावास विरोध नाही मंजूर करावा. |
| कार्य.अभियंता(पापू) | :जाधववाडी सुरेवाडी येथे एसटीपी प्लॅन्ट घेण्याचे नियोजन आहे परंतू निधी अभावी करू शकलो नाही सलीम अली सरोवर येथे घेतले आहे |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : मलनिस्सारण सध्या मोकळया जागेवरून वाहते नाल्यात सोडले नगरपालिका ग्रामपंचायतीचे असे नसेल नियमाने बरोबर आहे का? |
| मा.महापौर | :टप्प्या टप्प्याने एक एक घ्यावे. |
| कार्य.अभियंता(पापू) | :सलीम अली व बनेवाडी येथील प्लॅन्टच घेत आहोत. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :यापुर्वी एसटीपी प्लॅन्टची परीस्थिती काय याची माहिती दयावी. |
| श्री.संजय जोशी | :बनेवाडी शहरापासून दूर आहे पाणी कसे जाईल. |
| कार्य.अभियंता(पापू) | :तिथंपर्यत पाणी नाल्याने पोहचते. |
| श्री.संजय जोशी | :नाल्यावरील पाण्यावर असे प्लॅन्ट करता येतो का? |
| कार्य.अभियंता(पापू) | :त्याचा उद्येश असा सध्याचे ड्रीप न केलेले पाणी डायरेक्ट नदीत सोडतो. त्यामूळे प्रदुषण मंडळाकडून सतत नोटीसा येत आहे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :आवश्यक कामे घेतली जात नाही नारेगाव मिसारवाडी भागात वाईट अवस्था आहे डासमच्छर वाढलेले आहे त्याभागातील आरोग्य धोक्यात आल्यास त्याचा परिणाम संपूर्ण शहरावर होईल ५ वर्षापासून नाल्यातून पाणी वाहते एसटीपी प्लॅन्टला मंजूरी झाली निविदाहोवून कामका होत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पुर्वी एसटीपी प्लॅन्टचे काम अर्धवट असेल व त्यापासून फायदा होत असेल तर इतर नवीन प्लॅन्ट न करता त्यावर का खर्च करावे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :बनेवाडी येथील एसटीपी प्लॅन्टची क्षमता किती असणार कोणती मशीनरी वापरणार आहे.शहरात सर्वच नाल्यात सिव्हर,ड्रेनेज लाईन नाहीत उघडयावर पाणी वाहते. मोतीवालानगरपासून एका नाल्याचा उगम होतो या नाल्यात जयभवानीनगर ते मोढापर्यत सिव्हरेज लाईन टाकण्याचे टेंडर काढले जेथे लाईन टाकणार मागे पुढे नाला आहे.सिव्हर लाईन सक्सेस होईल का खरे तर याची चौकशी व्हावी या बाबत लेखी तक्रार केली त्यावर अमुक ठिकाणी आपण हजर रहावे व त्यांची प्रत वार्डाच्या सदस्यांना दिली.माझी हेरींग घेणार असे उत्तर दिले नाल्यात सिव्हर लाईन नाही त्या अगोदर टाकाव्यात त्यानंतर एसटीपी प्लॅन्ट करणे योग्य वाटते. |
| कार्य.अभियंता(पापू) | : सन २००८ मध्ये मंत्री महोदयाची औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत दहसस्त्रे साहेबांनी बनेवाडी येथील नाल्यावर बंधारा टाकून पाणी अडवून ट्रीटमेंट करून शुध्द करून सोडवायचे असा प्रस्ताव बैठकीत मांडला होता त्यावेळी या बैठकीत मराठवाडा विकास अंतर्गत जो निधी जाहीर केला त्यात ३० कोटीचा हा एसटीपी प्लॅन्ट मंजूर केला होता.बनेवाडी पंपीग हॉऊस महापालिका हद्यीत येतो. |

श्री.प्रशांत देसरडा :सिव्हर लाईन नाही असे नमूद केलेले होते का?

कार्य.अभियंता(पापू) :सिव्हर लाईन फुटलेल्या आहेत हे प्रशासन मान्यत करीत आहे.

श्री.संजय जोशी :असे असेल तर एसटीपी प्लॅन्ट करून उपयोग नाही त्या ऐवजी या निधीतून सिव्हर लाईन टाकाव्यात. पुर्वी ज्या टाकल्या चुकीच्या पध्दतीने टाकल्या या राज्यात कोणत्याही शहरात नाल्यातून सिव्हर लाईन नाहीत परंतू या शहरात आहे.

श्री.प्रशांत देसरडा :अगोदर सिव्हर लाईन टाकाव्यात त्यानंतर एसटीपी प्लॅन्ट करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :एसटीपी प्लॅन्ट करणे ऐवजी सिव्हर लाईन टाकणे गरजेचे आहे.

मा.महापौर :सभागृहाच्या भावना लक्षात घेतल्या आहे एसटीपी प्लॅन्टच्या संदर्भात कुणाचेही समाधान झालेले नाही.यापूर्वी जेथे एसटीपी प्लॅन्टला मंजूरी दिली तेथे आवश्यक होते ते का झाले नाही सिव्हर लाईनच नाही त्यामूळे या प्लॅन्टचा उपयोग होणार नाही असे मत सर्वाचेच झालेले आहे.हा विषय आता सभागृहात चर्चेला न घेता सिव्हर लाईन कुठे व कशा पध्दतीने टाकणार यापूर्वी केलेल्या एसटीपी प्लॅन्टच्या कामाची परीस्थिती काय आहे ही सर्वच सविस्तर माहिती सह हा प्रस्ताव सादर करावा.तोपर्यत ज्या कामाला सुरूवात केली आहे त्याकरीता ज्या काही एजन्सीज आहे त्यास मंजूरी देवू नये.हा विषय मंजूर करण्यात येतो परंतू यामध्ये जी माहिती जे स.सदस्यांनी प्रश्न केले या कामाचा आराखडा जो की जो अभ्यास एमजेपी ने क्रिशीलने केला तो व क्रिशीलने जे काम केले ते सभागृहासमोर ठेवावे.

श्री.प्रशांत देसरडा :क्रिशील करेल किंवा दुसरी एजन्सी करेल जेंव्हा अंदाजपत्रक होईल त्यावेळी नेंमके काय काम करणार आहे नक्षत्रवाडी नं. १,२ असे दोन्ही कामे या सभागृहासमोर आणावे.

मा.महापौर :दोन्ही कामाचा आराखडा एसटीपी सर्वसाधारण सभेपूढे आणावे त्यास मंजूरी देवून नंतर काम सुरू करावे.विषय क्र.५०७ मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरात सिव्हर लाईन कोठे व कशा पध्दतीने टाकण्यात येणार आहे. यापूर्वी केलेल्या एस.टी.पी. कामाची परिस्थिती काय आहे या सविस्तर माहितीसह हा प्रस्ताव पून्हा सादर करण्यात यावा तोपर्यंत ज्या कामाला सुरूवात केलेली आहे, त्या करीता ज्यासाठी एजन्सी आहे त्यास मंजूरी देवू नये. दोन्ही कामाचा आराखडा सर्वसाधारण सभेपूढे आणावेत त्यास मंजूरी दिल्यानंतरच काम सुरू करावे. प्रस्तुत विषय क्र.५०७ मंजूर करण्यांत येतो.

**<u>विषय क्र.५०८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे इटखेडा, औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर ५७/१, ५७/२, ५७/३ मधील जमिनीतील ६० मीटर रूंद मंजुर विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्रसाठी हितसंबंधीत श्रीमती जीवनलता नंदकिशोर कागलीवाल व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार दिनांक १४.१२.२००५ रोजी प्राप्त अर्जान्वये खरेदी सूचना दिली आहे.

औरंगाबाद शहराची (वाढीव हद्द) मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार उक्त जमिनीतील जागा ६० मीटर रूंद पोच रस्त्यात बाधीत होत आहे. उक्त विकास योजना सन १९९१ मध्ये अंमलात आलेली असल्याने १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. उक्त कलम -१२७ मधील तरतुदी नुसार विकास योजना अंमलबजावणीच्या तारखेपासून १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने अर्जदाराने उक्त कलमाखाली दिलेली खरेदी सूचना लागू होते. त्यामुळे संबंधीतांनी कलम -१२७ च्या दिलेल्या खरेदी सूचनेनुसार रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

प्रकरणी संबंधीत अर्जदारांनी खेरदी सूचना देवून या विषयी आरक्षण (प्रस्तावित रस्ता) रद्द होणे करीता मा.उच्च न्यायालयात रिट याचिका देखील दाखल केलेली आहे. (रिट क्रमांक ६४५७/०६, औरंगाबाद खंडपीठ) त्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

करीता अर्जदाराने इटखेडा येथील सर्हे नंबर ५७/१, ५७/२, ५७/३ मधील खरेदी सूचने नुसारचे ६०.०० मीटर रूंद पैठण रस्त्याने बाधीत क्षेत्र खरेदी सूचनेनुसार संपादीत करावयाचे आहे.

करीता वरील प्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | : जागा बाजारभाव की सरकारी भावाने घेणार तसेच जागा कुणाची किती घ्यायची व महापालिकेच्या हद्दीत किती येते. हे सुध्दा बघावे चार पदरी खरच रस्ता होणार का खर्च कसा करणार शासनाने हा रस्ता घेतलेला आहे का याचे प्लॅनींग करूनच काम करावे.तसेच या संदर्भात न्यायालयात प्रकरण आहे का हे सुध्दा बघावे. |
| श्री.संजय सिरसाट | :संबधीताने दिं. १४-१२-२००५ रोजी खरेदी सुचना दिली चार वर्ष झाले त्यानंतर किती दिवसात कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :जी जागा बांधीत होते त्यांचा नकाशा पण दाखववावा. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : यापूर्वी असेच झाले १२७ नोटीस दयाची महापालिकेचीच जागा महापालिकेला विकायची असा प्रकार घडलेला आहे. |
| प्र.सहा.संचालक(न.र) | :हा विषय विधी विभागाकडून आलेला आहे.जी संबधीतांनी नोटीस दिली ती २००५ मध्ये दिलेली आहे ही जागा पैठण औरंगाबाद रोडच्या बाजूची आहे रिझरवेशन मधला भाग आहे. |
| श्री.संजय शिरसाट | : कलम १२७ अन्वये दिलेल्या नोटीसचा अर्थ काय, किती दिवस लागू होतो. कालावधी किती दिवसांचा असतो. |
| श्री.संजय जोशी | : १२७ ची नोटीसचा अर्थ काय? |
| सहा.संचालक (न.र.) | :विधी विभाग खुलासा करेल. |
| श्री.संजय जोशी | :१२७ च्या नोटीसचा विधीविभागाचा संबध येत नाही.नगररचना विभागाने माहिती दयावी. सदर रस्ता हा राजय रस्ता (स्टेट हायवे) आहे. |
| सहा.संचालक (न.र) | :कोणत्याही योजनेत उल्लेखिलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी राखून ठेवण्यात आलेली किंवा नेमून नामोनिदिष्ट करण्यात आलेली कोणतीही जमिन ज्या तारखेला अंतिम प्रादेशिक योजना किंवा अंतिम विकास योजना अमलात आली असेल त्या तारखेपासून १० वर्षाच्या कालावधीत करारद्वारे संपादीत केली नसेल अथवा भुमिसंपादन अधिनियम १८९४ या कलमन्वये संपादन करण्यासाठी कार्यवाही सुरू केली नसेल तर जमीनीचा मालक किंवा हित संबधातील व्यक्ती नियोजन प्राधिकरण किंवा यथास्थितीत समुचित प्राधिकरण यांचेवर तशा आशयाची नोटीस बजावणे.अशी नोटीस ज्या तारखेला बजावली त्या पासून सहा महिण्याच्या आत जमिन संपादन करण्यात न आल्यास किंवा ती संपादीत करण्यासंबधी उपरोक्त रितीने उपाययोजना करण्यात न आल्यास तीजमिन आरक्षणातून व्यपगत झाल्याचे मानण्यात येईल. |
| श्री.संजय सिरसाट | :१२७ ची नोटीस २००५ साली बजावलेली आहे प्रस्ताव २००९ मध्ये येतो नियमाने सादर केला याचा खुलासा व्हावा. |
| श्री.विनायक पांडे | :ती जागा घेतो असे ॲफिडेव्हीट लिहून देणे योग्य नाही जागा नियमाने सहा महिण्याच्या नंतर डिलीट होतेच. |

प्र.सहा.संचालक(न.र) : २००५ पासून हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.आता बोर्डावर आलेले आहे वकीलाने शपथपत्र दिले की या जागेचे भुसंपादन करीत आहोत.

श्री.संजय जोशी :१२७ ची नोटीस २००५ ची आहे रिट याचिकेचा क्र.६४५७/०६ म्हणजे प्रकरण २००६ मध्ये दाखल झाले सभागृहासमोर का आले नाही.

मा.आयुक्त :मा.न्यायालयासमोर असा मुद्या आला असेल की एक तर भुसंपादन करावे नसता वगळावे त्यावेळी महापालिकेचया वकीलाने अंडर टेंकींग दिले असेल ठिक आहे भुसंपादनाची कार्यवाही सुरू करू

श्री.काशिनाथ कोकाटे :या रस्त्यास स्टेट हायवे क्र.मिळाला का असेल तर कोठून कुठपर्यत याचा ही खुलासा घ्यावा. मुळ प्रस्ताव आला कसा.

सौ.लता दलाल :किती जागा बाधीत होणार आहे.प्रस्ताव कुणी ठेवला

प्र.सहा.संचालक(न.र) : २००५ मध्ये नोटीस दिली त्यावर कार्यवाही न झाल्याने संबधीत व्यक्तीने २००६ मध्ये मा.न्यायालयात याचिका सादर केली या जागेचे प्रकरण आता बोर्डावर आलेले आहे जागा भुसंपादीत करण्याची कार्यवाही करावी नसता तसा जबाब न्यायालयासमोर सादर करणे आवश्यक आहे. असे विधि विभागाचे पत्र या विभागाकडे आले याबाबत वकील श्री.पगारिया हे काम पहात आहे.

श्री.संजय सिरसाट सहा महिण्याच्या आत कार्यवाही केली नाही तर नियमाने जागा डिलीट होते संबधीतांला कोर्टात जाण्याची गरज नाही. संपादन केली नसेल तर सर्वसाधारण सभेपुढे आणायची गरज नाही. २००५ वर्षाचे २००९ मध्ये आणता येते का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्या वकीलांनी सुचविले त्यांना माहित होते का?

श्री.विनायक पांडे जागा संपादीत करतो आहोत असे वकील ॲफिडेव्हिट कोणत्या नियमाने देवू शकतात.

श्री.रेणुकादास वैद्य : कलम १२७ ची नोटीस दिल्यानंतर ६ महिण्याच्या आत कार्यवाही न केल्यास डिलीट होते. न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे मा.न्यायालयात निर्णय होऊ द्यावे.

श्री.प्रंशात देसरडा :५७/१,५७/२,५७/३च्या बाबत नोटीस आहे ५६/१ पर्यत पूर्ण रस्ता झालेला आहे का?

मा.आयुक्त :मा.उच्च न्यायालयात जे रिट पिटीशन दाखल झालेले आहे रिट पिटीशनमध्ये प्रकरण कुठल्या स्टेजवर आहे हे लक्षात येईल.By issusing appropriate writ this is writ of madours म्हणजेच संबधीताचे म्हणणे असे की जर ॲक्शन घेत नसेल तर मा.न्यायालयाच्या मार्फत आदेश करून ॲक्शन घ्यायला लावणे.(In active) writ आणि Direction दोन्हीही मागीतलेले आहे. It may kindly behave and declare that land bearing Gat No So and So situated at Itkheda Tq. Dist Aurangabad. Admisiring So and So of which land is under reservation for sixteen mtrs wide road within a limits of Aurangabad Municipal Corporation. Jurisdiction त्यामध्ये क्लिअर करण्यात आले आहे. Its deem to have been relies from reservation, designation or allotment under the final development plan by vartu of provision of section १२७ of Maharashtra Reasonal Town Planning Act.

| | |
|---|---|
| श्री.संजय सिरसाट | : हे कुणी दिले. |
| मा.आयुक्त | :रिट याचिकेमध्ये त्यांनी दिले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : १२७ नोटीस दिल्यानंतर ६ महिण्याच्या कार्यवाही न केल्यास अॅटोमेटिक डिलीट होते. |
| मा.आयुक्त | :मा.न्यायालयासमोर काय गेलेले आहे प्रेवर क्लॉस काय आहे व डायरेटस काय आहे हे बघीतले तर विषय संपतो.रिट ऑफ मॅन्डोमस जो त्यांनी टाकलेला आहे त्यामध्ये त्यानी कुठल्या सेक्शनमध्ये आपल्याला जायचे हे त्यानी त्यात दिले मी १२७ एमआरटीपी प्रमाणे कोर्टात आलेलो आहे. हे प्रकरण मा.उच्च न्यायालयासमोर असल्यामूळे यावर कुठलेही कॉमेन्ट करणार नाही. |
| श्री.संजय जोशी | :रस्ता बीअॅण्डसीचा महापालिकेने का जागा संपादीत करावी. बी अॅन्ड सी चा रोड आहे. बी अॅन्ड सी ला नोटीस द्यावी. |
| सहा.संचालक(न.र) | :डीपी रोड ६० मी. असून बीअॅण्डसीचा ३० मि. उर्वरीत ३० मी. जागा घ्यावी लागणार आहे बीअॅण्ड सी हा रस्ता करणार असेल तर तेवढा खर्च घ्यावा लागेल. आपण कोर्टात म्हणतो कार्यवाही सुरू केली. |
| श्री.संजय जोशी | :ठराव ठेवतांना सविस्तर यायला पाहिजे. तीन अधिकाऱ्यांना बोलवून माहिती घ्यावी लागत आहे सभागृहाचा वेळ वाया जात आहे.यासाठी एक दिवस अगोदर सर्व अधिकाऱ्यांची आयुक्तांनी बैठक बोलवून माहिती घेतली पाहिजे. |
| मा्.आयुक्त | :या बैठकीच्या संदर्भात कोणकोणते संभाव्य प्रश्न उपस्थित होवू शकतात त्यासाठी आधिका-यांची बैठक बोलविलेली होती. |
| श्री.संजय सिरसाट | सन २००५ ची नोटीस नुसार २००९ मध्ये प्रस्ताव कसा येतो यावर चर्चा झाली असेलच. |
| श्री.संजय जोशी | :इतर चर्चा न करता रद्द करावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :सध्या हे जर मा.न्यायालयामध्ये असेल न्यायालयाच्या अधिन असेल आपण यामध्ये जास्त याचेत न जाता प्रोसेडिंग मध्ये आहे अशा पध्दतीने हे असावे असे माझे स्वत: चे मत आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :डीपी रोड ६० मी. असेल तर त्यात बदल करण्याचा अधिकार आपल्याला नाही.त्यासाठी लागणारी जागा ही संपादीत करावीच लागेल परंतू सदर जागा ही मूळ मालकाची आहे का अतिक्रमण आहे हे बघावे लागेल २००५ ची नोटीस प्रकरण २००९ मध्ये येते.यावर या सभागृहाचा अधिकार कितपत पोहचतो हे प्रश्नचिन्ह आहे. मा.न्यायालयात हे प्रकरण आहे कार्यवाही सुरू करावी. आतापर्यंत कार्यवाही केलीच नाही. |
| मा.आयुक्त | :या प्रकरणात रिलीफ काय, मागितला मा.न्यायालयाचे काय डायरेक्शन आहे. कन्टेम होणार नाही याची काळजी घेवून जो काही खुलासा करायचा त्याचे निरासन होणे आवश्यक आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :हे रद्य केले तर संबधीत त्याचे मॅटर विड्रॉल करेल उदयाच परवानगी साठी अर्ज करेल परवानगी दयावी लागेल त्यासाठी पहिले कार्यवाही सुरू करावी ती जागा योग्य की अयोग्य एक दोन महिण्यानी कळवून दयावे पुन्हा सादर करावे. |
| श्री.भगवान घडमोडे | :ही जागा संपादीत केल्यास रस्त्याचे प्रपोजल साध्य होणार आहे का? |
| श्री.प्रशांत देसरडा | : मोबदला लागणार आहे का? |
| मा.आयुक्त | : त्याचे मुल्यांकन भूसंपादन अधिकारी करणार. |

| | |
|---|---|
| प्र.सहा.संचालक(न.र) | :६,००० चौरस मीटर जागा १.५० कोटी लागतील रूंदीकरण करतांना पीडब्ल्यूडी ही जागा घेणार असेल तर ती रक्कम त्या विभागाकडून घेतली जाईल. |
| श्री.प्रशांत देसरडा | :बी.ॲन्ड सी ला पत्र दिले आहे का? |
| श्री.संजय सिरसाट | :तुर्त स्थगित ठेवावे.बीॲण्डसी घेत असेल १५ दिवसात पत्रव्यवहार करावे डीपी रोड चेंज करता येत नाही बीॲण्डसी की महापालिकेची जबाबदारी आहे हे अगोदर फिक्त करावे. |
| प्र.सहा.संचालक(न.र) | . सर्व जागा घेतल्या शिवाय उद्देश साध्य होत नाही. |
| मा.महापौर | :सभागृहाच्या भावना लक्षात घेता प्रस्तावाची सविस्तर माहिती शंकाचे निरासन प्रशासन करू शकले नाही त्यामूळे प्रस्ताव स्थागित ठेवण्यात येतो संपूर्ण सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी. |
| श्री.गजानन बारवाल | : कलम १२७ ची कार्यवाही चालू ठेवा |
| उपअभियंता(न.र) | :सन २००५ ला नोटीस दिली सोबत मालकी हक्काचे कागदपत्र न दिल्याने त्यांना कळविले त्यानी डायरेक्ट न्यायालयात याचिका दाखल केली संबधीतानी कागदपत्र दिले नाही म्हणून कार्यवाही करता आली नाही मा.न्यायालयासमोर आपले म्हणणे सादर केले असता मा.न्यायालयाने संबधीतास कागदपत्र देण्याचे आदेशीत केले मे २००९ मध्ये त्यांनी कागदपत्र दिले त्यानुसार प्रस्ताव सादर केला. |
| श्री.संजय सिरसाट | :२००५ ची नोटीस कागदपत्र दिले नसेल तर नोटीस रद्द करण्यात येते फ्रेश २००९ ची नोटीस दयावी.असे कळवायला पाहिजे होते. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मा.न्यायालय जो निर्णय देईल तो अंतिम राहिल असे करावे. |
| श्री.संजय जोशी | :पुर्ण कागदपत्र सोबत दिले नसतांना नोटीस का सादर करून घेतली. |
| उपअभियंता(न.र.) | नोटीस मान्य केली नव्हती कागदपत्राचीच मागणी केली होती. |
| मा.महापौर | :याबाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे तपशिलवार माहिती घेवून पूढील सभेत सविस्तर माहितीसह प्रस्ताव ठेवावा. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामूळे, तपशिलवार माहितीसह सविस्तर प्रस्ताव पूढील सभेत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (जुनी) १९७५ मध्ये कार्यान्वीत झाली. या योजनेत वाढीव पाणी परिमाणासाठी १९८५ मध्ये ढोरकीन व नक्षत्रवाडी येथे बुस्टर कार्यान्वीत करण्यात आले. ढोरकीन बुस्टर हे जुन्या योजनेचे Raw water पंपींग स्टेशन असून या ठिकाणी ३५० अ.श. चे एकुण सहा व्हर्टीकलपंप/मोटर संच आहेत. यापैकी तीन संच सतत चालू राहतात तर तीन राखीव संच आहेत.

येथील पंपाची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे सन २००५ मध्ये ढोरकीन बुस्टर स्टेशन मधील एकुण सहा नवीन पंप बसविण्यात आले. परंतु त्यावेळी निधी अभावी मोटर्स बदलता आल्या नाही. या सहा पंपांसाठी ३५० अ.श. च्या मोटर्स लावलेल्या असुन त्या १९८५ पासुन कार्यरत आहेत. २३ वर्षे जुन्या झालेल्या या मोटर्स वारंवार जळणे, त्यात बिघाड होणे, रोटरचे स्ट्रीप क्रॅक होणे, बेअरिंग निकामी होणे. इत्यादी बिघाड त्यामध्ये वारंवार होत असल्याने या मोटर्सची कार्यक्षमता कमी झाली आहे. तसेच त्याच्या दुरूस्ती करीता वारंवार खर्च करावा लागत आहे, शिवाय पाणी पुरवठयात वारंवार अडथळे येत आहेत. त्यामुळे कमी कार्यक्षमतेच्या या सहा मोटर्स बदलुन नविन सहा मोटर्स बसविणे प्रस्तावित आहे. त्यामुळे शहराचा पाणीपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल.

करीता, नविन सहा मोटर्स खरेदीसाठी अंदाजपत्रक रू. ५४,२५,१७०/- चे तयार करण्यात आले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेस बाराव्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त रू. ५.६० कोटी पैकी सदरील कामासाठी रक्कम रू. ५५ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी अंदाजपत्रक र.रू.५४,२५,१७०/- च्या मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी — शासनाकडून १४३ कोटी आलेले आहे आता हा प्रस्ताव मंजूर करण्याची गरज नाही सदर निधीतून मोटर्स खरेदी करता येईल.

कार्य.अभियंता(पापू) — :हा प्रस्ताव ढोरकीनचे बुस्टर संबंधीत आहे. २००५ साली ३ स्टॅण्डबाय ३ वर्कीगेला आहे ६ पंप आहे.गेल्या २२-२३ वर्षापुर्वीच्या जुन्या मोटारी असून त्यांचे लाईफ १५-१६ वर्ष असते नेहमी बंद पडतात वारंवार दुरूस्ती करावी लागते त्या बदलण्यासाठी हा प्रस्ताव आहे शासनाचे संमातर जलवाहिनी निधी संदर्भात नुकतेच पत्र आले ती योजना पुर्ण होण्यास ३-४ वर्ष लागणार आहे. यास मंजूरी दयावी.

श्री.संजय जोशी — :यात दिले मोटर्स जळते रोटर क्रॅक होणे बेअरिंग खराब होते कशाने काय खराब होते रोटरची किंमत काय आहे टेक्नीकली सागांवे.तात्पुरते रोटर बदलावे जो निधी ठेवला तो संपेल दिवाबत्तीसाठी निधी राहणार नाही काटकसर करावी.तात्पुरते रोटर बेंअरींग बदलाव्या त्यानंतर सर्वच नवीन करावे.

उपअभियंता (पापू) — :मोटर्सचे रोटर वारंवार क्रॅक होतात.दुरूस्ती केली जाते परंतू पुन्हा वारंवार त्या खराब होते त्यात बेंअरीग घासणे मोटार खराब होणे असे प्रकार होतात. ते व्यवस्थित बॅलेन्स होत नाही.

श्री.संजय जोशी — : ३ पंप स्टॅण्डबाय आहे तीनच पंप चालतात दुरूस्तीसाठी जास्तीत जास्त १० लक्ष खर्च येईल तो करावा.

श्री.रेणुकादांस वैद्य — :करोडो रूपये पाणी पुरवठयावर खर्च होतो अमुक केल्याने पाणी पुरवठा सुरळीत होईल असे म्हटले जाते परंतु आजही शहरात अनेक भागात पाणी नाही.

श्री.पानझडे (का.अभि.) — :या पुर्वी पंप दुरूस्ती केली १०-१५ एमएलडी पाणी वाढविले त्यामूळे तक्रारी कमी झालेल्या आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य — :पाणी वाढविले हे ऑन पेपरवर आहे.

श्री.संजय जोशी — :पंप बदलले नवीन मोटार्सचे स्पीड तेच आहे पुर्वीच्या व या मोटार्स मध्ये आरपीएममध्ये फरक काय ?

कार्य.अभियंता(पापू) — :३ मोटार्स चालू राहणार त्यांना विश्रांती दिल्यानंतर परत ३ चालू राहणार. या प्रस्तावाला मंजूरी दयावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर — :स.सदस्य श्री. संजय जोशी यांनी सजेशन दिले आहे त्यानुसार किंवा जे योग्य वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य — :लहान लहान पार्ट टाकून मोटार्सवर काही परीणाम होणार नाही.३-३ मोटार्स चालतात ३ मेंन्टन्ससाठी ठेवू शकतो २-२ दिवस मोटार्स चालू असतात पाणी पुरवठा बंद होत नाही.नवीन मोटार्स घेण्याची आवश्यकता नाही दुरूस्ती साठी जो खर्च लागेल ते बजेटमध्ये तरतूद करावी.

श्री.संजय जोशी — :मोटार्स दुरूस्तीसाठी ५-१० लक्ष खर्च करावे. समांतर जलवाहिनीच्या वेळेस सर्व नवीन घ्यावे नसता पंप जुने मोटार्स नवीन दोन वर्षानंतर होणारी लाईन आता जी पाण्याची परीस्थिती तीच पुढे चालू राहिल त्यासाठी तुर्त मोटार्सची दुरूस्ती करून घ्यावी.

मा.महापौर	:सभागृहाची भावना लक्षात घेता नवीन मोटार्स खरेदी करणे हे संयुक्तीक होणार नाही असे वाटते् म्हणून सध्या ज्या मोटार्स आहे त्यांचे दुरूस्ती करीता जो खर्च लागेल तो सभागृहा समोर ठेवून मंजुरी घेवून कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार,नवीन मोटार्स खरेदी करणे हे संयुक्तीक होणार नाही म्हणून सध्या ज्या मोटार्स आहे, त्यांचे दुरूस्ती करीता जो खर्च लागेल तो सभागृहा समोर ठेवून मंजुरी घेणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५१०	:**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील नाल्यातून वाहणाऱ्या दुषीत पाण्यावर प्रक्रिया करून ते उपयोगात आणणेसाठी शहरात विविध ठिकाणी सीव्हेज ट्रीटमेंट प्लान्ट उभारणे आवश्यक असून, त्यातील प्रथम टप्प्यांतर्गत डॉ.सलीम अली सरोवर परीसरात ५ द.ल.ली. क्षमतेचा सिव्हेंज ट्रीटमेंट प्लांटची (मलनि:सारण प्रक्रिया केंद्र) उभारणी करण्याचे प्रस्तावीत आहे. डॉ.सलीम अली सरोवराचे इतर प्रकल्पांतर्गत सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याअंतर्गत गाळ काढणे व सरोवराची पाणी धारण क्षमता वाढविण्याचे काम सुरू आहे. डॉ.सलीम अली सरोवराच्या वरच्या भागात जलनि:सारण वाहिन्यांचे मलयुक्त पाणी इतर लगतच्या भागातून येऊन मिळते. याचा त्रास लगतच्या परीसरातील नागरीकांना होतो. त्याच प्रमाणे तलावाचे पाणी दुषित होते.

त्यामुळे या समस्येवर उपाय योजना करण्या करीता व परिसरातील नागरीकांची गैरसोय टाळणेसाठी येथे येऊन मिळणारे मलयुक्त पाणी एकत्रित करून त्यावर उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून येथे सिवेज ट्रीटमेंट प्लान्ट उभारणे आवश्यक आहे. जेणे करून परिसरातील नागरीकांची गैरसोय दुर होईल व प्रक्रियायुक्त स्वच्छ केलेले पाणी तलावात सोडण्यात येईल. त्यामुळे तलावाची पाणी पातळी योग्य राखुन नागरीकांना तलावातील सुविधांचा योग्य लाभ घेता येईल.

त्यास्तव येथील परिसरात ५ द.ल.ली. क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लान्ट उभारणीचे योजिले आहे. यासाठी राज्य शासनाने मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत सिवेज ट्रीटमेंट व्यवस्थापनासाठी रूपये २५ कोटी अनुदान जाहीर केले असून, यातील शासनाचा सहभाग २५% (रूपये ६.२५ कोटी) असून, महानगरपालिकेस ७५% (रूपये १८.७५ कोटी) वाटा उचलावयाचा आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेस राज्य शासनाकडून २५% हिश्श्याचे एकुण ६.२५ कोटी अनुदान प्राप्त होणार असून, ते वर्ष २००८-०९ व २००९-१० यो दोन टप्प्यात मिळणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात रूपये ३.१३ कोटी महानगरपालिकेला प्राप्त झाले आहेत.

तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबुत नसल्याने महानगरपालिका उर्वरीत रूपये १८.७५ कोटीचा हिस्सा उचलू शकत नसल्याने महानगरपालिकेच्या वतीने राज्य शासनास विनंती करण्यात आली आहे की, घोषीत अनुदान रूपये २५ कोटीच्या २५% म्हणजेच महानगरपालिकेस देण्यात येणारे अनुदान रूपये ६.२५ कोटी हे २५% हिस्सा गृहीत न धरता १००% स्वरूपात गृहीत धरून एकाच प्रकल्पासाठी अनुदान स्वरूपात वापरणे बाबत मंजुरी प्रदान करावी.

प्रस्तावीत डॉ.सलीम अली सरोवर परिसरातील सिवेज ट्रीटमेंट प्रकल्पाचा अंदाजीत खर्च रूपये ६.८७ कोटी असुन, वर नमुद प्रमाणे दोन टप्प्यात उपलब्ध होणारे शासन अनुदान रूपये ६.२५ कोटी वगळता, उर्वरीत निधीची म्हणजेच रूपये ६५ लाखाची तरतुद महानगरपालिकेच्या फंडातून करावी लागणार आहे. तसेच उर्वरीत योजना राज्य शासनाच्या निर्णयानुसार रूपये २५.०० कोटीची असल्याने त्यातील शासनाचा सहभाग वगळता उर्वरीत ७५% सहभाग म्हणजेच रूपये १८.७५ कोटी हे महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून टाकावा लागणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासन दोन

टप्प्यांमध्ये निधी हा उपलब्ध करून देणार असून, यामध्ये महानगरपालिकेने उर्वरीत रूपये १८.७५ कोटीचा हिस्सा टाकल्यास हा उर्वरीत निधी प्राप्त होऊ शकेल.

प्राप्त अनुदानातून डॉ.सलीम अली सरोवर येथे ५ द.ल.ली. क्षमतेचा प्रकल्प उभारावयाचा असून, त्यासाठी रूपये ६.८७ कोटी खर्च अपेक्षीत आहे. तसेच महानगरपालिकेला टाकावयाच्या हिस्सा रूपये १८.७५ कोटी मधून शहरामध्ये आवश्यक विविध ठिकाणी नव्याने सिवेज ट्रीटमेंट प्लान्ट उभारणे गरजेचे आहे. पालिका सर्वसाधारण सभा दिनांक २०.०९.२००८ विषय क्रमांक ३०१ नुसार (१) बनेवाडी (२) सिध्दार्थ उद्यान परीसर (३) कांचनवाडी (४) डॉ.सलीम अली सरोवर परीसर (५) जाधववाडी परिसर इत्यादी ठिकाणी व या व्यतिरीक्त उपलब्ध होणाऱ्या सोईच्या ठिकाणी आवश्यक त्या क्षमतेचे सिवेज ट्रिटमेंट प्लान्ट उभारणे करीता मंजुरी प्राप्त आहे.

तरी डॉ.सलीम अली सरोवर परिसरात ५ द.ल.ली. क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लान्ट उभारणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ६,८७,६३,७९६.०० यास मान्यता देण्याचा व महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून रूपये १८.७५ कोटी रक्कमेतून शहरात आवश्यक ठिकाणी सिवेज ट्रीटमेंट प्लान्ट उभारणेसाठीच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेस्तव तसेच फरकाची रक्कम रूपये ६५ लाख व महापालिकेचा हिस्सा रूपये १८.७५ कोटीची तरतुद महानगरपालिका अर्थसंकल्प २००९-१० मध्ये करणेच्या मान्यतेसह प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा :आताच बनेवाडीच्या विषयावर चर्चा केली तीच चर्चा यास लागू होते.मुख्य सिव्हर लाईन टाकावी त्यानंतर एसटीपी प्लॅन्ट करावा.

श्री.संजय जोशी :विषय क्र. ५०७, मध्ये ९ कोटी ५१० मध्ये १८.७५ कोटी ५११ मध्ये ३०.६५ कोटी अशी सर्व मिळून ५८.४० कोटी तरतूद होते. आता पगारावर ९६ कोटी खर्च होतो, एमएसईबीचे बील ३५ कोटी स्पील ओव्हर ९० कोटी व इतर तरतुदी ६० कोटी असे २७५ कोटी खर्च होत आहे.उत्पन्नात जकातीचे १२५ कोटी, पाणीपटटी व मालमत्ता कर ७५ कोटी,इतर २५ कोटी असे एकूण २२५ कोटी उत्पन्न येवू शकेल ६० कोटी हे स्पील ओव्हरमध्ये खर्च होतील. दिवाबत्ती,संगणक स्टेशनरी,लाईट दुरूस्तीचा हा सर्व खर्च ५० कोटी पर्यत येवू शकतो.

मा.आयुक्त :तीन विषयात ५८ कोटी प्रस्तावित केले शासनाने मंजूरी दिली त्यात महापालिकेचा वाटा किती व शासनाचा किती हा प्रश्न आहे.२५ कोटीच्या कामात १८.७५ कोटी महापालिकेने बजेटमध्ये ठेवले नाही व नुसते शासन ६.२५ कोटी सबसिडी घेवून त्यातूनच काम करून सर्टीफिकेट दयायचे असे करता येत नाही.लेखा परीक्षक येथे आहे त्याचा अभिप्राय घ्यावा.दुसरा प्रस्तावात ३०-७० असे नियोजन आहे महापालिकेने तरतूद ठेवली तरच शासनाचे निधी मिळेल फायनान्शीयल रूलला धरून आहे.

श्री.संजय जोशी :प्रशासनचा खरा अर्थसंकल्प सभागृहासमोर ठेवत नाही.भविष्यात काय परीस्थिती होणार यांचे उदाहरण दिले.

मा.आयुक्त :आताच विशद केलेली परीस्थिती ही फायन्सीयल रूलला धरून तसेच याला तंतोतंत लागू पडते आवश्यक वाटत असेल तर लेखा परीक्षक सभागृहात आहे त्यांचा अभिप्राय घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा :७५ ते ७० टक्के खर्च करण्याची महापालिकेची परीस्थिती नाही त्यासाठी २५ टक्के महापालिका व ७५ टक्के शासनाचा निधी मिळेल तोही सिव्हरेज लाईन टाकण्यासाठी मिळावा असा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

मा.आयुक्त : शासनाची मंजुरी १८.७५ महानगरपालिका व ६.२५ कोटी शासनाने तसा प्रस्ताव पाठविण्यास प्रशासनाचा विरोध नाही.

श्री.प्रशांत देसरडा : प्रपोजल शासनाकडे पाठवावे मंजूरी साठी प्रयत्न करता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :आताच स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांनी म्हटल्या प्रमाणे प्रस्ताव शासनाकडे पाठवावा मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री यांची या संदर्भात भेट घ्यावी मान्यतेसाठी प्रयत्न करावे.

श्री.संजय सिरसाट :प्रस्ताव पाठविणार परंतू एका ठिकाणचे ४० कोटीचे टेंडर काढले एजन्सी फिक्स केली त्याबाबतीत काय कार्यवाही करणार आहे.

कार्य.अभियंता(पापू) :नक्षत्रवाडी पाईपलाईनचे कामासाठी ४० कोटीला या सभागृहाने मंजूरी दिली निविदा काढल्या स्थायी समितीने एजन्सीला मंजूरी दिली.शासनाला त्यांचा डीपीआर सबमिट केला त्या संदर्भात ९.३३ कोटीचा पहिला हप्ता देत आहोत म्हणून कालच शासनाचे पत्र प्राप्त झाले.

श्री.संजय जोशी :टेंडर काढण्याची घाई का झाली होती.नशीबाने शासनाने दिले नसते तर यास जबाबदार कोण?जे काम सभागृहाने करायचे ते प्रशासन करीत आहे.

श्री.संजय सिरसाट :त्या टेंडर प्रोसेसला जवळपास ५ लक्ष खर्च झाले.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :महापालिकेकडे निधी नसतांना स्थायी समितीकडे मंजूर होत असेल तर योग्य नाही.

श्री.गजानन बारवाल : हा विषय मंजुर करावा तांत्रिक सहभाग बघावा.

मा.महापौर :विषय क्र. ५१० मध्ये शासन निर्णय जो होता त्यात २५ टक्के शासन व ७५ टक्के महापालिका असे समीकरण होते.सन २००७-०८ व २००८-०९ असे दोन टप्प्यात शासन २५ टक्के निधी देणार होते त्यातील पहिला हप्ता आलेला आहे.

श्री.काशिनाथ काकाटे: सन २००९-१० च्या बजेटमधील यासाठी निधी खर्च करावा लागणार आहे किती रक्कम टाकावी लागणार उर्वरीत नवीन कामे स्पील ओव्हरची कामे होणार की नाही सर्व खूलासा व्हावा

मा.आयुक्त शहराच्या नागीरकाच्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देता येतील समस्या सुटतील त्यास विकास काम म्हणता येईल अशी प्रशासनाची धारणा आहे.पाण्याची समस्या सोडविली जाते ते विकास कामच आहे.शासनाने दिलेल्या ग्रॅण्ड च्या तुलणेत जे काही निर्देश दिले त्यानुसार महापालिकेला तरतूद करावी लागेल.शासनाचे ग्रॅंट घेवून खर्च करायचे झाल्यास ६० कोटीची तरतूद करावी लागेल.

श्री.काशिनाथ कोकाटे :हा प्लॅन्ट करण्या ऐवजी यापुर्वी जे हाती घेतले होते त्यासाठी कार्यवाही केली असती तर योग्य झाले असते. यापेक्षा त्यावर जास्त वसाहत आहे.

मा.आयुक्त : प्रस्ताव शासनाकडे पाठविण्या पूर्वी याचा विचार करायला पाहिजे होता.

श्री.प्रशांत देसरडा :शासनाकडे काय प्रपोजल पाठविले होते.

श्री.काशिनाथ कोकाटे :. सलीम अली सरोवर प्लॅन्ट ऐवजी झाल्टा ट्रीटमेंन्ट प्लॅण्डचे काम पूर्ण करण्याचा विचार करायला पाहिजे होता.कोणता प्लॅन्ट करणे आवश्यक आहे याची माहिती सभागृहापूढे आली नाही.

श्री.प्रशांत देसरडा :मा.आयुक्त व सर्व पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय याची भेट घेवून ६० कोटी तरतूद करण्याची महापालिकेची परीस्थिती नाही १०० टक्के निधी दयावा.अशी मागणी करावी.

मा.महापौर : या विषयामध्ये मधल्या काळामध्ये १२ जून रोजी मुंबईला बैठक होती त्यावेळी मा.आयुक्त व मी सुध्दा उपस्थित होते त्या बैठकीत मी आणि मा.आयुक्त दोघांनी विषय मांडला होता की, सध्याची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती जो वाटा महापालिकेसाठी निश्चित केला तेवढी तरतूद

करण्याची परिस्थिती नाही ही तरतूद करणे अवघड आहे असे निदर्शनास आणून दिले होते या बाबतीत शसनाने ठामपणे असे म्हटलेले आहे की, मी जे बोलते ते मराठवाडा विकास कार्यक्रम अंतर्गत जे मागील वर्षी १०० कोटी निधी दिला आहे, त्या बाबतीत बोलते आहे. शासनाने ठामपणे म्हटले आहे की, सुजल निर्मल अभियान अंतर्गत हा निधी मिळतो आहे. त्याचा आकृतीबंध ७०-३० असाच राहणार आहे. असे त्या बाबतीत बोलणे झालेले आहे आता जो ५१० विषय चर्चेला घेत आहोत त्याचे अंग वेगळे आहे. त्यांचे आधीचे वषार्च असल्यामूळे त्याचा वाटा २५-७५ असा आहे. त्याही विषयामध्ये मा.सचिव यांना विनंती केली होती की, एवढा निधी महापालिका उपलब्ध करून देवू शकत नाही. असा प्रस्ताव करू नये अशी विनंती केली होती. परंतू त्याबध्दलही शासनाने काही निर्णय घेतलेले नाही. किंबहुना स्पष्ट सांगितले की, अशा प्रकारचे अनुदान शासन बदलू शकत नाही.

श्री. प्रशांत देसरडा : आता नेमका निर्णय काय घेणार आहे. ६० कोटीची तरतूद पूढील बजेटमध्ये करायची असेल, आपण आपली भूमिका ठरवली पाहीजे. एखाद्या वेळेस पैसे नाही आले तरी चालतील.

मा.महापौर : यामध्ये मला सुचवावे वाटते असे करता येवू शकेल का ही माझी सूचना आहे. रुलींग नाही. स.सदस्य आपल्याला असे बघावे लागेल की, शासनाने जे अनुदान दिले अगदी ते आताच्या याच्यात ते ७०-३० असा तो फॉर्म्युला आहे, याच्या पूर्वीच्यामध्ये २५-७५ प्रमाणे आहे. हा निधी आपल्या बजेटमधून ते लॅप्स न होता त्याचा उपयोग करता येवू शकेल याचा विचार केला पाहीजे. नव्याने प्रस्ताव शासनाकडे सादर केले पाहीजे. अशाच्या असा मंजूर न करता जे शासनाने पैसे दिले आहे ते ठेवलेले आहे. लॅप्स होवू द्यायचे नाही. आम्ही ते मान्य केलेले आहे. असे आपण म्हणायचे.

श्री.संजय जोशी : महापालिकेची काही विकत घेण्याची परिस्थितीच नाही तो निधी लॅप्स झाला तर चालेल का?

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासनाने अर्थसंकल्प ठेवावा ते समोर आल्यानंतर ही तरतूद करू. अगोदरच तरतूद करू नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ.सलीम अली सरोवर परिसरातील ५ द.ल.ली.क्षमतेच्या सिव्हेज ट्रीटमेंट प्लँट उभारणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.६,८७,६३,७९६/- यास मान्यता देण्यांत येते. शासनाने सिव्हेज ट्रीटमेंट प्लँट साठी दिलेले अनुदान तसेच ठेवून उर्वरित येणारे अनुदान व मिळालेले अनुदान हे सर्व पाण्यासाठी खर्च करण्यास मंजूरी घ्यावी अशी शासनास विनंती करावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५११ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत औरंगाबाद शहर पाणीपुरवठा योजनेसाठी आणि मलनिःस्सारण प्रकल्प (STP) करीता रू.१०० कोटी रक्कमेचे अनुदान महाराष्ट्र शासनाने दिनांक १८/९/२००८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मंजुर केलेले आहे. प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.यामध्ये खालीलकामे अंतर्भुत आहेत.

१. नक्षत्रवाडी संतुलीत टाकी ते शहरापर्यंत असलेली पी.एस.सी जलवाहिनी बदलणे व शहराअंतर्गत आवश्यक ट्रान्समिशन मेन्स बदलणे व तद्नुषंगीक कामे करणे. रू.४० कोटी

२. शहरातील वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करून Hydraulic Model तयार करणे व आवश्यक भागातील वितरण व्यवस्था बदलणे व तद्नुषंगीक कामे करणे — रू. ३० कोटी

३. शहरात बनेवाडी परिसरात एस.टी.पी. उभारणे. — रू. ३० कोटी

--------------------

**एकुण रू.१०० कोटी**

यापैकी क्र.१ मध्ये नमुद कामासाठी विहीत पध्दतीचा अवलंब करून निविदा कार्यवाही अंतिम केलेली आहे. मा.स्थायी समिती सभा विषय क्र २१० दिनांक १३/०२/२००९ अन्वये या प्रकरणी महानगरपालिकेचा सहभाग ३०% म्हणजेच रू.१२ कोटी रकमेची तरतुद सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात प्राधान्याने करण्या बाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान झालेली आहे. या कामासाठी शासन निर्णय- दिनांक ०७/०५/२००९ अन्वये शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. उर्वरीत क्र २ व ३ संबंधीत कामांची प्राथमिक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

मराठवाडा विकास कार्यक्रमातून वरील तिन्ही योजनांसाठी मंजुर रू.१०० कोटी रकमेच्या अनुदानासाठी वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

- योजनेची किंमत - रू.१०० कोटी
- अनुज्ञेय अनुदान (७०%) - रू. ७० कोटी
- कर्ज (२०%) - रू. २० कोटी
- नागरी संस्थेचा सहभाग (१०%)- रू. १० कोटी

उपरोक्त अनुज्ञेय अनुदानासाठी वित्तीय आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा सहभाग हा कर्ज (२०%) व नागरी संस्थेचा सहभाग (१०%) असे एकुण ३०% म्हणजेच रू.३० कोटी इतका राहणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २३ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिव्हरेज ट्रिटमेंट व्यवस्थापनासाठी रू.६.२५ कोटी रकमेचे अनुदान मंजुर करण्यात आले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत सन २००८-०९ मध्ये रू.३.१३ कोटीचा निधी प्राप्त झालेला असून सन २००९-१० मध्ये उर्वरीत रू.३.१२ कोटीचा निधी मिळणार आहे. या कामासाठी एकुण रू.६.९० कोटी खर्च अपेक्षीत असून अतिरीक्त रू.६५ लक्ष रकमेची तरतुद महानगरपालिकेतर्फे करणे आवश्यक आहे. याप्रमाणे एकुण रू.३०.६५ कोटी रकमेची तरतुद महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पामध्ये ठेवण्याबाबत मान्यता व्हावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

डॉ.भागवत कराड :यातील अ.क्र. १,२ हे पाणीपुरवठयाची ७० कोटीची कामे आहे यास मंजूरी दयावी बनेवाडी येथील एसटीपीला मंजूरी देवू नये कारण सिव्हर लाईन टाकल्याशिवाय हे काम करून उपयोग नाही.

मा.महापौर :शासनाचे सिव्हरेज ट्रीटमेंन्ट प्लॅन्ट साठी २५ कोटी देवू असे म्हटले त्यात महापालिकेचा हिस्सा ७५ टक्के व शासनाचा २५ टक्के म्हणजे ६.२५ कोटी त्यातील सन २००७-०८मध्ये ३.१३ कोटी सिव्हरेज ट्रीटमेंन्ट साठी दिलेले आहे तेंव्हा असे म्हटले की दोन वर्षात ६.२५ कोटी रू देवू त्यातील पहिला हप्ता पहिल्या वर्षातला रू. ३.१३ कोटी महापालिकेला प्राप्त झाले त्याचा विचार करावा लागेल.

श्री.प्रशांत देसरडा :मा.मुख्यमंत्री महोदय यांची महापौर व पदाधिकारी जेष्ठ सदस्यांनी भेट घेवून एकाच कामासाठी १०० टक्के अनुदान दयावे

डॉ.भागवत कराड :३० कोटी एसटीपी प्लॅन्ट साठी आहे ते सुध्दा पाणी पुरवठयासाठी घेता येतील का घेता येत असेल तर तसा प्रस्ताव तयार करून या संदर्भातही मा. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करावी म्हणजे पुर्ण १०० कोटी पाणी पुरवठयासाठी वापरता येतील.

मा.महापौर :या १०० कोटीमध्ये ३० टक्के वाटा हा महापालिकेचा असणार आहे. यात पाणी पुरवठयासाठी ७० कोटी तर एसटीपी प्लॅन्टसाठी ३० कोटी आहे. ७० कोटीच्या पाणी पुरवठयाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.यासाठी जो वाटा महापालिकेला ठेवायचा तो अर्थसंकल्पात ठेवण्यासाठी मान्यता देण्यात येते.३० कोटी जे एसटीपी प्लॅन्ट साठी आहे ते सुध्दा पाण्यासाठी दयावे जो काही ३० टक्के वाटा असेल तो महापालिका ठेवेल असा प्रस्ताव तयार करून सर्व पदाधिकारी मा.आयुक्त सर्व मिळून मा.मुख्यमंत्री यांचेकडे हा प्रस्ताव ठेवून मान्यता आणण्यासाठी प्रयत्न करू. विषय क्र.५१० मध्ये सुध्दा शासनाने सिव्हेंज ट्रिटमेंन्ट प्लांट साठी अनुदान आलेले आहे ते तसेच ठेवून उर्वरीत येणारे अनुदान व मिळालेले हे सर्व पाण्यासाठी खर्च करण्यास मंजूरी दयावी अशी विनंती करू.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार रू.७० कोटीच्या पाणी पुरवठ्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येते व यासाठी जो वाटा महापालिकेला ठेवायचा आहे तो अर्थसंकल्पात ठेवण्यासाठी देखील मान्यता देण्यात येते. एस.टी.पी. प्लँटसाठी जे ३० कोटी आहेत ते सुध्दा पाण्यासाठी देण्यास आणि त्यासाठी ३०% वाटा महानगरपालिका ठेवेल असा प्रस्ताव तयार करून मा.आयुक्तासह सर्व पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे प्रस्ताव पाठवून ते मान्य करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१२ :**

सन१९९९-२०००ते सन२००५-२००६पर्यंतच्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

श्री.गजानन बारवाल :या विषयावर स्वतंत्र बैठक आयोजित करावी.

मा.महापौर : लेखा परीक्षण अहवालावर विचारविनिमय करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल.

**ठराव :**

लेखा परीक्षण अहवालावर विचारविनिमय करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यास मान्यता देण्यांत आली.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र.५१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला सौजन्यनगर, महुनगर व न्यु बालाजीनगर येथे जलवाहिनी टाकणे बाबत दिनांक १५.१२.०६ रोजी विषय क्र.६१६ अन्वये र.रू.१०४५७००/- मा.सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाली होती.

तसेच २०.१२.२००७ रोजी संपन्न सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५ अन्वये याच कामासाठी र.रू.३०,००,०००/- तीस लाख रूपयाची मान्यता मिळाली होती. परंतू वर्षभरात प्रशासनाने संचिका चालवून आज मितीस त्याच कामाचे पाईपचे बाजार भाव वाढल्यामुळे ६०,००,०००/- (साठ लाख रूपये मात्र) अंदाजपत्रक झाले आहे. करीता मा.सर्वसाधारण सभेने दलित वस्ती सुधार योजनेत या ठरावास मान्यता द्यावी ही विनंती.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.भगवान घडमोडे, श्री.संजय केनेकर,श्री.प्रशांत देसरडा, श्री.महेश माळवतकर

मा.महापौर	: विषय क्र.५१३ ते ५१५ मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला सौजन्यनगर, महुनगर व न्यु बालाजीनगर येथे जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी सुधारीत रक्कम रूपये ६०,००,०००/- (साठ लाख रूपये मात्र) अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते तसेच सदरील काम दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कृष्ण मंदिर पहाडसिंगपुरा पासुन ते निपटनिरंजन पर्यंतच्या रोडला स्व.प्रभाकरजी पांडे यांचे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नाहदी नासेर मो.याहीया, श्री.विनायक प्रभाकर पांडे

अनुमोदक : श्री.गजानन बारवाल, श्री.डॉ.भागवत कराड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कृष्ण मंदिर पहाडसिंगपुरा पासुन ते निपटनिरंजन पर्यंतच्या रोडला स्व.प्रभाकरजी पांडे यांचे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१८ पवननगर येथे सभागृह बांधणे करीता वाढीव कामासाठी र.रू.३.०० लक्ष वळती करण्यात आलेले आहेत. तत्पुर्वी सदरील काम प्रगतीपथावर असल्यामुळे सदरील वाढीव काम र.रू.३.०० लक्षचे कामाचे मुळ गुत्तेदार श्री.एस.ए.नबाब यांचे कडून मुळ मंजुर दरानुसार रक्कमेमध्येच अंदाजपत्रकात दाखविलेल्या ५.५३% कमी दराने करून घेणे बाबत प्रस्ताव मा.सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.गजानन बारवाल		अनुमोदक : श्री.विनायक पांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१८ पवननगर येथे सभागृह बांधणे करीता वाढीव कामासाठी वळती करण्यांत आलेले र.रू.३.०० लक्षचे काम मुळ गुत्तेदार श्री.एस.ए.नबाब यांचे कडून मुळ मंजुर दरानुसार रक्कमेमध्येच अंदाजपत्रकात दाखविलेल्या ५.५३% कमी दराने करून घेणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या एन-८ येथील नेहरू उद्यानात तलावामध्ये बुडून वैभव कंधापुरे या तेरा वर्षीय शाळकरी मुलाचा दुर्देवी मृत्यू झालेला आहे. सदरील मुलांच्या माता पित्यांना आर्थिक मदत देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.

करीता वैभव कंधापुरे यांच्या पालकास महानगरपालिके मार्फत र.रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक लाख फक्त) ची आर्थिक मदत करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.छाया विलास राऊत, श्री.गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.काशिनाथ कोकाटे

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट	:या प्रमाणे क्रांतीनगर येथील युवक तलावात बुडून मृत्यू पावला तो ऐनवेळी प्रस्ताव दिला मंजूर करावा.ज्या दुर्देवी घटना किंवा आपत्ती येते त्यांना मदत करण्याबाबत या सभागृहापुढे यावे मागिल वेळेस स्थायी समितीत मदत देण्याचा ठराव घेता धनादेश ही दिला या बाबतीत मा.आयुक्तांचे स्पष्टीकरण घ्यावे.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :चिंचेचे झाड पडून एका रिक्षा चालकांचा मृत्यू झाला त्यास मदत देण्याचा ठराव स्थायी समितीत सर्वानुमते मंजूर झाला आर्थीक मदतीचा धनादेश ही दिला ही वस्तुस्थिती आहे.असे निर्णय या सभागृहाने घ्यायचे या सभागृहाचा अधिकार आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :स्थायी समितीमध्ये असे प्रस्ताव यापूढे घेवू नये नियमाने बरोबर नाही. तो अधिकार या सभागृहाला आहे. |
| मा.महापौर | :धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेनेच घ्यायचे असतात असे प्रस्ताव या सभागृहापुढे ठेवूनच पुढील कार्यवाही व्हावी. |
| श्री.संजय सिरसाट | :अशा वेळी तातडीची मदत देणे आवश्यक असते. सभेत प्रस्ताव येईल सभा होईल उशीर होवू शकतो त्यासाठी मा.आयुक्तांनी सर्व अटी शर्ती आवश्यक कागदपत्राची तपासणी करून मा.महापौर यांची कार्योत्तर मंजुरी घेवून तातडीने मदत देण्यात यावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | :शासनाच्या नियमावलीत २५ टक्के २-३ लक्ष आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :शासन जे देईल तेवढे देणे बंधनकारक नाही. यासाठी फिक्स रक्कम करावी तेवढी दयावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | :शासनाच्या नियमाप्रमाणे २५ टक्के मदत दयावी. |
| डॉ. भागवत कराड | :शासनाचे नियम काय आहे.नियम ठरवून घटना काय व कशी आहे यानुसार रक्क्म ठरवावी. |
| मा.आयुक्त | :नैसर्गीक आपत्तीमध्ये ज्यांचे मृत्यू होतो त्यांचे वारसांना आर्थीक मदत देण्याचे धोरण शासनाचे आहे.शासन जी मदत देते त्यांचे काही टक्के मदत महापालिकेने दयावी नैसर्गीक आपत्तीमूळे मृत्यू झाला शासन २ लक्ष देत असेल तसेच नैसर्गीक आपत्तीत एखादयाचा हात व पाय निकामी झाला तर त्यांचे प्रमाणपत्र बघून मदत दिली जाते तो फार्म्युला बघुन किती टक्के दयायची ते ठरवून शासनाची जी तत्वे टाकलेली आहे त्यांचे पालन करून मदत दयावी असे प्रशासनाचे मत आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | :मदत देण्यास कुणाचा विरोध असणार नाही हा भावनीक प्रश्न आहे. यांना शासन किंवा एखादया संस्थेकडून मदत मिळाली आहे का याची चौकशी करून दयावे. नसता प्रत्येकाचे असे विषय येतील महापालिकेला अडचणीत आणतील असे होवू नये. चौकशी करून घ्यावी. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | नैसर्गीक आपत्तीमूळे मृत्यू झाला याची खात्री करून किती रक्कम दयायची हे निश्चित करावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यास हरकत नाही शासनाच्या नियमानुसार ज्या अटी शर्ती असतील,दोन लक्ष कुणाला देता येईल त्याचे नियम व अटीसह प्रशासनाकडून प्रस्ताव मागवावा. या प्रस्तावास मंजूरी दयावी. |
| श्री.संजय सिरसाट | :शासनाच्या अटी टाकून ठरवून घ्यावे की नैसर्गीक आपत्तीमूळे मृत्यू झाला त्याची कारणे काय आहे कोणत्या कारणामूळे काय आपत्ती आली व त्यासाठी किती रक्कम दयायची हे ठरवून घ्यावे. तसा प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत करावे. |
| मा.आयुक्त | :पात्रतेच्या अटी शासन जी.आर नुसार ठेवून रक्कम किती दयायची हे सभागृह ठरवील. |
| मा.महापौर | :आताच चर्चा झाल्यानुसार तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा हा विषय मंजूर करण्यात येतो ५० हजारची आर्थीक मदत देण्यात यावी याच प्रमाणे |

सोमनाथ बाबुलाल सुरभय्या या महाविद्यालयीन मुलाचा ही पाण्यात बूडून मृत्यू झाला त्यांनाही ५० हजारची मदत देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :याप्रमाणे ५२८ विषय आहे. आर्थीक मदत देवून हा योग्य पर्याय होवू शकत नाही. शासनाचे परीपत्रक आलेले आहे ज्यामूळे अशा घटना घडतात त्यांना जाबाबदार धरावे.

मा.महापौर :प्रस्ताव पुढे येणार आहे त्यावेळी चर्चा करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापालिकेच्या एन-८ येथील नेहरू उद्यानात तलावामध्ये बुडून वैभव कंधापुरे या मुलाचे निधन झाल्याने त्याचे पालकास शासन निर्णयाप्रमाणे, रू.५०.०० हजार महापालिकेतर्फे आर्थिक मदत देणेस मान्यता देण्यांत येते. तसेच प्रभाग क्र.६३ मधील महाविद्यालयीन विद्यार्थी सोमनाथ बाबुलाल सुरभय्या याचा दौलताबाद येथील तलावामध्ये बुडून निधन झाले, त्यांच्या कुटूंबियांना देखील शासन निर्णयाप्रमाणे रू.५०.०० हजार आर्थिक मदत देण्याच्या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अभय नळ योजने अंतर्गत नळ अधीकृत करणे साठी र.रू.३०६०/- शुल्क घेण्यात येत होते. तथापी सदर शुल्का व्यतिरीक्त दंड तसेच आगाऊ रक्कम घेतली जात आहे. सदर रक्कम जास्त असल्याने नागरीक भरत नाही त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसान व नागरीकांच्या मागणीचा विचार करता शुल्क र.रू.३०६०/- घेण्यात यावे त्याशिवाय कुठल्याही प्रकारची रक्कम नागरीकांकडून घेण्यात येऊ नये.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविंद्र गांगे, श्री.त्र्यंबक तुपे, सौ.रेखा काथार

अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.विजय खुडे, श्री.विनायक पांडे

**संवाद :**

श्री.डॉ.भागवत कराड : आदेश द्यावे लहान काम आहे. त्वरित अंमलबजावणी करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :त्वरीत अमलबजावणी करण्याचे आदेशीत करावे.

श्री.गजानन बारवाल : अंमलबजावणी त्वरित करावी चेअरमन स्थायी समिती यांनी किती नळ कनेक्शन अनधिकृत/ अधिकृत आहे कुठे नाही याचा प्रस्ताव दिलेला आहे ते सुध्दा तपासून घ्यावे.

मा.महापौर :जे घरगुतीसाठी आहे त्यांचे करीता या विषयाला मंजूरी देण्यात येते. याची अमलबजावणी ताबडतोब करावी जे अनधिकृत नळ कनेक्शन आहे ते कट करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अभय नळ योजने अंतर्गत नळ अधीकृत करणे साठी र.रू.३०६०/- शुल्क घेण्यात येत होते. तथापी सदर शुल्का व्यतिरीक्त दंड तसेच आगाऊ रक्कम घेतली जात असल्यामूळे,सदर रक्कम जास्त असल्याने नागरीक भरत नाही त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्यामूळे,अभय योजने अंतर्गत नळ अधिकृत करणेसाठी र.रू.३०६०/- शुल्क घेण्यास व त्याशिवाय कुठल्याही प्रकारची रक्कम नागरीकांकडून न घेता नळ जोडणी अधिकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराणा प्रताप हे थोर पुरूष होते. त्यांची आठवण व प्रेरणा नवीन पिढीला व्हावी म्हणून औरंगाबाद शहरात भव्य अश्वरूढ पुतळा उभारणे गरजेचे आहे. आतापर्यंत २ ठिकाणी पुतळयाचा ठराव मंजुर करून सुध्दा पुतळा झाला नाही. तरी सिडकोतील

कॅनॉट प्लेस येथे महाराणा प्रताप यांचा पुतळा उभा करावा व त्या उद्यानास महाराणा प्रताप उद्यान असे नाव देण्यात यावे, ही विनंती.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.गजानन बारवाल, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार, श्री.संजय जगताप, श्री.वसंत नरवडे पाटील, सौ.सरला पोळ, श्री.विनायक पांडे

**संवाद :**

डॉ.भागवत कराड :महाराणा प्रताप हे थोर पुरूष होउन गेले त्याचा भव्य पुतळा या शहरात होण्यासाठी आतापर्यंत ३-४ वेळेस प्रस्ताव मंजूर केला परंतु पुतळा झालेला नाही स्विकृतीसह यास मंजूरी दयावी व एनओसीसाठी मा.पोलीस आयुक्त मा.जिल्हाधिकारी यांना पत्र देवून कार्यवाही करावी. शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावे.

श्री.काशिनाथ कोकाटे ठराव घ्यायचा पुढे अमलबजावणी करायची नाही एकदा ठराव झाल्यावर अमलबजावणी व्हावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हैद्राबादच्या धरतीवर नवीन होणारे पुतळे एका ठिकाणी करण्यात यावे.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडकोतील कॅनॉट प्लेस येथे महाराणा प्रताप यांचा भव्य अश्वरूढ पुतळा उभारणेस व त्या उद्यानास महाराणा प्रताप उद्यान असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.एस.के.महादो यांनी स्व खर्चाने स्वर्गरथ खरेदी केलेला आहे. तो ठेवण्यासाठी त्यांच्याकडे जागा उपलब्ध नाही. सदरील स्वर्गरथ ते सवलतीच्या दरात वेळोवेळी उपलब्ध करून देणार आहेत. तरी सदरचा स्वर्गरथ एन-११ येथील स्मशानभूमीत उभा करण्याची परवानगी द्यावी. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.प्रकाश अत्तरदे

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.सिताराम सुरे, श्री.भगवान घडमोडे, श्री.महेश माळवतकर

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : सौ.रजनी जोशी यांना या प्रस्तावाचे सुचक म्हणून नोंद घ्यावी.

श्री.संजय शिरसाट : शहरात अनेक संस्थाकडे स्वर्गरथ आहे, एक ठराविक नावानिशी ठराव न घेता ज्या ज्या काही संस्थाकडे जसे बसैय्ये बंधू असतील, राम मंदिर संस्था असेल, व इतर ज्या ज्या संस्थेने अशा प्रकारची मागणी केल्यास त्यांना परवानगी द्यावी.

श्री.भगवान घडमोडे : ज्यांना कुणाला स्वर्गरथ ठेवायचा असेल त्या सर्वांना परवानगी द्यावी.

श्री.भागवत कराड : सौ.रजनी जोशी तसेच स.श्री.प्रशांत देसरडा यांचे सुचक व अनुमोदक म्हणून या प्रस्तावात नांव टाकण्यात यावे.

मा.महापौर : वरील सूचना केल्याप्रमाणे दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्री.एस.के.महादो यांनी स्वखर्चाने स्वर्गरथ खरेदी केलेला असल्यामूळे व तो ठेवण्यासाठी त्यांच्याकडे जागा उपलब्ध नसल्यामूळे सदरचा स्वर्गरथ एन-११ येथील स्मशानभूमीत उभा करण्यासाठी परवानगी देण्यात येते. तसेच ज्यांना कूणाला स्वर्गरथ ठेवायचा असेल,त्या सर्वांना परवानगी देणेस व सौ.रजनी जोशी आणि श्री.प्रशांत देसरडा यांचे सुचक व अनुमोदक म्हणून या प्रस्तावात नांव टाकणेच्या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.मिटमिटा येथील तलावात नवीन विहीर खोदून त्याचे पाणी मिटमिटा हनुमान मंदीर येथुन सध्या पाणी पुरवठा होतो.

त्या विहीरीत आणलेले पाणी त्या विहीरीत टाण्यात यावे तेथून नागरीकांना पाणी पुरवठा करण्यात यावे. करीता ठराव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन  अनुमोदक : श्री.संजय जगताप

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :जेंव्हा पाण्याचा प्रश्न उपसिथत होतो तेंव्हा शहरातील अनेक विहिरी व हापसे महापालिका ताब्यात घेते. हे ठराविक एका भागापूरते असले तरी इतर ठिकाणी ही गरज आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :दरवाजाची जशी दुरूस्ती केली त्या प्रमाणे या भागासाठी केल्यास इतर ठिकाणी करावे लागेल.

श्री.देसरडा प्रशांत :प्रस्तावाचे सुचक अनुमोदक उपस्थित नाही.

डॉ.भागवत कराड :एकाच वार्डातील न घेता शहरातील सर्व भागाचा विचार करावा.

श्री.सतीष कटकटे :विषय समजलेला नाही ५२०,५२१ चे सुचक अनुमोदक उपस्थित नाही रद्य करण्यात यावे.

मा.महापौर :विषय क्र.५२०,५२१ चे सुचक अनुमोदक उपस्थित नसल्याने हे दोन्ही विषय रद्य करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक उपस्थित नसल्याने सदर प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.पडेगाव येथील तोरणागड हौ.सो. गोपाळ नगर येथील मनपाच्या खुल्या जागेत विहीर खोदुन तसेच परिसरातील विहीर अधीग्रहण करून त्याचे पाणी टाकीत टाकण्याची व्यवस्था करावी व त्याव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन  अनुमोदक : श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक उपस्थित नसल्याने सदर प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने ज्योतीनगर येथे जलतरण तलाव चालू करण्यात आलेला आहे. स्वर्गीय प्रमोद महाजन हे मराठवाडयाचे भुमीपुत्र होते व ते नेहमी क्रिडा, कला, माहिती तंत्रज्ञान अशा नवनवीन क्षेत्रांमध्ये धडाधडीने पुढे असत व तरूणांना प्रोत्साहित करत असत. अशा या मराठवाडयाच्या भूमीपुत्राचा सन्मान करण्यासाठी मराठवाडयाच्या राजधानीतील औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्योतीनगर येथील जलतरण तलावास "स्व.प्रमोद महाजन जलतरण तलाव"असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.गजानन बारवाल, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री.संजय जोशी, सौ.सरला पोळ, श्री.विनायक पांडे

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : नाव देण्यास हरकत नाही परंतु हा तलाव महापालिकेच्या मालकीचा आहे का लिगली नाव देवू शकतो का देता येत असेल तर सुचक म्हणून

माझेही नाव टाकावे देता येत नसेल तर असे प्रस्ताव आणू नये. कायदेशीर बाजू तपासावे?

श्री.भागवान घडमोडे :मालकी महापालिकेची आहे स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांचे सूचनासह मंजूर करावे.

श्री.विनायक पांडे :सुचक म्हणून श्री.रेणुकादास वैद्य यांचे नाव टाकण्यात यावे.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो सुचक म्हणून श्री.रेणुकादास वैद्य यांचे नाव टाकण्यात यावे. कायदेशीर बाबी बघून काम करण्यास अडचण येणार नाही तशी कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्योतीनगर येथील जलतरण तलावास "स्व.प्रमोद महाजन जलतरण तलाव"असे नाव देण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच सुचक म्हणून श्री.रेणुकादास वैद्य यांचे नाव टाकणे व कायदेशीर बाबी बघून काम करण्यास अडचण येणार नाही तशी कार्यवाही करणे या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र.५२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको विभागाचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेले आहे. ३० वर्षापासून ते मालमत्ताधारक आहेत. त्यांच्या मालमत्तेचे रूपांतर लिज होल्ड मधून फ्री होल्ड मध्ये करण्यात यावे, व त्यांना मालकी हक्क देण्यात यावा. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.महेश माळवतकर, श्री.गजानन बारवाल, सौ.रजनी जोशी

अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्री.मोहन मेघावाले, श्री.प्रशांत देसरडा, श्री.विनोद सोनवणे श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.संजु रिडलॉन, श्री.नारायण कुचे, सौ.सरला पोळ, श्री.गांगवे बन्सीलाल

**संवाद :**

डॉ.भागवत कराड : सुचक म्हणून श्री.काशिनाथ कोकाटे यांचे नाव टाकावे विषय मंजूर करून शासनाकडे पाठवावा.

मा.महापौर : सुचक म्हणून श्री.काशिनाथ कोकाटे यांचे नाव ॲड करावे.या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते व प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको विभागाचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेले असल्यामूळे, व ३० वर्षापासून मालमत्ताधारक असल्यामूळे, त्यांच्या मालमत्तेचे रूपांतर लिज होल्ड मधून फ्री होल्ड मध्ये करण्यास व त्यांना मालकी हक्क देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

सौ.सुशिला रगडे :माझे वार्डात ८०-९० घरकुलाचे काम चालू असतांना काही गुंड प्रवृतीच्या लोकांनी प्रशासनातील अधिका-यांवर दबाव आणून काम बंद केले. ते त्वरीत चालू करावे तसेच वार्डात ९ वर्षापासून ९ लक्ष रू.खर्च करून पाण्याची टाकी बांधली अदयाप त्या टाकीत पाणी दिले जात नाही.

श्री.प्रशांत देसरडा या बाबतीत प्रशासनाने आजपर्यत काय कार्यवाही केली.

मा.महापौर :या भागात महापालिकेच्या वतीने घरकुलाचे काम चालू आहे,चालू असलेले काम जर कुणी बंद पाडत असतील,त्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

**विषय क्र.५२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला किराडपूरा येथील आझाद चौकात गरीब लोकांच्या दुकानांना आग लागलेली होती, त्यात त्यांच्या मालमत्तेची मोठया प्रमाणात हानी झालेली

आहे. त्यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची झालेली असून व्यवसाया अभावी व मालमत्तेच्या हानीमुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी झालेली आहे. त्यांच्या परिस्थितीचा सहानुभूतीपुर्वक विचार करून औरंगाबाद महानगरपालिके मार्फत त्यांना आर्थिक मदत करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक: श्री.गजानन बारवाल, श्री.डॉ.भागवत कराड, श्री.संजय केनेकर, श्री.शेख इब्राहीम शेख इमाम

अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा, श्री.विनायक पांडे, श्री.महेश माळवतकर,
श्री.भाऊसाहेब ताठे, श्रीमती खान मुमताज बेगम वाहेद खान

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : हा विषय रद्द करावा.

श्री.संजय सिरसाट : हा विषय रद्य करण्यात यावा.

मा.महापौर : विषय रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती नियमानुकूल करण्यात येतात. औरंगाबाद शहरामध्ये सुमारे ११४ अनाधिकृत वसाहती आहेत. गुंठेवारी कायदा लागू झाल्यापासून अनाधिकृत वसाहती मध्ये महानगरपालिका फंडातून विकास कामे करण्यात येऊ नयेत असे शासनाचे आदेश आहेत त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेस अनाधिकृत वसाहतीत नागरी सुविधा पुरविता येत नाहीत. तसेच गुंठेवारी अधिनियमात ०१ जानेवारी २००१ पूर्वीच्या विकास नियमित करता येतो. परंतु त्यामुळे २००१ व त्यानंतरच्या घरमालकांवर अन्याय होत आहे. तरी गुंठेवारी अधिनियमात अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याची मुदत ०१ जानेवारी २००१ ऐवजी ०१ जानेवारी २००९ पर्यंत वाढविण्यात यावी व ११४ वसाहतींना प्रत्येकी १.५ कोटी याप्रमाणे एकुण अंदाजे १५० कोटी रूपयांची मदत राज्यशासनाने अनुदानाच्या स्वरूपात द्यावी व गुंठेवारी वसाहतीमध्ये विकास कामे करण्यास परवानगी द्यावी याकरीता राज्यशासनास शिफारस करण्यात यावी. वरीलप्रमाणे बदल करण्यासाठी शासनाने आवश्यक ते विशेष अध्यादेश काढून औरंगाबाद शहरासाठी महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियमात आवश्यक सुधारणा करून वरील बाबींस मान्यता देण्यात यावी.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.रविंद्र गांगे, सौ.रेखा काथार, श्री.कैलास गायकवाड श्री.भगवान घडमोडे, श्री.प्रल्हाद निमगांवकर, श्री.विजय खुडे, श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.नारायण कुचे श्री.प्रशांत देसरडा, श्री.शशांक विसपुते, सौ.सरला पोळ, श्री.संजु रिडलॉन

**संवाद :**

डॉ.भागवत कराड ११४ वसाहती अनधिकृत असून सिडकोचा डिनोटीफाईड भाग आल्यामूळे आणखी वाढ झाली २००१ पर्यत गुंठेवारी रेग्यूलर करता येईल असा शासनाचा जीआर आहे महापालिका सुविधा देवू शकत नाही.मा.आमदार, खासदार निधी खर्च करू शकतो स.सदस्यांचा निधी खर्च करण्यासाठी शासनाच्या जी.आर मध्ये स्पष्ट डायरेक्शन नसल्याने त्यासाठी तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागेल असे प्रशासनाचे मत आहे हे नागरीक शहरी भागात असले तरी कोणत्याही सोयी सुविधा या भागात देता येत नसल्याने खेडयासारखे जीवन जगत आहे या भागात एकूण ४५ हजार लोक राहतात. शासन जी.आर नुसार येथील घरे रेग्युलर करण्यासाठी एजन्सीला काम दिले होते १४ हजार अर्ज आले त्यापैकी ७ हजार घरे रेग्यूलर करता आली.उर्वरीत ३८ हजार घरे बाकी आहे ती रेग्यूलर

करायची असेल तर २००८ पर्यतच्या घरांना रेग्यूलर करण्याची मुदतवाढ दयावी हा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठविण्यात यावा. व मा.मुख्यमंत्री महोदय यांची सर्व पदाध्किारी जेंष्ठ सदस्य यांनी भेट घेवून या बाबतीत कार्यवाही करण्याचे प्रयत्न करावे. हया वसाहती रेग्युलर झाल्यास महापालिकेला ५२ कोटीचा महसूल मिळेल व या भागात काम करण्यासाठी १५० कोटीची गरज पडणार असून ते मिळविण्यासाठी शासनाकडे याच वेळी मागणी करावी. असे केल्यास या जनतेला न्याय मिळेल व महापालिकेचे उत्पन्न ही वाढेल.

श्री.संजय जोशी :ज्या भागातील १००% लोकांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केले त्यांना सुविधा दिल्या जात नाही. माझ्या वार्डात मुस्तफाबाद भाग येतो. तेथील बांधीव घरापर्यंत रस्ते करावे. अधिकृत भाग आहे. विकास खर्च,विकास शुल्क भरलेले आहे.

श्री.संजय सिरसाट :प्रस्ताव चांगला आहे तो मांडत असतांना लिगल बाबी तपासल्या पाहिजे.शासनाने २००१ पर्यतची घरे रेग्युलर करण्याची जेंव्हा सुचना काढली त्यानुसार किती प्रमाणात कार्यवाही केली ज्या संचिका दाखल झाल्या त्या परीपुर्ण केल्या नाही हा विभाग जवळपास बंद पडलेला आहे.या प्रस्तावानुसार अनधिकृत वसाहतींना प्रोत्साहन देत आहोत असे व्हायला नको.या वसाहतीत पाणी रस्ते लाईटची व्यवस्था कमी जास्त प्रमाणात असेल.सुविधाच नाही असे म्हणता येणार नाही सन २००८ पर्यंच्या घरांना रेग्युलाईज करण्याची शासनाकडे मागणी करावी.हे गैरकायदेशिर ठरवू नये कुणी कार्यवाही करू नये शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.५ कोटीचे शासनाचे या वसाहतीत काम करण्यासाठी अनुदान आले होते २२ ठिकाणी गुंठेवारीचा भाग होता महापालिकेने काम करण्यासाठी एनओसी दिली. शासनाकडे प्रस्ताव पाठवावाजो निर्णय येईल तो येईल तोपर्यत आमदार खासदार नगरसेवकांच्या निधीतून गुंठेवारी भागात विकास काम करण्यास मान्यता दयावी आवश्यकता वाटल्यास मा.आयुक्तांच्या मार्फत शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवून पाठपूरावा करावा.

मा.आयुक्त :शासनाने अनेक नियम टाकून सन २००१ पर्यत परवानगी दिली.प्रस्तावात २००९ पर्यत मुदत वाढविण्याचे नमूद केले यास प्रशासनाची अजिबात सम्मती नाही.कायदयामध्ये कायदा करण्याचे अधिकार व त्यात दुरूस्ती किंवा बदल करण्याचे अधिकार शासनाला आहे

श्री.संजय सिरसाट :सभागृहाचे मत शासनाला कळवावे असे स्पष्ट आम्ही म्हटले आहे.

डॉ.भागवत कराड :या शहरातील जनतेच्या गरजेसाठी महत्वाचा ठराव आहे अशासकीय ठराव आहे मान्यता देवून शासनाकडे पाठवून मान्यता घेण्यास प्रयत्न करता येतील.

श्री.भगवान घडमोडे :गुंठेवारी विभाग सक्षम करावा. ज्या एजन्सीला काम दिले त्यांनी अनेक लोकांकडून रू ७५१ रक्कम भरणा करून घेतली पावती दिली परंतु त्यांचे संचिका सापडत नाही. ते लोक चकरा मारतात त्या बाबतीत सुध्दा कार्यवाही करावी.

डॉ.भागवत कराड :मुंबईतील १९९५ ऐवजी २००० पर्यत झोपडपटटीना नुकतीच शासनाने घोषणा केली त्यांना ओळखपत्र , निवडणूक ओळखपत्र देणार आहे.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो सभागृहाच्या भावना लक्षात घेता या भागात मोठया प्रमाणात नागरीक राहतात या नागरीकांना दिलासा देता येत नाही

कारण २००१ पर्यतच रेग्यूलाईज करू शकतो त्यासाठी शासनाला हा प्रस्ताव पाठवून विनंती करावी व १ जाने.०९ पर्यत यासाठी मुदत मागवावी तसेच या वसाहतीच्या विकासासाठी शासनाने मदत करावी असा विनंती प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती नियमानुकूल करण्यात येतात. औरंगाबाद शहरामध्ये सुमारे ११४ अनाधिकृत वसाहती आहेत. गुंठेवारी कायदा लागू झाल्यापासून अनाधिकृत वसाहती मध्ये महानगरपालिका फंडातून विकास कामे करण्यात येऊ नयेत असे शासनाचे आदेश असल्यामूळे, औरंगाबाद महानगरपालिकेस अनाधिकृत वसाहतीत नागरी सुविधा पुरविता येत नाहीत. तसेच गुंठेवारी अधिनियमात ०१ जानेवारी २००१ पूर्वीच्या विकास नियमित करता येतो. परंतु त्यामुळे २००१ व त्यानंतरच्या घरमालकांवर अन्याय होत असल्यामूळे, गुंठेवारी अधिनियमात अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याची मुदत ०१ जानेवारी २००१ ऐवजी ०१ जानेवारी २००९ पर्यंत वाढविण्यास व ११४ वसाहतींना प्रत्येकी १.५ कोटी याप्रमाणे एकुण अंदाजे १५० कोटी रूपयांची मदत राज्यशासनाने अनुदानाच्या स्वरूपात द्यावी व गुंठेवारी वसाहतीमध्ये विकास कामे करण्यास परवानगी द्यावी याकरीता राज्यशासनास शिफारस करण्यास आणि वरीलप्रमाणे बदल करण्यासाठी शासनाने आवश्यक ते विशेष अध्यादेश काढून औरंगाबाद शहरासाठी महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियमात आवश्यक सुधारणा करून वरील बाबींस मान्यता देण्यासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, व्याधीधारकांना योगोपचार वर्ग घेण्यासाठी सावरकर नगर येथील धर्मवीर शाळेसमोरचे मनपाचे जे सभागृह आहे. योगोपचार वर्ग घेण्यासाठी कबीर बाग मठ संस्था या संस्थेला शासकीय नियमानुसार पाच वर्षा करीता भाडे तत्वावर देण्यात यावे. जेणे करून वार्डा मधल्या व औरंगाबादच्या व्याधीग्रस्तांना योगोपचाराचा अधिक अधिक फायदा होईल तसेच सभागृह आजुबाजुचे ग्राऊंड यामुळे स्वच्छ राहील तरी साहेबांनी कबिर बाग मठ संस्थांना सभागृह भाडेतत्वावर देण्यात यावे ही विनंती.

टिप : वर्ग घेण्याची वेळ सकाळी ६.०० ते १०.०० वाजेपर्यंत सायंकाळी ५.०० ते ८.०० वाजेपर्यंत

सुचक : श्री.अशोक गोरखनाथ विरकर अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : सर्व सामान्यासाठी अशा वास्तू असतात सलग ५ वर्ष देणे योग्य नाही यात नमूद केलेली वेळ बघता इतरांना ते घेता येणार नाही असे दिसते. ५ वर्षासाठी देण्यात येवू नये.

श्री.संजय जोशी :प्रस्तावाचे सुचक उपस्थित नाही.

मा.महापौर :प्रस्तावाचे सुचक सभागृहात नसल्याने विषय रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात नसल्याने विषय रद्द करण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९९ शिवाजीनगर, ११ वी योजना, डी-सेक्टर मधील बिल्डींग क्र. डी-८८ समोरील मोकळी जागा श्री.१००८ शांतीनाथ भगवान सैतवाल दिगंबर जैन संस्थान, शिवाजीनगर, औरंगाबाद यांना नाम मात्र भाडे तत्वावर कायम स्वरूपी देणे.

सुचक : श्री.विनोद विठ्ठलराव सोनवणे

अनुमोदक : सौ.लता दलाल, सौ.अल्पा विकास जैन

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :अशा प्रकारचे विषय सर्वाच वार्डातील घ्यावे मंजूर करू नये मंजूर करणार असेल तर माझा विरोध नोंदवावा.

श्री.गजानन बारवाल :तेथील नागरीकांची ना हरकत असेल तरच दयावे असे मागच्या वेळेस ठरले होते त्याप्रमाणे कार्यवाही करावी यापूर्वी यास मंजूरी दिली होती

श्री.विनोद सोनवणे :तेथील सोसायटीच्या नागरीकांनी एनओसी दिली आहे.

मा.महापौर :विषय क्र.५२७ ला मंजूरी देण्यात येते नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९९ शिवाजीनगर, ११ वी योजना, डी-सेक्टर मधील बिल्डींग क्र.डी-८८ समोरील मोकळी जागा श्री.१००८ शांतीनाथ भगवान सैतवाल दिगंबर जैन संस्थान, शिवाजीनगर, औरंगाबाद यांना नियमानुसार नाममात्र भाडे तत्वावर देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ८/६/२००९ रोजी रात्री ९.०० वाजता वार्ड क्र.४ मधील वानखेडेनगर येथील मनपाचा पोलमध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने चि.अनिकेत संजय सोनवणे वय ३ वर्ष या बालकाचा दुर्देवी मृत्यू झाला व त्या दिवशी या वसाहतीच्या गल्लीतील पाच-सहा विद्युत खांबात विद्युत प्रवाह उतरलेला होता.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे तांत्रिक विभागातून श्री.राठोड व श्री.मंडलीक यांच्या अहवालातून हे निष्पन्न झालेले आहे की, मनपा कर्मचारी व देखभाल करणारे गुत्तेदार यांच्या हलगर्जीपणामुळे व निकृष्ट दर्जाचे केबल व विद्युत साहित्य वापरल्यामुळे सदरील मुलाचा दुर्देवी मृत्यू झाला.

करीता मनपाने या अपघाताची नैतिक जबाबदारी स्विकारावी तसेच गुत्तेदार व कर्मचारी यांची चौकशी करून कार्यवाही करावी व मयत बालकाच्या कुटूंबियास आर्थिक मदत रू.१.०० (एक लाख रूपये) देण्यात यावेत. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविकांत गवळी

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.सतीश कटकटे, श्री.अनिल जैस्वाल, श्री.बाबासाहेब डांगे सौ.विमल बेंद्रे, श्री.प्रल्हाद निमगांवकर

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :या विषयाच्या अनुशंगाने मा.आयुक्ताकडे निवेदन आले होते मदत नको कार्यवाही झाली पाहिजे असे होते.

श्री.रविकांत गवळी :वार्डातील नागरीकांनी निवेदन दिले त्यात मदत करावी असे ही होते. जर महापालिका किंवा पोलीस विभागाकडून न्याय मिळाला नाही तर त्यांना कोर्टामध्ये जाण्यासाठी हक्क बांधीत ठेवून आर्थीक मदत करण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :एका व्यक्तीला मदत करणार एकास नाही असे करता येणार नाही ठराव पारीत करावा निर्णय घेतांना यामध्ये पॉलीसी ठरवावी.

श्री.विनायक पांडे :मा.न्यायालयात जाण्याचे अधिकार अबाधित ठेवून मंजूर करावे.

श्री.गजानन बारवाल :शिष्टमंडळ आले होते त्यांना न्याय पाहिजे आर्थीक मदत दयावी असे म्हटलेले नाही.तर हे कशासाठी आले. पुढच्या सभेत घ्यावे.

श्री.रविकांत गवळी :पूर्वी अनेकांना मदत केलेली आहे.

मा.महापौर : हा विषय रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५२९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७९ येथे मनपा प्र.शाळेत पहिला मजला बांधणे रंग रंगोटी करणे इमारतीची दुरूस्ती व देखभाल चे काम सध्या चालू असुन मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४.५८ लक्ष अंदाजपत्रक पेक्षा कमी दराने ६.९९ असुन सदर काम सुमारे ०७ लक्षाने वाढ होत असल्याने सदर वाढीव कामासाठी सर्वसाधारण सभेत दिनांक २.३.२००९ प्रस्ताव क्र.४९१ अन्वये लेखाशिर्ष बदलुन वाढीव तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर वाढीव कामासह वाढीव अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सध्या काम करीत असलेली एजन्सी मार्फतच मंजुर निविदा दराने कामे करून घेण्यास ही मान्यता मिळावी.

करीता दुरूस्ती प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बाबासाहेब लक्ष्मणराव डांगे, श्री.गजानन रामकिशन बारवाल

अनुमोदक : श्री.नारायण कुचे, श्री.बन्सीलाल गांगवे, श्री.संजय शिरसाट

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७९ येथे मनपा प्र.शाळेत पहिला मजला बांधणे रंग रंगोटी करणे इमारतीची दुरूस्ती व देखभाल चे काम सध्या चालू असुन मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४.५८ लक्ष अंदाजपत्रक पेक्षा कमी दराने ६.९९ असुन सदर काम सुमारे ०७ लक्षाने वाढ होत असल्याने सदर वाढीव कामासाठी सर्वसाधारण सभेत दिनांक २.३.२००९ प्रस्ताव क्र.४९१ अन्वये लेखाशिर्ष बदलुन वाढीव तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली असल्यामूळे,सदर वाढीव कामासह वाढीव अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते व सध्या काम करीत असलेली एजन्सी मार्फतच मंजुर निविदा दराने कामे करून घेण्यास ही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३० :**

मा.सर्वसाधारण सभेसमोर अशासकीय प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रत्येक वेळी वेगवेगळे विभाग त्यांचे गरजेनुसार खर्च करून व त्यांचे हद्दी पावेतो विचार करून नकाशे तयार करून घेतात. त्यामुळे वारंवार काम होते तसेच त्यावर खर्चही होतो. मात्र एवढे करूनही त्याचा कार्यालयातील इतर विभागांना फायदा होत नाही असे आढळुन आले आहे.

त्याशिवाय नगर रचना विभागाचे बाबतीत सांगावयाचे झाल्यास त्यांनी विकास योजना नकाशाचा फेरआढावा (Revised Development Plan) घेणे साठी MRTP Act No.३७ of १९६६ मधील तरतुदीनुसार याची प्रक्रिया ठराव घेऊन सन २००८ मध्ये सुरू करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही झालेली निदर्शनास येत नाही.

तसेच वार्डाचे नकाशे कार्यालयास मागणी केली असता ज्यामध्ये वार्डाची सीमा (Ward Boundary), वार्डातील सर्व सुविधा उदा. रस्ते, विज, जलवाहिनी, जलनिःसारण वाहिनी, उद्याने, इमारती इत्यादी बाबी नमुद असणारे नकाशे उपलब्ध होत नाही. यामुळे विकास कामे करण्यास नगरसेवकांना प्रचंड अडचणीला सामोरे जावे लागते व यातुन विकास कामाचे मंजुरीस कार्यालयाकडे योग्य/परिपूर्ण डाटा उपलब्ध नसल्याने विलंब होतो.

याशिवाय सांगायचे झाल्यास शहरात किती इमारती आहेत, किती इमारतींना टॅक्स लागला आहे, याचाही बोध होत नाही. नाल्याची लांबी/रूंदी कळत नाही, नागरीकांची शैक्षणिक माहिती व कौटुंबिक माहिति कळुन येत नाही, जी की जणगणना, वार्ड तयार करणे (Ward Formation) इत्यादी कामासाठी महत्वाचे ठरते. अशा स्वरूपाच्या एकत्रित माहितीचा नकाशा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सिटीसर्व्हे कार्यालयास समाविष्ठ करून स्वखर्चाने तयार केला असल्याचे कळते.

अशा स्वरूपाच्या नकाशा तयार करणेसाठी उपग्रहीय छायाचित्र (Satelite Image) कार्यालयाकडे उपलब्ध आहे. त्याचा या कामी मोठा उपयोग होऊ शकेल असे वाटते. तरी असा सर्व समावेशक नकाशा (Infrastructure Map) तयार करून घेण्यात यावा जेणे करून (१) सुधारीत विकास योजना नकाशा तयार करणेसाठी अचुक बेसमॅप तयार होईल, त्यामुळे रस्त्याची दिशा योग्य

राखता येईल. (२) शहरातील सर्व सुविधा जसे की रस्ते, जलवाहिनी, ड्रेनेज लाईन, नाला रिटेनिंग वॉल, उद्याने व खुली जागा, इमारती (खाजगी/शासकीय), सर्व धार्मीक स्थळे, रस्त्यावरील विद्युत व टेलीफोन खांब, आरोग्य केंद्रे, दवाखाना इत्यादीचे अस्तित्व नकाशावर येईल (३) जणगणना व निवडणूक कामासाठी इतर सर्व्हेक्षणासाठी याचा उपयोग होईल. (४) मालमत्ता कर लावण्यासाठी याचा उपयोग होईल. (५) गुंठेवारी भागातील मिळकतीचे अस्तित्व सिटी सर्व्हे नकाशावर येऊन, गुंठेवारी भागातील नागरीकांची मोठी गैरसोय दुर होईल. (६) सर्व नगरसेवकांना त्यांच्या वार्डाचे नकाशे उपलब्ध होतील. (७) प्रकल्प विभाग व शहरी दारीद्रय निर्मुलन इत्यादी विभागाना याचा फायदा होईल. (८) शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या पल्स पोलीओ व इतर शासनाच्या योजना राबवितांना याचा उपयोग होऊ शकेल.

त्यामुळे वरील नमुद प्रमाणे वस्तुस्थिती पाहता माझी अशी विनंती आहे की, सर्व बाबींचा समावेश असणारा नकाशा (Infrastructure Map) महानगरपालिकेच्या खर्चाने तयार करून घेण्यात यावा व यासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करण्यात यावी तसेच या कामासाठी महानगरपालिकेतील योग्य अशा कार्यकारी अभियंत्यांकडे त्यांना या कामी आवश्यक असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे सहाय्य घेण्याचे अधिकार प्रदान करण्यासह नेमणूक करण्यात येऊन काम तातडीने हाती घेण्यात यावे ही विनंती.

सुचक : श्री.रविकांत गवळी

अनुमोदक : श्री.सतिष कटकटे,श्री.प्रल्हाद निमगांवकर,सौ.विमल बेंद्रे,श्री.बाबासाहेब डांगे

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :हा विषय मोठा असून समजलेला नाही घेण्यात येवू नये. |
| श्री.रविकांत गवळी | :शहराचा विकास करणेसाठी आराखडा पाहिजे. प्लॅन तयार आहे कोणतेही काम करतांना एजन्सी मार्फत मोजणी करून घ्यावी लागेते लाखोने खर्च झाले एमआरटीपी ॲक्ट १९६६ नुसार हा अधिकार प्रशासनातर्फे अशी अमंलबजावणी होणे गरजेचे होते. |
| श्री.प्रशांत देसरडा | :५०७ मध्ये एक मंजूर केले त्यात व यात काय हे वेगळे आहे का याचा खुलासा करावा. |
| श्री.गजानन बारवाल | :हा विषय प्रशासना मार्फत यावा. |
| श्री.रविकांत गवळी | :एका ठराविक कामासाठी हा विषय नाही सर्वच विकास कामाच्या संदर्भात नियोजन करणे गरजेचे आहे त्यासाठी हा प्रस्ताव ठेवला आहे. |
| मा.महापौर | :हा विषय प्रशासनाच्या माध्यमातून यावा. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनाच्या माध्यमातून ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ४/१२/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेत ठराव क्र.१४१ अन्वये औरंगाबाद शहरातील महत्वाचे चौकात नागरीक वाहतुक नियमाबाबत जनजागृती करणेसाठी इंडिया अँड चंद्रपुर यांच्या वतीने ४ चौ.फुट आकाराचे २५० साईन बोर्ड लावण्यासाठी श्री.एस.महेमुद पिता एस.जलाल यांना तीन वर्षासाठी परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावास स्थायी समितीने मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेकडे शिफारस केलेली होती. त्यानुसार दिनांक १२/२/२००९ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.३९८ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला असता सर्वसाधारण सभेत प्रस्तावास मंजुरी मिळाली नाही. तथापी शहर वाहतुक शाखेच्या वतीने याबाबत वारंवार पाठपुरावा होत असून वाहतुक नियमाबाबत नागरीकांत जनजागृती करणेसाठी सदर प्रस्तावास मंजुरी देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. तरी याव्दारे सदर प्रस्ताव फेरविचारार्थ तथा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव पुन्हा प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.रविकांत गवळी अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.सतिष कटकटे

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :स्थगित ठेवावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :नावानिशी देता येते का देता येत नसेल तर रद्य करावे.टेंडर काढावे.

डॉ. भागवत कराड :नावानिशी देता येत नाही रद्य करावे टेंडर काढावे.

मा.महापौर :स्टेट बँक ऑफ हैद्राबादला वाहतूक नियमाचे बोर्ड लावण्याकरीता त्यांना त्यानी मदत केली आहे लावून देणार आहे त्याकरीता स्टेट बँक हैद्राबादने एजन्सीला काम दिले आहे.हा प्रस्ताव मंजूर करावा असे पोलीस विभागाचे पत्र आलेले आहे.परंतु याबध्दल कोणतीही माहिती या सभागृहाला नाही. सविस्तर माहिती नाही सविस्तर माहिती देण्यात यावी. हा विषय रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील मिटमिटा व पडेगांव या भागात अनेक नविन वसाहती निर्माण झाले आहे व निर्माण होत आहे. उदा. तोरणागड,रामगोपालनगर,मिरानगर,कोमलनगर,तारांगण,बँक कॉलनी,पृथ्वी पार्क असे अनेक वसाहती निर्माण होत आहेत. तेथील लोकसंख्या ५०,००० ते ६०,००० होणार आहेत. या भागामध्ये पाणी पुरवठयाची व्यवस्था अत्यंत त्रुटक असून १०% लोकांना ही पिण्याचे पाणी मिळत नाही.

सदर पाणी पुरवठयाची व्यवस्था योग्य प्रकारे व्हावी व पाण्याचे नियोजन करता यावे व विद्यमान या परिसरातील पाण्याच्या टाकीत म्हणजे राणा पंपच्या पाठीमागील पाण्याच्या टाकी, पडेगांव येथील टाकी, व मिटमिटा, पार्वती नगर या चारी टाक्यामध्ये काही वर्षा पासून पाणी पुरवठा होत नाही. व या टाक्या कधीही भरत नाही सदरील पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी पिन्ट्रावेल (बाबा पंप) ते मिटमिटा ही स्वतंत्र्य नविन जलवाहिनी टाकुण पाणी पुरवठा व्हावा सदरील जलवाहिणी करीता अंदाजे दिड कोटी रूपये खर्च अपेक्षीत आहेत सदर खर्च शासनाकडून अनुदान घेवून काम पूर्ण करावे करीता हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.संजय जगताप

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :रद्य करावे.

श्री.सतीष कटकटे :सुचक उपस्थित नाही.

मा.महापौर :सुचक अनुमोदक उपस्थित नाही रद्य करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक,अनुमोदक उपस्थित नसल्यामूळे विषय रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

**ऐनवेळचा विषय**

**विषय क्र.५३३ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या एकूण ७९ शाळा इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या आहेत. सन २००७-२००८ मध्ये मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष इंडस प्रकल्प,औरंगाबाद यांचे दि.१५.६.२००७ च्या पत्रानुसार प्राथमिक शाळा मिटमिटा व के.प्रा.शाळा मुंकूदवाडी येथे इयत्ता ८ वी चे वर्ग सुरू करण्यात आले. महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या बैठकीत दि.२७.७.२००७ रोजी विषय क्र.५ अनवये पारित केलेल्या प्रस्तावानुसार मा.महापौर यांनी दि.२५.०२.२००८ रोजी मा.शिक्षण मंत्री यांना सन २००७-२००८ मध्ये सुरू केलेल्या मुकूंदवाडी व मिटमिटा शाळेसह इतर १० शाळेमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी च्या वर्गांना मान्यता देवून गरीब, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सातत्य टिकवावे याकरीता

पत्राद्वारे विनंती केली होती. शासन निर्णय क्र.नमाशा २००९/(४९७/०९)/माशि-१ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ११ जुन २००९ च्या स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/नगरपरिषद) आर्मी वेल्फेअर/पोलीस वेल्फेअर यांनी माध्यमिक शाळा सुरू करण्या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयानुसार खालील शाळांना विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | माध्यमिक शाळेचे नांव | माध्यम | वर्ग | विद्यार्थी संख्या | आवश्यक शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुकुंदवाडी | मराठी | ८ वा | १०५ | ३ |
| | | | ९ वा | ७८ | ३ |
| | | | १० वा | ४२ | १.५ |
| ०२ | मिटमिटा | मराठी | ८ वा | ५० | १.५ |
| | | | ९ वा | ४२ | १.५ |
| | | | १० वा | ३२ | १.५ |
| ०३ | किराडपुरा नं.१ | उर्दू | ८ वा | ५२ | १.५ |
| ०४ | बेगमपुरा | मराठी | ८ वा | ४४ | १.५ |
| ०५ | शहाबाजार | उर्दू | ८ वा | ३२ | १.५ |
| ०६ | हर्सूल | मराठी | ८ वा | ६२ | १.५ |
| ०७ | सिडको एन-७ | मराठी | ८ वा | ६८ | १.५ |
| ०८ | नारेगांव | मराठी | ८ वा | १०७ | ३ |
| ०९ | प्रियदर्शनी इंदिरानगर | मराठी | ८ वा | ५२ | १.५ |
| १० | बन्सीलालनगर | मराठी | ८ वा | २९ | १.५ |
| ११ | बनेवाडी | मराठी | ८ वा | ४५ | १.५ |
| १२ | इंदिरानगर बायजीपुरा | मराठी | ८ वा | ६७ | १.५ |
| | | | **एकूण :-** | **९०७** | **३४** |

उपरोक्त प्रमाणेच्या शालेय व्यवस्थापनासाठी शासन निर्णय दि.१० जून २००५ अन्वये माध्यमिक शाळेसाठी शिक्षण सेवक नियूक्त केले जातात. या निकषानुसार प्रत्येक वर्ग तुकडीस १.५ शिक्षक या निकषानुसार एकूण १२ शाळेसाठी कमीतकमी १२ बीएससी बीएड (गणित)व २२ बीए बीएड/ बीकॉम बीएड असे एकूण ३४ शिक्षकांची आवश्यकता आहे.

औरंगाबाद मनपा शिक्षण आस्थापनेवरील कार्यरत बीए बीएड शिक्षकांची संख्या लक्षात घेवून २२ शिक्षकांचे नियोजन महानगरपालिकेस करणे शक्य आहे. उर्वरीत १२ शिक्षण सेवक बाहेरून नियूक्त करावे लागतील किंवा ३४ शिक्षण सेवकांची नियुक्त उपरोक्त निकषानुसार बाहेरून करावी लागेल. त्या ३४ शिक्षण सेवकांचे मानधन शासन नियमानुसार प्रतिमाह रू.४०००/- प्रमाणे एकूण १६,३२०००/- रू.तसेच प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर आवश्यक साहित्य यासाठी १२ शाळेसाठी अंदाजे प्रतिशाळा रू.१०००००/- प्रमाणे रू.१२ लाख अंदाजे असे एकूण २८ लाख ३२ हजार वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

नविन माध्यमिक शाळा सुरू केल्यामूळे इयत्ता ७ वी नंतर होणारे गळतीचे प्रमाण कमी होईलच तसेच आसपासच्या परिसरातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध होईल.

करिता २००९-२०१० च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये नविन माध्यमिक शाळा या शिर्षाखाली उपरोक्त रू.२८,३२०००/- ची तरतूद करून वरिल प्रमाणे नविन १२ माध्यमिक शाळा सुरू करण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी :या मुलांना गणवेश बुट हे सर्व देणार आहोत का?

मा.आयुक्त :वाढीव तुकडया व त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग याचा जो खर्च येईल तेवढया पुरता मर्यादित आहे.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.नमाशा २००९/(४९७/०९)/माशि-१ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ११ जुन २००९ च्या स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/नगरपरिषद) आर्मी वेल्फेअर/पोलीस वेल्फेअर यांनी माध्यमिक शाळा सुरू करण्या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयानुसार खालील शाळांना विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | माध्यमिक शाळेचे नांव | माध्यम | वर्ग | विद्यार्थी संख्या | आवश्यक शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुकूंदवाडी | मराठी | ८ वा | १०५ | ३ |
| | | | ९ वा | ७८ | ३ |
| | | | १० वा | ४२ | १.५ |
| ०२ | मिटमिटा | मराठी | ८ वा | ५० | १.५ |
| | | | ९ वा | ४२ | १.५ |
| | | | १० वा | ३२ | १.५ |
| ०३ | किराडपुरा नं.१ | उर्दू | ८ वा | ५२ | १.५ |
| ०४ | बेगमपुरा | मराठी | ८ वा | ४४ | १.५ |
| ०५ | शहाबाजार | उर्दू | ८ वा | ३२ | १.५ |
| ०६ | हर्सूल | मराठी | ८ वा | ६२ | १.५ |
| ०७ | सिडको एन-७ | मराठी | ८ वा | ६८ | १.५ |
| ०८ | नारेगांव | मराठी | ८ वा | १०७ | ३ |
| ०९ | प्रियदर्शनी इंदिरानगर | मराठी | ८ वा | ५२ | १.५ |
| १० | बन्सीलालनगर | मराठी | ८ वा | २९ | १.५ |
| ११ | बनेवाडी | मराठी | ८ वा | ४५ | १.५ |
| १२ | इंदिरानगर बायजीपुरा | मराठी | ८ वा | ६७ | १.५ |
| | | | **एकूण :-** | **९०७** | **३४** |

उपरोक्त प्रमाणेच्या शालेय व्यवस्थापनासाठी शासन निर्णय दि.१० जून २००५ अन्वये माध्यमिक शाळेसाठी शिक्षण सेवक नियूक्त केले जातात. या निकषानुसार प्रत्येक वर्ग तुकडीस १.५ शिक्षक या निकषानुसार एकूण १२ शाळेसाठी कमीतकमी १२ बीएससी बीएड (गणित) व २२ बीए बीएड/ बीकॉम बीएड असे एकूण ३४ शिक्षकांची आवश्यकता असल्यामूळे, औरंगाबाद मनपा शिक्षण आस्थापनेवरील कार्यरत बीए बीएड शिक्षकांची संख्या लक्षात घेवून २२ शिक्षकांचे नियोजन महानगरपालिकेस करणे शक्य असल्यामूळे,उर्वरीत १२ शिक्षण सेवक बाहेरून नियूक्त करावे लागतील किंवा ३४ शिक्षण सेवकांची नियुक्त उपरोक्त निकषानुसार बाहेरून करावी लागेल. त्या ३४ शिक्षण सेवकांचे मानधन शासन नियमानुसार प्रतिमाह रू.४०००/- प्रमाणे एकूण १६,३२०००/- रू.तसेच प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर आवश्यक साहित्य यासाठी १२ शाळेसाठी अंदाजे प्रतिशाळा रू.१०००००/- प्रमाणे रू.१२ लाख अंदाजे असे एकूण २८ लाख ३२ हजार वार्षिक खर्च सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये नविन माध्यमिक शाळा या शिर्षाखाली तरतूद करणेस व वरिल प्रमाणे १२ माध्यमिक शाळा सुरू करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगरसचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद